

# परिपूर्ति

इरावती कर्वे

# परिपूर्ति

# परिपूर्ति

इरावती कर्वे

देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि. पुणे

पहिली आवृत्ती - १९४९
पाचवी आवृत्ती - १९६५
दहावी आवृत्ती - १९९०
चौदावी आवृत्ती - २००७
पंधरावी आवृत्ती - २००९
**सोळावी आवृत्ती - २०११**

**संस्थापक**
रा. ज. देशमुख
डॉ. सुलोचना देशमुख

**प्रकाशक**
देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि.,
पुणे ४११ ०३०.

© सर्व हक्क जाई निंबकर यांच्याकडे आहेत.

**मुखपृष्ठ**
रवी पांडे

**किंमत :**
१००/- रुपये

**अक्षर रचना**
श्री. सुरेश माने
गोकुळनगर, कोंढवा रोड, पुणे ४८.

**मुद्रक :**
साधना प्रेस
पुणे ४११ ०३०.

ती. आईस...

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | प्रेमाची रीत | ९ |
| २. | वेड लागलेले घर | १५ |
| ३. | जन्मांतरीची भेट | १९ |
| ४. | स्त्री व संस्कृती | २९ |
| ५. | बीज-क्षेत्र | ३५ |
| ६. | मारीकुट्टी | ४१ |
| ७. | गौराई | ४९ |
| ८. | एकेश्वरी पंथाचा विजय | ५५ |
| ९. | जुळी मुले | ६१ |
| १०. | स्त्रीराज्य | ६७ |
| ११. | मराठ्यांचा मठ्ठपणा | ७३ |
| १२. | महार आणि महाराष्ट्र | ८१ |
| १३. | दिक्काल | ९१ |
| १४. | नव-कलेवर | १०५ |
| १५. | एक प्रयोग | ११५ |
| १६. | सुप्त इच्छा | १२३ |
| १७. | वाटचाल | १३१ |
| १८. | परिपूर्ति | १५५ |

१

# प्रेमाची रीत

"तुला जर माझ्या मुक्याचा इतका तिटकारा वाटत असेल तर परत नाही हो घेणार! दुसरी एखादी असती तर तुझ्याशी बोललीसुद्धा नसती. पण मला तुझ्या न् तुझ्या नवऱ्याबद्दल माया वाटते ना!" म्हातारी का संतापली मला समजेच ना. माझे लग्न व्हायच्या आधी माझा नवरा जर्मनीत असताना त्याने जोडलेल्या माणसांपैकी ती होती. तो तिला 'आजी' म्हणे, तिने त्याला जर्मन शिकविले. त्याला परदेशात तिचे घर म्हणजे एक आसराच होता. पुढे मी जर्मनीत गेल्यावर त्याची बायको म्हणून तिने एखाद्या आप्ताप्रमाणे माझे स्वागत केले. चार ठिकाणी हिंडून चांगल्या कुटुंबात मला बिऱ्हाड बघून दिले. बर्लिनच्या विश्वविद्यालयातील दोन-चार अध्यापकांना भेटून माझे नाव नोंदविले. मी जरी कितीही कामात असले तरी पंधरा दिवसांतून एका शनिवारी संध्याकाळी तिच्याकडे जावयाचे व जेवून परत यावयाचे किंवा तिच्याकडेच राहावयाचे असा माझा क्रम असे. आजही मी नेहमीप्रमाणे घंटा वाजवल्यावर तिने दार उघडून मोठ्या प्रेमाने माझे स्वागत केले व नंतर संतापाने

ती वरील वाक्य बोलली. म्हातारी म्हणजे एक लहानशीशी, नाजुक-साजुक, बाहुलीच होती जणू. तिचे पांढरे शुभ्र केस, गोरा-गोरा वर्ण, किंचित सुरकुतलेले तोंड, तिचा नीटनेटका श्रीमंती पोशाक- मागच्या पिढीचा नमुना म्हणून संग्रहालयात ठेवण्याजोगी होती ती. मी स्नेहभराने तिच्या खांद्यावर हात ठेवला व आश्चर्याने विचारले, ''पण आजी, मी केलं तरी काय? तुला रागवायला झालं तरी काय?'', ''म्हणे रागवायला काय झालं? तू आल्या दिवसापासून मी पाहते आहे, तुझा मुका घेतला की तू ताबडतोब गाल पुसून टाकतेस. इतकी का तुला घाण वाटते? का तू ब्राह्मण म्हणून तुला विटाळ होतो?'' मी चकित झाले. खरंच का मी गाल पुसून टाकीत होते? मग ही क्रिया अगदी मला नकळत होत असली पाहजे. ''मी जाणूनबुजून नव्हते गं तसं करीत.'' मी थोडी थांबले व पुढे म्हणाले, ''किनी आमच्यात अशी चाल नाही. नकळत अपराध झाला. तुझा अपमान करणं माझ्या स्वप्नातसुद्धा येणार नाही हो! त्यातून तू तर नवऱ्याची आजी म्हणजे तुला केवढा मान द्यायला पाहिजे!'' म्हातारीचे एवढ्यावर समाधान झाले. ती चौकस होती व वाचणारीही होती. हिंदू रीतिरिवाज, नातीगोती, तिला थोडथोडी माहीत होती. आम्ही हातात हात अडकवून घरात जात असताना तिने विचारले, ''काय ग, तुझ्या सासूनं तुझा मुका घेतला तर काय करतेस गं?'' तिच्या प्रश्नाने मला हसूच लोटले. मी म्हटले, ''माझी सासू तर मुका घेणार नाही, पण माझी आईसुद्धा एवढ्या मोठ्या लेकीचा मुका घेणार नाही.'' आता चकित होण्याची तिची पाळी होती.

ह्यानंतर काही दिवसांनी मी लाइप्झिग्ला गेले. तेथे ज्या कुटुंबात माझा नवरा राहिला होता तेथे मी महिनाभर राहावयाची होते. कुटुंबवत्सल घर होते. वृद्ध आईबाप व पाच मुलगे आणि चार मुली असा मोठा परिवार होता. मी गेल्यावर वृद्ध जोडप्याने व मुलींनी माझे मुके घेऊन स्वागत केले. बाकीच्यांनी सुदैवाने करपीडनावरच भागवले. थोरल्या मुलाचे नुकते लग्न झाले होते व सूनही चार दिवस राहावयास आली होती. रात्री निजायला जाताना तिने सासरच्या प्रत्येक माणसाचा निरोप घेतला. जाताना ''जाते हं, आई- जाते हं, बाबा-'' म्हणून सासू-सासऱ्यांचा मुका घेतला. नंतर आपल्यापेक्षा लहान दिरांचा व नंतर समस्त वन्सं व शेवटी मी. माझे लग्न झाले त्या दिवसाची मला आठवण झाली. माझ्या थोरल्या जाऊबाई सासरच्या मंडळींशी माझी ओळख घालून देत होत्या. ''ह्या तुझ्या

मामेसासूबाई, ह्या तुझ्या मावससासूबाई, हे तुझ्या नवऱ्याचे मामा, हे काका, ह्या वन्सं...'' अशी एकामागून एक ओळख चालली होती, व मी दरवेळी खाली वाकून नमस्कार करीत आशीर्वाद घेत होते. मनातल्या मनात मी म्हटले, ''इतक्या थोरल्या अनोळखी माणसांचे मुके घेण्यापेक्षा नमस्कार करणं बरं आहे!''

बर्लिनहून मी अधूनमधून एखाद-दोन दिवस लाइपझिगला येत असे, पण सबंध सुटीभर राहावयास अशी जवळजवळ वर्षाने आले. एवढ्या अवधीत रीया (थोरली सून)ला छानसे बाळ झाले होते. मी तर आता अगदी घरचीच झाले होते. आल्याबरोबर म्हटले, ''गडे रीया, तुझं बाळ गुलाबी-गुलाबी, लठ्ठ-लठ्ठ, मऊ, लुसलुशीत! पाहिले की वाटे, संबंध खावे. मी चटदिशी तान्हुल्याला उचलले, हृदयाशी धरले व पटापट त्याच्या गालाचे मुके घेतले. थोड्या वेळाने मला वाटले, आपले काहीतरी चुकले! सारी मंडळी कशी काही धक्का बसल्यासारखी स्तब्ध होती. रीयाने बाळ माझ्या हातून घेऊन बिछान्यावर ठेवले, व आम्ही खोलीबाहेर पडलो. नेहमीप्रमाणे हसतखिदळत जेवणे झाली. दुपारी मी रीयाला विचारले की, सकाळी माझे काही चुकले की काय? तिने माझा हात धरून स्नेहपूर्ण स्वराने सांगितले, ''हे बघ बाई, एखादं बाळ पाहिल्यावर असे मुके घेऊ नयेत. आमच्यात ते बरं समजत नाहीत. आज तू सकाळी आपल्या इथे केलंस तर फारशी हरकत नाही, पण लोकांकडे नको हो असं करूस! लहान मुलं ही फुलांसारखी असतात. त्यांच्या प्रकृतीला फार जपावं लागतं. मोठ्या माणसानं आपलं तोंड तान्ह्या मुलांजवळ नेऊ नये, नाहीतर पडसं, खोकला, क्षय, इत्यादी संसर्गजन्य रोग त्याला होतील. मी सांगितलं ह्याचा राग नाही ना आला तुला?'' ''छे:! छे:!'' मी हसून म्हटले व मला राग आला नाही ह्याची खात्री पटवण्यासाठी अगदी त्यांच्या पद्धतीने तिच्या लठ्ठ गोऱ्या गालांचे सशब्द चुंबन घेतले!

दोन वर्षे तेथे राहून मला वाटले आता पुष्कळच प्रगती झाली आहे. कोणी बायांनी माझा मुका घेतला तर मी गाल पुसून टाकीत नसे. कोणी पुरुषांनी हाताचा मुका घेतला तर तोंड वाईट न करता व लगेच हात न धुता मी तशीच बसून राहात असे. पण मला अजूनही एक आश्चर्याचा धक्का बसायचा होता. माझा नवरा विलायतेला आला होता, व आम्ही दोघे मिळून स्वदेशी परत यावयास निघालो होतो त्या वेळची गोष्ट. आम्ही आगगाडीत

तिसऱ्या वर्गाच्या डब्यात बसलो होतो. गाडी पॅरिसमधील एका स्टेशनवर उभी होती व प्लॅटफॉर्मवर प्रवासी व त्यांना पोचवायला आलेली मंडळी ह्यांची एकच गर्दी उसळली होती. आमच्याबरोबरच्या प्रवाशाने माहिती दिली की, ह्या गाडीने खूप तरुण शिपाई लांबच्या वसाहतीला जावयास निघाले आहेत व त्यांना पोचवण्यासाठी फार लांबून कुटुंबातील मंडळी आली आहेत. शिपाई अगदी पोरसवदाच दिसत होते, आणि प्रत्येकाला पोचवायला आईबाप, भावंडे, मामा, चुलता, बायको वा प्रेयसी आणि तिची मातापितरे अशी सात-आठ माणसे तरी दिसत होती. पुरुष गंभीरपणे बोलत होते; बायका अधूनमधून रडत होत्या, अधूनमधून हसत होत्या; दर क्षण दोन क्षणांनी मुके घेणे चालले होते आणि विशेष म्हणजे पुरुष-पुरुषही वारकरी भेटतात तसे भेटून एकमेकांचे मुके घेत होते. इतक्यात घंटा झाली. गार्डने हिरवे निशाण दाखवले, आणि प्लॅटफॉर्मवर निरोप देण्याची एकच गर्दी उसळली. प्रत्येक शिपायावर त्याच्या सर्व नातेवाईकांनी सशब्द मुक्यांचा असा एकदम भडिमार केला की, आम्ही त्या आवाजाने दचकलोच. चुंबनांचा ध्वनी कधी एवढा मोठा होऊ शकेल ही कल्पनाही तोपर्यंत आम्हाला शिवली नव्हती. आम्हाला जे हसू लोटले ते आवरेच ना. आमच्या शेजारचे लोक म्हणत असतील की, काय पाषाणहृदयी हे पौर्वात्य! असल्या करुण प्रसंगी रडू येण्याऐवजी ते आपले हसतच आहेत!

मी मायदेशी परत आले ती थेट माहेरी आले. आल्याबरोबर वाकून आईच्या पाया पडले. तिच्या डोळ्यातून पूर वाहत होता. माझेही डोळे भरून आले होते. इतक्यात माझे वडील आले. त्यांनाही नमस्कार केला. तो त्यांनी माझे खांदे धरून मला उठवले, माझ्याकडे एकदा नीट पाहिले व मी रडते आहेसे पाहून म्हटले, "अहो जावई, तुम्हाला वाटलं की, ही बया विलायतेला जाऊन शहाणी होईल. मी सांगत नव्हतो ही रडूबाई मूर्खच राहणार म्हणून? गेली तश्शी परत आली!'' त्यांनी माझ्या पाठीवर थाप मारली. भावनेने कुंद झालेले वातावरण कसे एकदम लख्ख झाले. सगळीजणं हसली. मला काय हुक्की आली कोण जाणे, मी आईजवळ जाऊन हळूच तिच्या गालाचा मुका घेतला. आई चकित होऊन विचारती झाली, "हे गं काय?'' मी काही बोलायच्या आतच वडील म्हणाले, 'अग हे विलायती चाळे!''

याहीनंतर काही वर्षे लोटली. आम्ही सर्व भावंडे जमलो होतो.

मधल्या दिवाणखान्यात गप्पांना रंग भरला होता. संध्याकाळचे बेत चालले होते. एक भाऊ न् वहिनी सिनेमाला जाणार होती; चवथ्याची बायको बाळंत होती तिला भेटायला तो दवाखान्यात जाणार होता. आम्ही दोघे फिरायला जाणार होतो. वडील जाणार होते पत्ते खेळायला आणि आई जाणार होती देवदर्शनाला. आईच्या मनात गेले दोन दिवस काही तरी खळबळ चालली होती. ती जराशी कुरकुऱ्या आवाजात बोलता बोलता म्हणाली, "काय अगदी एक दिवस दवाखान्यात भेटायला गेलं नाही तर ह्यांना चालत नाही!" वडील म्हणाले, "अग, जाऊ दे ग, माझ्या गाडीतून जाईल. मी जाईन आज पायीच. थोडं फिरणंही होईल." आई उसळूनच म्हणाली, "हो, आता त्यांची कौतुकं चालली आहेत. काय म्हणे दोघं सिनेमाला जाताहेत! मला कधी एक दिवस बरोबर नाटकाला नेलं नाहीत. दोघं फिरायला जाताहेत! कधी मी विचारलं, 'येता का?' की शिपायाला म्हणता, 'बाईसाहेबांच्या बरोबर जा.' मी बाळंत होत असे तेव्हा कधी दिवस दिवस माझी विचारपूस केली नाहीत, कधी आत येऊन मूल पाहिलं नाहीत! फार तर उंबरठ्यात उभे राहून दुरूनच 'काय? सर्व ठीक आहे ना?' एवढं विचारायचं." बोलता-बोलता आईचा गळा भरून आला. जन्मभर झालेल्या अवहेलनेच्या आठवणीने तिचे मन भरून आले होते. आम्ही सर्व हा प्रकार पाहून ताबडतोब चुपचाप झालो. पण माझे वडील लगेच म्हणाले, "अग, तुझी कल्पना तरी काय आहे? ह्या पोरांच्या वागण्यानं तुला वाटतं, काय बायकोवर ह्यांचं प्रेम आहे म्हणून! आजकालची सर्वजणं करतात ते ती करतात. मी जर तुझ्याजवळ बसून राहिलो असतो, नाहीतर फिरायला गेलो असतो, तर तूच लोक हसतात म्हणून कुरकुरली असतीस. चार लोकांची रीत तीच आपली ठेवावी लागते. पण मी तर रूढीविरुद्ध वागून माझं प्रेम सिद्ध केलं आहे." आम्ही सर्वजण वडिलांच्या तोंडाकडे पाहू लागलो. शेजारी माझे चुलते बसले होते, त्यांच्याकडे वळून ते म्हणाले, "भाऊ, तू सांग पाहू. तू वहिनीला मारलं आहेस की नाही?" भाऊ म्हणाले, "हो! दोन-चारदा मारली असेल." वडील पुढे म्हणाले, "काय गं, तात्या न दादा तर तुझ्यादेखत बायकांना मारीत होते ना? मी साऱ्या जन्मात एकदा तरी हात उगारला आहे तुझ्यावर? दादा, तात्या, भाऊ, सर्व मला बायल्या म्हणत. पण मी कधी तुला मारलं नाही. मग चार लोक बायकांच्या पुढं पुढं करतात तसं करणाऱ्या ह्या मुलांचं बायकांवरील प्रेम अधिक का चार लोकांच्या

चेष्टेला न जुमानता तुला मुळीच न मारणाऱ्या माझं प्रेम जास्त?'' आमच्या हशात आईचे दु:ख कोठच्या कोठे नाहीसे झाले. पण भाऊ एवढ्यावर थोडेच थांबतात! ''पण गणू, आम्ही बायकोला मारली म्हणजे आमचं प्रेम नाही असं का तुझं म्हणणं?'' ''छे:! मी कुठे तसं म्हणतोय? तू तर वहिनीच्या मुठीत होतास, आणि तिला मारली नसतीस तर बरोबरीच्या मुलांत वावरायची सोय नव्हती हे मला कळतं रे! पण ह्या हल्लीच्या पोरांना अकलाच नाहीत. आणि त्यांचं पाहून हिला पण काहीतरी सुचतं झालं!''

आमची बैठक मोडली, व आम्ही फिरावयास निघालो तो प्रेमाची आणखी एक सनातन रीत मला दिसायची होती. रस्त्यालगतच एक झोपडे होते. अंगणात बरीच चिलीपिली खेळत होती. त्यातलेच एकजण, असेल चार-पाच वर्षांचे, खेळत-खेळत रस्त्यावर आले. त्याची आई अंगणातूनच पाहत होती. इतक्यात एक टांगा आला. मुलाच्या अलीकडे लगाम खेचून टांगा थांबला. अंगणातली बाई धावतच पुढे आली. तिने पोराच्या बखोटीला धरून त्याला खस्सदिशी ओढले, दोन-चार रट्टे दिले व म्हटले, ''पटकी झाली मेल्याला! कशाला तडफडायला रस्त्यावर गेला होतास रे? आई भवानीची खैर म्हणून वाचलास!''

✿

२

# वेड लागलेले घर

"अयाई ग!" लगेच नंतर मोठ्याने भोकाड पसरल्याचा आवाज आला. मी धावतच गेले. पाहते तो धाकटीला गुडघ्याला लागले होते आणि ती कळवळून रडत होती. "काय ग? कुठं लागलं? काय झालं?" "अगं, अशी धावता धावता खुर्चीवर आपटले!" "कार्टे, डोळे उघडे ठेवून चालायला काय झालं होतं? चल वर, औषध लावते. गुडघ्याला औषध लावण्यापेक्षा डोळ्यातच औषध घातलं पाहिजे तुमच्या? रोज दहादा धडपडता- काय दारं अरुंद आहेत, का घरात अंधार आहे, म्हणून अशी चालता देव जाणे!" माझ्या तोंडाचा पट्टा रोजच्यापेक्षा जोरात चालला होता. मी चांगलीच कावले होते. गेल्या दोन तासांत तिघांनी धडपडून लागून घेतले होते. औषध लावून गौरीचा गुडघा बांधला आणि तिला बजावले की, "आता अशी आंधळ्यानं चाललीस, तर बघ चांगली सडकून काढीन- औषध वगैरे काही नाही!"

त्या दिवशी कुणाला आणखी लागले नाही. दुसऱ्या दिवशी धाकटीचा परकर शिवीत बसले होते तो अंगणातून "बघ ग काय जम्मत आहे ती!" अशी आरोळी आली व त्यापाठोपाठ

गौरी धापा टाकीत आली. नेहमीप्रमाणे पुढे न पाहता धडक मारून येत होती. खोलीत येतायेता टेबलाच्या अणकुचीदार कोपऱ्यावर आता डोळा आपटणार असे मला दिसले व मी हातातले काम टाकून "अग, अग..." म्हणत उठले तो काय चमत्कार! टेबल गहूभर मागे सरकले व गौरी डोळ्याला न लागता माझ्यासमोर येऊन थडकली. छे! टेबल कसे सरकेल? मला काहीतरीच भास झाला. थोडक्यात पोरगी बचावली खरी. पण टेबल सरकल्यासारखे दिसल्यामुळे मी इतकी बावचळले होते की, मला ती काय सांगत होती ते समजलेच नाही व तिला बोलायचेही मी विसरले. संध्याकाळची वेळ. खोलीच्या मध्यभागी उभा राहून नंदोबा काहीतरी शाळेतली हकीकत अमदी रंगात येऊन सांगत होता. नेहमीच्या सवयीप्रमाणे स्वारी गोष्ट सांगून होत आल्यावर मागे-मागे जात दारातून बाहेर पडणार होती. दाराची एक फळी अर्धवटच उघडी होती व नेहमीप्रमाणेच नंदूचे डोके धाडकन त्यावर आपटणार होते. "नंद्या, नंद्या..." म्हणून मी ओरडते आहे तो आपले दार हळूच उघडून भिंतीसरसे झाले व नंदोबा सुखरूप दाराबाहेर पोचले! दार कोणी उघडले म्हणावे तर दाराशी तर कोणीच नव्हते! मग काय दार आपणहूनच बाजूला झाले, का मला भ्रम झाला? बाकीच्यांच्याकडे पाहिले तर काही विशेष झाल्याचे कोणाच्याच चेहऱ्यावर दिसत नव्हते. झाला प्रकार इतका विलक्षण की, मी कोणाजवळ बोललेच नाही- झाली गोष्ट मनात ठेवावी व काय होते ते पाहावे असे ठरवले. पुढचे दोन दिवस मी स्वप्नात तर नाही ना असे मला सारखे वाटत होते. मुलांचे डोके आपटणार एवढ्यात भिंती आत वाकत व त्यांना लागण्याचे टळे; बागेत दगडाला ठेचाळणार तो दगड बाजूला होई; खुर्च्या, टेबले, पलंग घडवंच्या चटदिशी मागे सरकायच्या, नाहीतर अंग चोरायच्या. दोन दिवसात कोणाला काही लागले नाही.

मुलांच्या लक्षात येणे काही शक्यच नव्हते, पण त्यांच्या वडिलांना तरी काही दिसले असेल म्हणून मी विचारले, "तुझ्या ध्यानात आलं का गेले दोन दिवस पोरं कुठं धडपडली नाहीत ते? - आश्चर्य आहे, नाही?" वर्तमानपत्रात खुपसलेले डोके काढून तो म्हणतो, "त्यात काय आहे एवढं? तू परवा खूप रागावलीस म्हणून जपून चालत असतील." आता मात्र कमाल आहे ह्या गृहस्थाची! माझ्या रागावण्याने पोरे धडपडायची आणि हा वर्तमानपत्रात डोके घालून बसायचा थांबला तर काय हवे होते? त्याला विचारण्यात अर्थ

नाही म्हणून मी विचार करू लागले की, घराला व घरातल्या वस्तूंना झाले आहे तरी काय? घरी कोणी नाहीसे पाहून एकदा सगळ्यांना सांगितलेसुद्धा की, "बाबांनो, तुम्ही मुलांना जपता ते ठीक आहे; पण तुमच्या अशा करण्यानं पोरं दिवसेंदिवस जास्तच बेफिकीर राहू लागली आहेत. तुमच्या ह्या लाडानं त्यांना पुढे पस्तावा करण्याची पाळी येईल." पण काही उपयोग झाला नाही, इतके दिवस बाकीच्या घरांसारखे असल्यावर इतक्या दिवसांनी एकदम ह्या घराला वेड का लागले? मला आता आठवले. गौरीच्या गुडघ्याला लागले त्या दिवशी भावजी आले होते. आम्ही चहा घेत असता ताईबाई गाणे गुणगुणत येता-येता हापटल्या वाटेतल्या स्टुलावर. मी नेहमीप्रमाणे कडाडले. भाऊजींनी उठून ताईला हात धरून उगी केले व दोन गोष्टी बोलून खेळायला पाठविले. आणि नंतर मला एक व्याख्यान ऐकवले, "मुलं म्हणजे कशी फुलांसारखी असतात. असं त्यांना रागावलं म्हणजे त्यांचा व्यक्तिविकास थांबतो व त्यांची मनं खुरटी होतात. तू एवढी शिकलेली पण तुला मॉंटेसोरीची तत्त्वं काहीच कशी समजत नाहीत? त्यांना काही लागायच्या आतच आपण त्यांच्यापुढची अडचण काढावी." मी म्हटले, "बाबा रे, घरातल्या सगळ्या वस्तू काढूनसुद्धा भागणार नाही..." "छे! असं बोलू नकोस. अशा बोलण्यानं ती जास्तच धडपडतात व त्यांना न्यूनगंड उत्पन्न होतो." मी भाऊजींशी वाद घातला नाही. ते गेल्यावर थोड्याच वेळाने गौरीला लागले व मी चोप देण्याची धमकी घातली. भाऊजींचे व्याख्यान सबंध घराने तर नाही ना मनावर घेतले? मी एक निःश्वास टाकून कामाला लागले.

मुलांची बेपर्वाई न् आंधळेपणा वाढत होता व सर्व घर त्यांच्या मार्गातून बाजूला सारून त्यांचा मनोविकास करीत होते. गौरी न् मी बागेत उभ्या होतो. इतक्यात समोरून आरोळी आली, "गौरी ग धाव, हा बघ मासा कसा करतोय ते!" गौरी फाटक उघडून रस्ता ओलांडायला धावली. नेहमी ती इकडे तिकडे पाहून जायची, पण आज मात्र तिने एकदम रस्त्यात उडी घातली. रस्त्यातून केवढी मोठी लष्करी मोटार भरधाव येत होती. तिचा कर्कश भोंगा वाजला, ब्रेक दाबून चाके खर्रकन रस्त्यावर वाजली व मी धावत जाऊन जवळजवळ गाडीपुढूनच पोरीला ओढून काढले. तिला घट्ट हृदयाशी धरले; ती खूपच भेदरली होती; ओठ पांढरेफटक पडले होते व

हृदय पाखरासारखे पिटपिट करीत होते. तिला शांत केली, समोरच्या चंदूकडे पोचवली व मी धावत घराच्या गच्चीवर गेले. मी पण घाबरले होते, घाबरण्यापेक्षाही मला राग आला होता. मी हुंदके देत पण रागानेच घराला व आतील सर्व वस्तूंना सांगितले, ''पाहिलं तुमच्या लाडाचा काय परिणाम झाला तो? सांगितलं नव्हतं मी की, मुलं जास्तच बेफिकीर व निष्काळजी होतील म्हणून? आज तुमच्यामुळे माझी पोरगी हातची जात होती. कसला आला आहे मनोविकास? माझ्या रागावण्यानं ती खुरटतात काय? मूर्ख नाही तर! त्यांची डोकी हापटली तरच त्यांना शहाणपण येईल, एरवी नाही. आणि जर तुम्ही ह्याउपर ऐकणार नसाल तर साऱ्या मुलांना बोर्डिंगात पाठवीन. मग तुम्हाला मुलांचं हसणं, रडणं, भांडणं, बोकाळणं, काही ऐकू यायचं नाही, समजलात?'' ''आई ग!'' म्हणून एवढ्यात किंचाळणे ऐकू आले. मी खाली धावले तो नंदोबा रडत होता. डोके दारावर आपटून चांगलेच सुजले होते. थोडक्यात बचावला, नाहीतर डोळाच जायचा. ''चल स्वैंपाकघरात, हळदीचा ओढा घालते.'' मी त्याचा हात धरून त्याला नेले.

✿

३

# जन्मांतरीची भेट

गाडी हळूहळू चालली होती. प्रवास आता अगदी थोडा राहिला होता. घरी घोटाळत असलेली आमची मने पण हलके हलके नव्या वातावरणाचा विचार करू लागली होती व डोळे बाहेरची शोभा पाहात होते. स्टेशन आले. उतरायची एकच धांदल उडाली. आमचे स्वागत करावयास तलाठी व पटेल आले होते. स्टेशनच्या बाहेर कुंपणावरून आमची मागच्या वर्षाची कामकरी मंडळी जोरजोराने ओरडून आमचे स्वागत करीत होती. महादा आला होता. वाघजी, वरसंग, धुडिया, हिराजी एवढी मंडळी दिसली. त्यांच्याच शेजारी पोरी पण हसऱ्या चेहऱ्याने उभ्या होत्या- मणी, लासू, बब्वो, सूरज. एवढे काय, पण छोटा भिकला पण सर्वांच्या पुढे नाचत होता. बऱ्याच दिवसांनी आपल्या मित्रांकडे पाहुणे जावे तसे वाटले.

तशी मंडळी काही आम्ही फारशी नव्हतो. ह्या कामाचे मुख्य प्रा.सांकळिया, मी, एक छायाचित्रकार, एक भूपर्यवेक्षक (सर्व्हेयर!), एक सांकळियांचे मदतनीस, एक माझा विद्यार्थी व मदतनीस, आणि एक स्वैंपाकी ऊर्फ महाराज,

पण आमचे सामान मात्र डोंगराएवढे होते. आमची कामकरी माणसे गेल्या वर्षीच्या अनुभवाने अगदी तरबेज झाली होती. हां हां म्हणता पाच-पंचवीस जणांनी सामान उचलले. काही गाड्यांवर लादले, काही आम्ही हातात घेतले व बंगल्याच्या वाटेने वाळू तुडवीत चालू लागलो.

उत्तर गुजरात म्हणजे एक वाळूचा समुद्रच आहे. जेथे माणसांचा पायरव फारसा नाही अशा जागी थोडेसे वाळलेले गवत व त्याच्या मुळ्या ह्यामुळे वाळू जरा तरी चिकटून कठीण झालेली असते. पण माणसांच्या पायाखालची वाट आली म्हणजे घोट्यापर्यंत पाय भुसभुशीत वाळूत रूततात. महाराष्ट्रातील कठीण काळी माती किंवा डोंगरावरील काळे कातळ ह्यांवर चालायला सरावलेले आमचे पाय ह्या वाळूत चालायला अगदी नाखूष असायचे. पायाखाली मुळी स्थिर जमीन लागायचीच नाही. दर पाऊल वाळूत बुडालेले वर काढून परत टाकायचे. वहाण पायात असली तर पाऊल वर उचलल्याबरोबर वाळूचे ओघळ खाली वाहायला लागायचे, आणि बूट असला तर दरवेळी बुटात वाळू जमायची. थोडा वेळ झाला की, बूट आपला जडजड व्हायचा; नाहीतर बूट काढावा तो आतल्या वाळूने घासून घोट्याची साल गेलेली असायची. अर्थात काही दिवसांनी हेही अंगवळणी पडत असे. आणि ह्या वाळूला तर आम्ही रोज शतशः धन्यवाद देत होतो, कारण हिच्याच मायेच्या पांघरुणाखाली जतन झालेली दहा-पंधरा हजार वर्षांपूर्वीच्या मानवांची संस्कृती आम्हाला गेल्या वर्षी सापडली होती. गेल्या वर्षी दगडाची हत्यारे, खाऊन टाकलेल्या प्राण्यांची हाडे व दात अशा कितीतरी वस्तू आम्हाला मिळाल्या होत्या, व यंदा त्या काळातील माणसेही ह्या वाळूखाली पुरलेली आढळतील ह्या आशेने मोठी सामग्री घेऊन आम्ही आलो होतो.

आम्ही बंगल्यावर पोचल्यावर सामानाची लावालाव केली. टिकाव व फावड्यांचे दांडे बसवून टिकावांना धार लावण्यासाठी सुतार व लोहारांना बोलावले. दुसऱ्या दिवशी सकाळी खणायला कोण पुरुष येणार, मातीची घमेली टाकायला कोण पोरी येणार, वाळूतून सांस्कृतिक अवशेष निवडून काढायला कोण येणार, वगैरेंची विचारपूस करून यादी केली. आमच्या कामाचे साहित्य बाहेर काढले. प्रत्येकाने खोलीचा एक-एक कोपरा धरून आपली महिनाभर राहावयाची व निजायची जागा मुक्रर केली. एकेका खोलीत चार-चारजण (एकेका कोपऱ्यात एक एकजण) होतो. इतके होते तो

पाणी तापले म्हणून एकेकाने जाऊन आंघोळ उरकली व संध्याकाळच्या जेवणाची वाट पाहात सोप्यात खुर्च्या टाकून बसलो. ह्याच सुमारास गावातील चार शिष्ट मंडळी भेटावयास आली- एक मास्तर, एक डॉक्टर, एक व्यापारी व इतर दोन-तीन मंडळी होती. "तुमच्यासारखी मोठी माणसं आमच्या कुग्रामाला भेट देतात म्हणून आम्हांस धन्य वाटतं." वगैरे औपचारिक बोलणी चालली होती. त्यातला एक बराच म्हातारा होता तो म्हणाला, "अहो, कसचं कुग्राम आणि कसचं शहर घेऊन बसलात! नशीब नेतं तशीं माणसं फिरत असतात. ज्याचं जिथं अन्नपाणी तिथं तो जातो." दुसरा म्हणाला, "हे तर खरंच आणि मागल्या जन्मीचे लागेबांधे असल्याशिवाय का तुमच्या-आमच्या गाठीभेटी होतात?" श्री.सांकळिया सर्वांशी हसून बोलत होते, आम्ही बाकीची स्तब्ध बसून अधूनमधून माना डोलावीत होतो. गेल्या वर्षाची परिचित सृष्टी समोर दिसत होती. सूर्य पिवळ्या लखलखत्या सोनेरी किरणांनी सगळ्या वस्तूंना मुलामा चढवीत होता. ह्या किरणांत आल्हाददायक चमक होती, पण तीव्रता नव्हती. आता सगळीकडे शुद्ध बावनकशी सोन्याच्या रंगात झाडांचे शेंडे, घरांची छपरें, शेतें रंगून निघाली होती. समोरच्या तळ्यावर वाऱ्याच्या झुळकीसरशी सोन्याच्या लहरी पसरत होत्या. हळूहळू ह्या शुद्ध सोन्याला लाली चढू लागली. गिनीची भट्टी तापत होती. "हं! पक्षी घरी यायची वेळ झाली," असे मी मनात म्हणते तोच माझ्या उत्सुक कानांना सारस पक्ष्यांचा कर्कश पण आर्त स्वर ऐकू आला व बंगल्यापुढून एक जोडी तळ्याच्या दिशेने गेली. किती खाली उडत होते ते! त्यांचे लांब, राखी, निळसर पंख ताणून पसरले होते, दोन-अडीच फूट लांब पाय मागे लांबवले होते, तितकीच लांब गोल मान पुढे लांब चोचीच्या टोकाशी निमुळती झाली होती. मधूनच ते 'कर्र क्रे' असे ओरडायचे व आपल्या जड लांब पंखांची खालीवर हालचाल करायचे. "विमान चाललंय जणू!" आमच्यातला एकजण म्हणाला, मी मानेनेच नकार दिला... छे! विमान किती उडालं तरी ह्या जिवंत सौंदर्याची प्रचीती मला कधी आली नाही. विमानाचे सगळे भाग कसे एकमेकांना घट्ट सांधलेले असतात. त्यांचे लांबलांब पंख कसे कुठच्याही स्थितीत विमानाच्या अंगाशी एकच कोन करून ताठ पसरलेले असतात. छे:! ते उडणं निर्जीव असतं, तो एक मानवी बुद्धीचा उत्कर्ष असतो. पण ही पक्ष्यांची जोडी! त्यांचे ताठ लांबवलेले मान-पाय-पंख क्षणाक्षणाला स्पंदन पावत

असतात व मधेच दोन्ही पंख जडपणे झाप मारतात तेव्हा हा ताठपणा म्हणजे लवचिक जिवंत अवयवांनी इच्छेच्या बळावर धारण केलेले व क्षणिक टिकणारे जड अचल रूप आहे ह्याचा साक्षात्कार होऊन मनात काय आनंदाच्या लाटा पसरतात! ती जोडी मंद घिरट्या मारून तळ्याच्या पाळीला उतरली. उतरताना शरीराचा भार काटकुळ्या पायांवर एकदम पडू नये म्हणून लहान लहान उड्या मारून मग ती स्थिर झाली. नेहमीप्रमाणे ''कर्र-कर्र-कर्र'' करीत दोघांनी वादविवाद केला व तळ्यात जायचे ठरवले. मग एक-एक पाय उंचावून हळूच तळ्याच्या पाण्यात टाकला. काय नखऱ्याने पावले टाकायची! आपले वस्त्र भिजू नये व पाणी वर उडू नये म्हणून साडी सावरून हळूच पाऊल टाकावे ना, अगदी तसेच. पहिली जोडी पाण्यात शिरते न शिरते तोच इतरही जोड्या ''कर्र-क्रे'' करीत येऊ लागल्या. त्यात समोरच्या झाडावर मोर ''म्यांवो, म्यांवो'' म्हणून ओरडू लागले व पक्ष्यांच्या आवाजाने सारे अंतराळ भरून गेले. गेल्या वर्षी लांघणज सोडले तेव्हापासूनचा मधला काळ जणू नाहीसा होऊन, कालच्या पुढचा नवा दिवस मी अनुभवीत होते. असा आमचा छावणीवरील जीवनक्रम सुरू झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी आठाच्या आत जेवणे उरकून आम्ही व आमची कामकरी मंडळी खणतीच्या जागी निघालो, व सर्वांनी मिळून खपून दुपारच्या मधल्या सुटीपर्यंत यंदाचे खणायचे क्षेत्र आखून, खुंट्या ठोकून निश्चित केले. एक तास विश्रांती घेऊन परत कामाला सुरुवात झाली. म्हातारा हिरोजी सर्वांत वडील, त्याच्याजवळ टिकाव दिला व देवाचे नाव घेऊन पहिला घाव मारावयास सांगितला. त्यानेही ''जै मा-देवजी'' म्हणून पहिले डिखळ घाव मारून काढले. सोळा फूट लांब व सहा फूट रुंद अशा चार फूट अंतरावरच्या दोन क्षेत्रात एकदम सुरुवात केली. एका खड्ड्यावर मी काम पाहात होते, दुसऱ्यावर आमचे प्रमुख होते. दिवस संपता संपता थोडीथोडी दगडाची हत्यारे सापडू लागली. दुसऱ्या दिवशी परत काम सुरू झाले. गेल्या वर्षीप्रमाणेच खूप अवशेष सापडत होते, व आम्ही सारखे त्यांची नोंद करीत होतो. पण माणसाचे अवशेष काही मिळाले नाहीत. पहिला खड्डा खूप खोल गेला. सांस्कृतिक अवशेष संपले म्हणून तो टाकून नव्या खड्ड्याला सुरुवात केली. एक दिवस माझ्या खड्ड्यात उभी असताना मला माझ्या नावाने जोरजोराने हाका ऐकू आल्या. वर आले तो माझे सहकारी जवळजवळ धावतच येऊन म्हणाले, ''चला, चला लवकर; माणसाची कवटी सापडली

आहे.'' मीही उल्हासाने पुढे झाले, व नव्या खड्ड्यात उतरून पाहिले तो पिवळसर, गोल असे काहीसे मातीतून बाहेर डोकावत होते. सर्व कामकऱ्यांना दूर सारून लहान सुरी व दाभण ह्यांचे साह्याने माती हळूहळू उकरली व तो पदार्थ मोकळा केला; तो काय, एक मोठा गुळगुळीत गोटा आढळला! आमची निराशा हसण्याखाली लपवून काम पुढे चालू केले. थोड्या वेळाने मला परत बोलावणे आले. ''काय उगीच दगड उकरायला बोलावता कोण जाणे!'' असे पुटपुटत मी वर आले तो माझे सहकारी वर खड्ड्याच्या काठाशी पुढ्यात एक मोठे ढेकूळ घेऊन बसलेले दिसले. ''पाहा पाहा, आम्ही काय काढलं आहे ते! ह्या वेळेला गोटा म्हणून काढला तो कवटीच निघाली!'' मी पाहिले तो खरेच त्या मातीच्या डिखळात रुतलेली ती एक कवटी होती. मी ती पुढ्यात घेऊन सुरी-दाभण-कुंचले ह्यांच्या साह्याने साफ करू लागले, व बाकीची मंडळी माझ्याभोवती गोळा झाली. छावणीत प्रत्येकाची कामे ठरलेली होती. चित्रकार व भूपर्यवेक्षक खड्ड्याचे, अवशेषांचे फोटो व चित्रे काढीत आणि नकाशे तयार करीत. आमचे मुख्य सर्वांवर देखरेख करीत, पण मुख्यत्वेकरून ते प्रागैतिहासिक काळातील दगडाच्या हत्यारांचे एक निष्णात संशोधक होते. मी मनुष्याच्या कवट्या व हाडे ह्यांचा मुख्यत्वे अभ्यास केलेली होते. म्हणून माणसाचे हाड दिसले की, माझ्या ताब्यात द्यावयाचे असे ठरलेले होते. एकीकडे मी कवटी साफ करीत होते व एकीकडे तोंडाने माझ्या सहकाऱ्यांना कवटीचे विशेष सांगत होते. ''ही पाहिलीत ना मातीच्या दाबानं कवटीची कशी चिपटी झाली आहे? कवटीच्या निरनिराळ्या हाडांच्या शिवणी उसवून मधेमधे फटी पडल्या आहेत.'' कवटी एका म्हाताऱ्याची होती. दात जिवंतपणीच पडून हिरड्या बुजल्या होत्या. खालची हनुवटी दात जाऊन व हिरड्या झिजून अरुंद झाली होती. दुर्दैवाने म्हाताऱ्याच्या इतर हाडांचे अवशेष फारसे सापडले नाहीत. आता ह्यापुढे स्वच्छ करून फोटो काढावे म्हणजे जास्त बरे असे ठरले. म्हाताऱ्याच्या पाठोपाठच थोड्या अंतरावर एक सबंधच सांगाडा सापडला. त्या माणसाचे हात छातीवर एकमेकांवर ठेवलेले होते. उजव्या हाताचा पंजा डाव्या कोपरावर व डाव्याचा उजव्या कोपरावर होता. पाय मुडपून ठेवलेले होते. पण सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे चेहऱ्याच्या डाव्या बाजूला कपाळापासून तो हनुवटीपर्यंत साफ घाव बसून केवढी फट पडली होती! हाड अगदी कापले गेले होते, व इतक्या सहस्रकांच्या अवधीनंतरही

पाहणाऱ्यांच्या हृदयात भीतीची चमक उठत होती. माणूस अगदी तरणाबांड पुरुष होता- जेमतेम २५-३० वर्षांचा असेल-नसेल. कामकरीसुद्धा स्तब्ध होते. शेवटी म्हातारा हिसेजी म्हणाला, "बाई, हा माणूस लढाईत मेलेला असणार." त्याच्या शब्दाबरोबर सगळ्यांना वाचा फुटली. आमच्या साहेबांचा तरुण मदतनीस म्हणाला, "हो हो, हा जवान लढाईत मेला, आणि त्याच्या दुःखानं त्याचा म्हातारा बाप मेला." माझी व सांकळियांची दृष्टादृष्ट झाली, व आम्हाला दोघांनाही हसू लोटले.

दुसऱ्या दिवशी आदल्या दिवशीच्या सांगाड्यापलीकडे पाच-सहा हातांवर एक कुत्रे पुरलेले आढळले. "कुत्रं कसं बुवा मेलं?" मंडळी विचारीत होती. पण त्या कुत्र्यामुळे एक गोष्ट मात्र स्पष्ट झाली होती. कुत्रा काही आपोआप मेलेला नव्हता. त्याच्या डोक्यात दगड घालून त्याला ठार मारला होता. "ह्या जुन्या वसाहतीत एक माणूस- बहुधा पुरुष... मेला असला पाहिजे, व त्याला पुरताना त्याचे नोकरचाकर, हत्यारे, त्याचा विश्वासू कुत्रा, सगळ्यांना मारून पुरले असले पाहिजे" असा मी उलगडा गेला, तो सगळ्यांना पटला व काम दुप्पट उत्साहाने सुरू झाले.

गेल्या वर्षी आम्हाला कितीतरी अवशेष सापडले होते, पण त्यांनी माझ्या मनाला असा चटका लागला नव्हता. यंदा मात्र गतकालातील जीवनाच्या ह्या अदभुत आविष्काराने माझे मन भारावल्यासारखे झाले होते. माझे शरीर व मनाचा एक भाग सगळ्यांच्याबरोबर काम करीत होता.

माझ्या ताब्यात आलेले सांगाडे नीट उकरून, मातीसकट वर उचलून, मेणवून, त्यांना कापडाच्या लांब लांब पट्ट्यांनी घट्ट बांधून, कापसात गुंडाळून, ट्रंकेत ठेवणे वगैरे कामे मदतनीसांच्या साहाय्याने चालली होती. पण मन मात्र मुळीच ठिकाणावर नव्हते. हिवाळ्याच्या दिवसांत दाट धुक्यातून पलीकडे पाहण्याचा प्रयत्न करावा, धुके क्षणमात्र विरळ होऊन पलीकडे काहीतरी ओळखीचे दिसल्याचा भास होऊन ती वस्तू परत धुक्यात गुरफटून जावी तसे मला झाले होते. मी टेकाडावर उभी राहून एकदा चहूकडे नजर टाकली. वाळूचा दर्या अनंत पसरला होता. खाली तळे एखाद्या गोल आरशासारखे नितळ पसरले होते. त्यावर लहानशीसुद्धा लाटेची सुरकुती नव्हती. समुद्र कधीच असा नितळ नसतो, कितीही शांत असला तरी लाटांच्या लहानलहान टेकड्या त्यावर असायच्याच. तसेच अगदी लहान लहान उंचवटे ह्या वाळूच्या समुद्रावर वाऱ्याच्या दिशेने पसरलेले होते. पण ते

काही पाण्यातल्या लाटांसारखे अव्याहत खालीवर हलत नव्हते. ह्या लाटा जणू थिजल्या होत्या. मी त्या लाटांच्या एका उंचवट्यावर उभी होते-दोन्ही बाजूला उथळ खोलगट भाग होता; व त्यापलीकडे दुसऱ्या लाटांचे उंचवटे दिसत होते. क्षितिजापर्यंत अशा वाळूच्या लाटा पसरल्या होत्या. दहा-पंधरा हजार वर्षांपूर्वीही त्या अशाच असणार. हे टेकाड असेच पण जरा ठेंगणे असणार. आत्ता त्यावर गेल्या पंधरा सहस्रकांच्या वाळूचे थर साचले आहेत. त्यावेळी ही रानटी माणसे येथे वस्ती करून होती. अशाच तळ्याचे पाणी पीत होती, आणि... आणि....? धुके क्षणभर बाजूला झाले होते. अज्ञाताच्या पलीकडे ओळखीचा चेहरा दिसल्यासारखा वाटला. पण परत सर्व धुक्यात बुडून गेले. सबंध दिवस असाच गेला. रात्री निजले तीही विमनस्क अवस्थेत... मन व शरीर कशी श्रांत झाल्यासारखी झाली होती.

मी ताडकन उठले. कसला तरी मोठा कोलाहल चालला होता. माझ्या नावाने हाका ऐकू येत होत्या. कसल्या तरी भीतीने मी थिजल्यासारखी झाले होते. पण कोलाहल वाढला. छे:! मला गेलेच पाहिजे. मी चालत जाऊन दाराच्या कडीला हात घातला. इतक्यात विजेच्या दिव्याचा झोत माझ्या अंगावर पडला, व "कोण आहे?" असा माझ्या सहकाऱ्याचा परिचित आवाज कानावर पडून मी जागी झाले. माझे पाय लटपटत होते, तोंडाला कोरड पडली होती. "मी आहे. जरा बाहेर जाऊन येते," असे उत्तर देऊन मी खोलीबाहेर सोप्यात आले. थंडीच्या कडाक्यात माझे अंग शहारले. बाहेर ठेवलेल्या माठातील बर्फासारखे गार पाणी मी घोटभर प्याले. पाणी इतके गार होते की, पाण्याचा घोट तोंडातून पोटापर्यंत पोचला ती सबंध वाट जणू बर्फाने कापीत कापीत गेल्यासारखे वाटले, पण त्यामुळे माझी झोप पार उडाली. मी शुद्धीवर आले. अंधारी रात्र होती. उत्तर गुजरातची कडक थंडी पडली होती. स्वच्छ गडद आकाशात तारे चमकत होते व सर्व सृष्टी अगदी निस्तब्ध शांत होती. मी डोळ्यांवरून हात फिरवला, एक निःश्वास टाकला. खूप रडल्यावर घसा दुखावा, छाती जड वाटावी, तसे मला वाटले. पण मी का उठले? मला कसले स्वप्न पडत होते? काही आठवेना. मी परत आत गेले व माझ्या कोपऱ्यात जाऊन निजले.

ह्यानंतर दुसऱ्याच दिवशी आम्हाला 'ती' सापडली. पहिल्याने तंगडीचे हाड मोकळे झाले, ह्यामुळे माणूस असल्याचा सुगावा लागून कामकऱ्यांना दूर सारले, व आम्ही लहान-लहान हत्यारांनी सावकाशपणे

हाडांच्या अनुरोधाने माती उकरून संबंध सांगाडा मोकळा केला. पायाची हाडे उघडी पडल्यापासूनच मला शंका आली होती. संबंध सांगाडा दिसू लागल्याबरोबर तर शंका फिटली. "कुत्रा पाहिल्यापासून बाईचा सांगाडा मिळणार म्हणून वाटतच होतं... हा घ्या मिळाला!"-- मी म्हटले. "म्हणजे? हिलाही मारून टाकली काय?" माझ्या विद्यार्थ्याने प्रश्न केला. "ह्यात काय संशय? स्वर्गात जसे नोकरचाकर व इमानी कुत्रा लागतो तशी बायको नको का?" त्याच्या प्रश्नाला सांकळियांनी उत्तर दिले. "पण ही बाईच कशावरून?" माझ्याकडे वळून त्यांनी विचारले आणि मी त्यांना व इतरांना सांगाड्याची कमरेची हाडे, हाडाचा हलकेपणा, डोक्याच्या काही विशिष्ट हाडांच्या खुणा ह्यांची माहिती देऊ लागले. हे व्याख्यान संपल्यावर सर्व मंडळी उठली. "हे पहा, सांगाडा आता तुमच्या ताब्यात देतो- तुम्ही फोटोसाठी नीट साफ करून ठेवा. अजून ऊन फार आहे, दोन तासांनी सूर्य मावळायला आला म्हणजे नीट बेताचा प्रकाश पडेल तेव्हा फोटो घेऊ. आम्ही पलीकडे काम सुरू करतो. तुम्हाला कोणी मदतनीस पाहिजे का?" श्री.सांकळिया म्हणाले. मी मानेनेच नकार दिला व सर्व मंडळी निघून गेली. मी एकटीच त्या खड्ड्यात राहिले. वरून ऊन रणरण तापत होते. मी वाकून हलक्या हाताने, सांगाडा न चाळवता, हाड न हाड दाभण, चाकू व कुंचला ह्यांच्या साह्याने साफ करीत होते. पंधरा हजार वर्षांनी मातीच्या पांघरूणातून बाहेर पडून त्यांना सूर्यदर्शन होत होते. बाई पुरुषाप्रमाणेच पाय मुडपून, हात छातीवर ठेवून व डोके कुशीला वळवून पुरलेली होती; पण पुरुषाचा देह केवढा दिसत होता आणि हिच्या हाडाची जुडी केवढ्याशा लहान जागेत मावली होती! शरीराची हाडे साफ करून माझे हात डोक्याकडे वळले. केवढे लहानसे डोके होते! घडणही मोठी नाजूक वाटली. तिच्या गुळगुळीत कवटीवर माझी बोटे फिरत होती व मन यंत्राप्रमाणे नोंद करीत होते; "डोक्याचा मागचा भाग बराच फुगीर आहे बरं का- आणि हे कपाळ जरा अरुंदच आहे." माझा दाभण डोळ्याच्या खाचेतून माती उकरू लागला, डोळ्याची खाच साफ झाली; "ही नाकाची हाडं, त्याखालील भोकं रुंद दिसत आहेत. नाक बसकं न रुंद होतं वाटतं. गालफडाची हाडं लहानच आहेत." माझे हात जबड्यापाशी पोचले. हाडांचा रंग पिवळसर-काळसर मातीच्या रंगासारखाच होता. पण जबड्यावरून ब्रश फिरताच दात उघडे पडून उन्हात चकाकले. माझे हृदय धडधडत होते. जवळच्या खड्ड्यात आणि

काठावर आमच्या माणसांच्या बोलण्याचा आवाज मी जणू स्वप्नात ऐकत होते. ''अक्कलदाढा आलेल्या दिसत नाहीत- फारच तरुण होती.'' ही नोंद मला नकळत मनात होत होती. पण माझे अंत:करण काही विलक्षण हुरहुरीने औत्सुक्याने भरून गेले होते. त्या डोळ्यांच्या खाचात मला बुबुळे हालल्यासारखी वाटली. ते लखलखते दात मागल्या ओळखीने हसल्यागत भासले. माझी बोटे तिच्या अरुंद निमुळत्या हनुवटीशी गुंतली होती, पण हृदय आर्तपणे त्या सांगाड्याला विचारीत होते, ''तू ती मीच का ग? तू ती मीच का ग?''

✿

४

## स्त्री-व संस्कृती

काही वर्षांपूर्वीची गोष्ट. मी थोडे दिवस वाईला राहिले होते. त्याच वाड्यात मराठ्याचे एक तरुण जोडपे होते. नवरा उत्तमपैकी गवंडी होता, व बायको एक-दोन घरी मोलमजुरी करी. दोघेही देखणी, हसतमुख, नेहमी टाकठीक पोशाक केलेली अशी असायची. मी ज्यांच्या घरी राहिले होते त्यांना म्हटले, "कसा जोडा छान आहे, नाही?" ते वयस्क गृहस्थ व त्यांच्या पत्नी दोघेही एकदम म्हणाले, "अहो, दिसायला छान असून काय उपयोग? तो माणूस फार निर्दय आहे. महिना-पंधरवड्यात एकदा तरी बायकोला मारतो." मी म्हटले, "ती तर चांगली आनंदी आणि अंगा-पिंडाने गुटगुटीत दिसते! तिला माराचं काही फारसं वाटत नाहीसं दिसतं." "छे! छे!" काका मान हलवून म्हणाले, "हे तुमचे उदगार फारच अनुदार आहेत. तिला म्हणे माराचं काही वाटत नाही! जणू काय ही रीतच आहे नवरा-बायकोची!" मी ताबडतोब उत्तरले, "हे पाहा... आपण पुढचे चार दिवस तालुक्यात हिंडणार आहोत ना, तर मी माझं काम करीन आणि तुम्ही भेटेल त्या शेतकऱ्याला तो बायकोला कधी मारतो का नाही ते विचारा."

'हो ना' करता करता तसे करायचे ठरले व पुढचे चार दिवस काकांनी प्रत्येक शेतकऱ्याला विचारले, ''काय हो, कधी बायकोला मारता का?'' आणि त्यांना उत्तर मिळायचे, ''हो रोजच नाही काय- कधीमधी लागतंच मारावं.'' काका बिचारे सुधारक, त्यातून अमेरिकेचे पाणी चाखून आलेले; प्रत्येकाकडून हे उत्तर मिळालेले ऐकून त्यांचे हृदय कसे पिळवटून निघायचे! वाईला परत येताना एक खोल निःश्वास टाकून ते मला म्हणाले, ''खरोखर, हिंदुस्थानातले पुरुष सुसंस्कृत कधी होणार कोण जाणे! शिक्षणानं ह्या कार्याला किती वर्षे लागतीलसं वाटतं तुम्हाला?'' काकांच्या प्रश्नाचे उत्तर देण्याचे मी टाळले; कारण सुसंस्कृत काय आणि असंस्कृत काय, आणि कोण सुसंस्कृत ह्याबद्दल मला उमजच पडत नव्हता. मी समाजातील गोष्टी फक्त पाहात होते, आणि संस्कृतीची व्याख्या करणे दिवसेंदिवस जास्त जास्त अवघड वाटू लागले होते.

असाच दुसरा एक अनुभव मला आठवला. बालगुन्हेगारांच्या न्यायालयातील गोष्ट. आमच्यापुढे एक तरुण जोडपे हजर झाले होते. नवऱ्याची फिर्याद होती की, बायको सासरी राहत नाही, सारा वेळ माहेरी पळून जाते. बायको म्हणे, नवरा मारतो. नवऱ्याबरोबर त्याचे आईबाप व बायकोबरोबर तिचे आईबाप आले होते आणि दोघेही आपापल्या लेकरांना भर देत होती. आम्ही बायकोला नवऱ्याच्या स्वाधीन केले, व त्याच्याकडून लिहून घेतले की, बायकोला मारणार नाही. ते जोडपे व त्यांच्याबरोबरचा परिवार निघून गेला, पण परत पंधरा दिवसांनी ही भांडणारी जोडी माघारी आली. परत त्यांच्या कटकटी चालू झाल्या. मी पाहिले तो नवरा-बायकोत खोड ठेवायला काही जागा नव्हती. तो चांगला जवान वीस वर्षांचा होता; ती शोभेशीच चांगली देखणी, धडधाकट, वयाने सुमारे १४-१५ची अशी होती. मी विचारले, ''काय रे, बायकोला मारतोस का?'' तसे तो शरमेने म्हणाला, ''मी कशाला मारतो जी? जवा तवा मला कोडताचा धाक दाखवते.'' तिच्या तोंडावर थोडे तुच्छतेचे व विजयाचे हसू झळकले. मी थोडा विचार करून बायकोच्या आईबापांना व नवऱ्याच्या आईबापांना ह्या जोडप्याच्या बिऱ्हाडी यायला बंदी केली. दोघांकडून जामीन लिहून घेतला आणि नवरा-बायकोला जायला सांगितले. माझा ऑफिसर मला विचारतो, नवऱ्याकडून न मारण्याबद्दल घेतलेला करार संपला आहे, तो परत लिहून घेतला पाहिजे. मी मानेनेच नकार देऊन त्या जोडप्याची बोळवण करून सहा

महिन्यांनी परत कोर्टात हजर राहण्याचा हुकूम दिला. ते प्रकरण गेल्यावर सगळ्यांनी मला विचारले, "आता त्यानं तिचा जीव घेतला तर?" मी म्हटले, "पाहू या काय होतं. तुम्ही लांबून नजर ठेवा, आणि सतरांदा जाऊन त्यांना सतावू नका." मी हे सर्व जवळजवळ विसरून गेले होते, तो सहा महिन्यांनी ऑफिसरने आणून दोघांनाही हजर केले. "काय रे, ठीक चाललं आहे ना?" नवरा ह्या कानापासून त्या कानापर्यंत हसत म्हणाला, "हां जी." बायकोला विचारले, "काय ग, तुझं म्हणणं काय आहे?" ती आज माझ्या डोळ्याला डोळा भिडवायला तयार नव्हती. तिचा बेगुमानपणा पार नाहीसा झाला होता. मी तिला परत विचारले, "नवरा मारतो का ग?" "फार नाही जी." तिने उत्तर दिले. दोघांनाही काहीतरी बोलायचे होते, पण ती घोटाळत उभी होती. इतक्यात तिची आई पुढे झाली व "मुलीला माहेराला न्यायचे आता दिवस आहेत, नेऊ का?" म्हणून विचारू लागली. मी मुकाट्याने दोघा व्याहीविहिणींवरची बंदी उठवली आणि 'शेवट समाधानकारक लागला.' असा शेरा मारून केस निकालात काढली.

आज ह्या पूर्वीच्या गोष्टी पुन्हा आठवल्या. गाडीत मनस्वी गर्दी होती दुसऱ्या वर्गातसुद्धा लोक उभे होते. मी माझ्या पेटीवर एका कोपऱ्यात बसले होते. तो माझे लक्ष पुढेच उभ्या राहिलेल्या एका तरुण बाईकडे गेले, व मी तिला माझ्याजवळ पेटीवर जागा करून बसायला बोलावले. गेला अर्धा तास स्टेशनवर इकडेतिकडे जाताना मी तिला पाहिले होते. आम्ही अगदी जवळजवळ खेटूनच माझ्या लहानशा पेटीवर बसलो. तिने थोड्या वेळाने विचारले, "तुम्ही आमक्या-अमक्या ना?" मी "होय" म्हणून अर्थातच तिला "तुम्ही कोण?" म्हणून प्रश्न केला. तिने आपले नाव सांगितले, मी म्हटले, "हां, तुमच्या कविता मी वाचल्या आहेत; त्याच ना तुम्ही?" तिचा काळासावळा पण मोहक चेहरा आनंदाने खुलला. मला तिचा चेहरा गोड व निर्व्याज वाटला. तिचे बोलणे सरळ व खुलास होते. बांधा ठेंगणाच होता. अंगापिंडानेही ती चांगली सशक्त दिसली. थोडक्यात सांगायचे म्हणजे चार महाराष्ट्रीय बाया असतात तशी ती होती. तिने मोठ्या उत्साहाने आपल्या कामाची माहिती दिली. आपले मुख्य कसे दिलदार आहेत- त्यांचे बोलणे-चालणे कसे मनमोकळे असते, काही चुकले तर ते कसे नीट समजावून सांगतात, वगैरे गोष्टी मला ऐकवल्या. तिच्या कचेरीतील मुख्य मला ठाऊक होते. कोणावरही चटकन छाप बसावी असे ते होते. त्यांचा देह धिप्पाड,

त्यांचे हसणे सात मजली, त्यांचे बोलणे मोठ्यांदा, ज्याला मध्यम स्थितीतील लोक पापभीरूपणा म्हणतात त्यांचा अभाव, स्वभावाने दुष्ट व क्षुद्र नव्हते, पण एकदा शत्रुत्व आले तर शाब्दिक व वेळ पडल्यास शारीरिक हल्ला करण्यास मागेपुढे न पाहणारे असे होते. साहित्यगुणही त्यांच्यात होते. माझ्याशी बोलण्याच्या बाईवर त्यांची छाप पडावी ह्यात काहीच नवल नव्हते. पण बायका बोलायला लागल्या म्हणजे गोष्टी निघायच्याच. ह्या गप्पा झाल्यावर तिने मला विचारले, "मुलं किती? केवढी आहेत? तुमच्याशिवाय राहतात का?" मीही पण तीच चौकशी केली. बाई उत्तरली, "मला मुलं नाहीत." "खरंच, तुमचं लग्न झालं नसेल नाही!" "छे! माझं लग्न झाल्याला झाली चांगली सहा वर्षं!" ती म्हणाली, उगीच आपण मुलांबद्दल प्रश्न विचारले असे वाटून मी गप्प बसले. थोडा वेळ थांबून बाई आपणहूनच म्हणाली, "मी माझ्या नवऱ्याबरोबर राहात नाही" तरीसुद्धा पुढे प्रश्न विचारण्याचा धीर मला होईना. तिलाच काय वाटले कोणास ठाऊक, ती आपली हकीकत पुढे सांगू लागली, "माझे आई-वडील वारले व माझ्या एका चुलत्यानं मला वाढवलं. मी मॅट्रिक झाल्यावर माझ्या मनात नसतानासुद्धा त्यांनी माझं लग्न करून दिलं." "तुमचे यजमान अशिक्षित आहेत होय?" मी विचारले. "छे! छे! ते चांगले एम्. ए., पीएच्.डी. आहेत, पण माझं मनच त्यांच्याकडे ओढलं नाही." मी मनात म्हटले, "कालिदासानेच मुळी तरुण मुलींना मोकळीक दिली आहे ना! 'तो काही विलोभनीय नव्हता असे नाही- तिला काही समजत नव्हते असेही नाही. पण तिला तो नाही आवडला झाले! कारण व्यक्ती तितक्या प्रकृती' असे म्हणून त्याने नाही का इंदुमतीच्या स्वयंवराचे वर्णन केले? बाई, त्या इंदुमतीच्याच परंपरेतील तू!" तरीदेखील माझे चार पावसाळे जास्त झाले होते; नवऱ्याजवळ न राहणाऱ्या बाईचे जीवन किती कठीण ह्याची जाणीव मला होती. तिच्या आत्मविश्वासाचे थोडे कौतुक आणि तिच्या मुग्धपणाबद्दल थोडी करुणा वाटूनच मी विचारले, "लग्न मनाविरुद्ध झालं तरी नवरा जर सद्गुणी व सुशिक्षित असेल तर त्यांचं-आपलं पटत का नाही हे तरी तुम्ही निदान पाहावयाचं होतं! कदाचित सहवासानं प्रेम उत्पन्न झालं असतं." "तोही प्रयत्न मी करून पाहिला," ती म्हणाली. "काय! त्यांचा स्वभाव चमत्कारिक आहे?" मी विचारले. "छे! तसं काही नाही, ते फार सुस्वभावी आहेत, शिकलेले आहेत," ती थोडी थांबली, नंतर मान हलवून

म्हणाली, ''त्यांच्यात तडफ म्हणून नाहीच; ते फारच गरीब आहेत हो! मी त्यांच्याबरोबर बिऱ्हाड थाटून होते की- कधी एक अवाक्षर नाही की रागावणं नाही!'' माझ्या डोक्यात लख्खन प्रकाश पडला. मला माझा वाईचा अनुभव आठवला, मला कोर्टातील केस आठवली, माझ्या ओळखीचे आणखी एक कुटुंब आठवले. गृहस्थ सुसंस्कृत, विद्वान व रसिक होता- त्याचे ते उदास, करुण डोळे, त्याच्या बायकोचा खुला उमदा चेहरा, त्याच्यावर दिसत असलेला आत्मविश्वास, किंचित पुरुषी उद्धटपणा हे आठवले. ते जगात दंपती होते, पण त्यांचे खरे नाते नवरा-बायकोचे नव्हते, मित्र-मैत्रिणीचे नव्हते, तर माता-पुत्राचे होते. कोर्टातील केस सोपी होती, तिचा निकाल समाधानकारकपणे लावता आला... तेथील मंडळी एकमेकांना ओळखून होती; पण मध्यम वर्गाचे सर्वच अर्धवट. माझ्या शेजारी बसलेली तरुण बाई मला विचारीत होती, ''काय हो, आता घटस्फोटाचा कायदा झाला म्हणजे मला नीट काडीमोड मिळेल, नाही का!'' पण माझे मन दुसरेच एक कोडे सोडविण्यात गुंतले होते-- वरवर संस्कृतीची आवरणे असलेल्या, पण आतून रानटी पौरुषाची पूजा करणाऱ्या ह्या 'तडफदार' तरुणी आणि सुसंस्कृत, शिक्षणाने कोमल मनोवृत्ती झालेले अहिंसक तरुण ह्यांची जोडी एकत्र नांदणार कशी!

✿

५

# बीज-क्षेत्र

माझी लेक नवऱ्याशी भांडून त्याला काही न कळवता घरी आली होती. नवरा मारतो व सासू सारखी उणेदुरे बोलते असे ती सांगत होती. मी जी संध्याकाळी कामावरून घरी येते तो धाकटीने दाराशीच सांगितले, ''आपली ताई आली आहे.'' पाठोपाठच मैना आली, माझ्या पाया पडली, व मला मिठी मारून, ''बाई, आता माझं कसं होणार?'' म्हणून रडली होती. ती शांत झाल्यावर मी पण बैठकीच्या खोलीतच लवंडले. ती एकीकडे आपल्या एका वर्षाच्या अचपळ मुलामागे धावत होती व एकीकडे मला घरची हकीकत सांगत होती. मुलगा नुकताच चालायला लागला होता. तो क्षणोक्षणी पडे, जरा तोंड वाकडे करी, की परत उभा राहून डुलत डुलत चालू लागे. तिने त्याला धरून ठेवले की, सुटून जायची धडपड करीत डोके आपटून घेई. असा प्रकार चालला होता. मी म्हटले, ''कमाल आहे बाई, तुझ्या गुंड पोराची! एवढ्यात दहादा लागलं, पण स्वस्थ काही बसत नाही'' ''त्याच्यावर तर किती भांडणं होतात! काल त्याला पाजायला घेतला तर तो अशीच मस्ती करीत होता, आणि एकदम उसळी मारलीन तर

भिंतीवर डोकं आपटलं. मग सासूबाई खूप बोलल्या व त्यांनी मारलं.'' मैनेने खालच्या मानेने सांगितले. ''अग, पण तू त्याची आई. तुला नाही का त्याची काळजी? सांगावं असं सासूबाईंना.'' मैनेची मान वरती झाली, तिचे डोळे चमकले. भुवया रागाने आकुंचित झाल्या. तिने रुद्ध स्वरात उत्तर दिले, ''मी तसं सासूबाईंना सांगितलं, तर त्या म्हणाल्या, ''चूप-चूप, किती तोंड करतेस? म्हणे आई! तू त्याला सांभाळणारी दाई आहेस दाई! म्हणे 'पोसलं माझ्या पोराला!' कुठचा तुझा पोर? तुझ्या कुणग्यात तो पोसला. कुळाचं बीज रक्षण करायला दिलं. तुला खायला घातलं त्या अन्नावर तो पोसला. पहिल्यांदा आत पोसलास, आता बाहेर पोसतेस... दाई ती दाई, आणि वर मिजास पाहा!' पडल्या-पडल्याच मी तिच्या पाठीवरून हात फिरवून तिला शांत केले. पण मनाच्या त्या त्रस्त परिस्थितीतही मला आठवण होऊन क्षणभर हसू लोटले.

''भस्त्रा माता पितु: पुत्र: येन जात: स एव स:।
भरस्व पुत्रं दुष्यन्त मावमंस्था: शकुन्त:लम्॥''

''आई केवळ चामड्याची पिशवी आहे. मुलगा बापाचाच. बापच त्याच्या रूपे जन्म घेतो. हे दुष्यंत राजा, मुलाला सांभाळ, शकुंतलेचा धिक्कार करू नकोस.''

मैनाच्या सासूबाई आणि दुष्यंतराजा ह्यांच्यात किती बरे अंतर? असेल. तीन-चार हजार वर्षांचे. पण ह्या चार हजार वर्षांच्या कालदरीने विभागलेले हे दोन जीव एकाच संस्कृतीने कसे अगदी जवळ बांधले गेले होते!

हाच तो बीजक्षेत्रन्याय. पण त्याचा उपयोग मात्र दुधारी शस्त्रासारखा दुहेरी होई. दुष्यंताच्या परिस्थितीत जेव्हा एखाद्या स्त्रीशी लग्न झाल्याचा पुरावा देता येत नसेल- किंबहुना लग्न झाले नसेल- तेव्हा ज्याचे बीज त्याचे संतान असा युक्तिवाद लढवून मुलावर हक्क सांगायचा आणि जेव्हा पुत्रोत्पत्तीची शक्ती नसेल तेव्हा क्षेत्रावर हक्क सांगून जे उगवेल ते शेताच्या धन्याचे म्हणून त्यावर हक्क सांगायचा व बऱ्यावाईट मार्गाने संतती मिळवायची असा पूर्वीचा राजमार्ग होता.

मातृत्व ही एक नैसर्गिक घटना आहे. पितृत्व हा एक सामाजिक संकेत आहे आणि समाजात नैसर्गिक घटनांपेक्षा सामाजिक संकेतांनाच जास्त प्राधान्य असते- इतकेच नाही तर नैसर्गिक घटनांचा उपयोग सामाजिक

संकेतांना बळकटी आणण्यासाठी होतो. विवाह हाही एक अतिप्रभावी सामाजिक संकेत आहे. त्यात मालकीहक्क आहे, वारसा आहे, संपत्तीच्या सर्व कल्पना केंद्रीभूत झालेल्या आहेत. जिच्याशी लग्न झाले, तिच्यावर नवऱ्याची सर्वस्वी मालकी असते व तिची संतती नवऱ्याची होते. एकदा हा संकेत मान्य केला म्हणजे मूल कोणाच्या बीजाचे हा प्रश्न विवाहबंधनात झालेल्या संततीबद्दल उत्पन्न करून घोटाळा मात्र निर्माण होतो व पूर्वी ह्या प्रश्नाला फारसे महत्त्वही नव्हते. बायको लग्नाची नसली तरच कोणाचे बीज हा प्रश्न उदभवे. विवाहातील व विवाहबाह्य, औरस व अनौरस हे भेद हळूहळू निर्माण झाले.

दुष्यंताच्या कथानकात- म्हणजे कालिदासाचे शाकुंतल नव्हे, तर महाभारतातील आख्यान- घटना मोठी मजेदार आहे. दुष्यंत कोण हे समजून शकुंतला त्याच्या गळ्यात पडली. टाकून दिलेल्या, आश्रमात वाढलेल्या या अनाथ महत्त्वाकांक्षी मुलीने मोठा डाव रचला, मोठे धाडस केले, पण बिचारीला तोंडघशी पडायची पाळी आली होती. ती मुलगा घेऊन राजाच्या राजधानीत गेली, पण राजाने तिला ओळखूनही जणू काही आपण त्या गावचेच नाही असे दाखवले. राजाने तिच्या आईचे चारित्र्य बाहेर काढले, तर शकुंतलेने त्याला दुरुत्तरे केली. 'गाठ पडली ठकाठका' असा हा प्रकार झाला. ती जीव तोडून त्याला दिलेल्या आणाभाकांची आठवण देत होती. ती म्हणे, ''राजा, तू कितीही खोटं बोल. तुला कितीही वाटो की, त्यावेळी तर मी एकटा होतो, माझ्या कृत्याला साक्षी कोणी नव्हतं, पण सूर्य-चंद्र, जल आणि अग्नी, आकाश आणि पृथ्वी, तुझं स्वत:चं हृदय आणि यमधर्म, दिवस-रात्र, सकाळ आणि सांज ही सर्व मनुष्याच्या प्रत्येक कृत्याचं निरीक्षण करतात बरं!'' पण ही सर्व विनवणी व्यर्थ होती. राजाने त्या वेळीच तिला राजधानीत आणले असते तर लग्न न होताही ती त्याच्या अंत:पुरात राहती. पण आता इतक्या वर्षांनी केवळ मुलाच्या आशेने राजाने एका स्वैरिणीचा स्वीकार केला हा ठपका त्याला नको होता. ती त्याच्या घरी राहून मग तिच्या पोटी कोणाचेही पोर असते तरी त्यावर त्याची सत्ता होती. पण केवळ एका वेळी काही वर्षांपूर्वी मी हिच्याशी संगत केली होती असे म्हणून मुलावरील त्याचे पितृत्व सिद्ध होत नव्हते. म्हणून आकाशवाणी व्हावी लागली व 'मुलगा तुझ्या बीजाचा' अशी खात्री पटवून शकुंतलेला त्याला स्वीकारता आली. त्याच्या बीजाची संरक्षक म्हणून तिचे चोज, एरवी नाही.

ह्याउलट विधिपूर्वक सर्वांच्या समक्ष लग्नाची बायको आणली म्हणजे तिच्या पोराच्या मालकीसाठी बीजकर्तृत्वाची मुळी गरजच लागत नव्हती. एकदा स्त्रीवर मालकी सिद्ध झाली म्हणजे मग तिला कुवारपणी, विधवापणी, आपणापासून वा इतरांपासून होणाऱ्या सर्व मुलांचे पितृत्व नवऱ्याकडे असे.

त्या वेळच्या स्त्रियांची कोण ही अनुकंपनीय अवस्था! छे:! आपल्या हल्लीच्या कल्पना त्या काळावर लादणे योग्य नाही. स्त्रीला आपला दीर म्हणजे हक्काचा प्रियकर वाटत असे. दिराबद्दल तिचे विचार काय असतील याची कल्पना हल्लीच्या काही लोकगीतांवरून चांगली करता येते. पुढे-पुढे हे नाते नाहीसे होऊन फक्त निपुत्रिक विधवेलाच संतती निर्माण करण्यासाठी दिराशी संबंध ठेवायची परवानगी होती-

येथर्यंत माझे विचार कसे यंत्रासारखे चालले होते! पण एकदम मला कसली तरी आठवण झाली. कसल्या तरी दु:खद विचाराने माझे हृदय थरारले. मला परत महाभारतातल्या ओळी दिसू लागल्या. त्या प्राचीन काळी एका स्त्रीवर एक भयंकर अत्याचार झाला होता व त्याचे चित्रण इतके जिवंत, इतके विदारक होते की, आजही नुसत्या आठवणीने माझे मन कसे जळत होते! हा अत्याचार काही आताच्या मध्यमवर्गीय नीतिकल्पनांचे स्तोम माजवून मी मनाला भासवून घेतलेला नव्हता. त्या वेळच्या कवीलाही तो तसा वाटला होता.

मी ताडकन उठले. मैनेने विचारले, ''बाई, काय झालं?'' ''काही नाही ते समोरचं लठ्ठ पुस्तक आणून दे.'' आदिपर्वातून तो भाग उघडून मी परत वाचला. म्हाताऱ्या शंतनूने आपल्या पराक्रमी मुलाच्या सुखाचा बळी देऊन एका शीलभ्रष्ट सुंदर पोरीशी लग्न केले होते. ती सत्यवती. तिला दोन मुलगे झाले. एक लग्नाच्या आधी मेला. दुसऱ्यासाठी भीष्माने काशीराजाच्या मुली आणल्या. त्यातली मोठी अंबा. तिने स्वत:ला जाळून घेतले, व दुसऱ्या दोघींचे शंतनूच्या धाकट्या मुलाशी- विचित्रवीर्याशी लग्न- लागले. म्हातारपणाचा हा मुलगाही संतती न होताच मेला. आता पुढे कुलक्षय होणार म्हणून सत्यवतीने, ''भीष्मा, तू लग्न तरी कर, नाही तर भावजयीला संतती तरी निर्माण कर'' म्हणून हट्ट धरला. त्या मानी राजपुत्राने ते ऐकले नाही. तेव्हा सत्यवतीने निर्लज्जपणे आपला कुवारपणाचा वृत्तान्त सांगितला व आपल्या मुलाला-व्यासाला- बोलावण्याचा बेत सांगितला. भीष्माने ह्या बेताला मान डोलावली. ह्यापुढचा कथाभाग असा आहे; ही दुष्ट

सासू आपल्या थोरल्या सुनेला बोलावून मायावीपणे म्हणते, ''कौसल्ये-(काशीकोसलची राजकन्या)- बाई, माझं बोलणं ऐक. आपला कुलक्षयच होणार होता. पण भीष्मानं मला युक्ती सांगितली आहे. नाही म्हणून नकोस. तुझं कल्याण होईल. त्या युक्तीप्रमाणे वागून पुत्राला जन्म दे व वंशवर्धन आणि राज्यवर्धन कर.'' ह्या मोघम बोलण्यात सत्यवतीने भीष्माचे नाव मोठ्या खुबीने गोवले आहे. ''भीष्माची युक्ती' ह्या शब्दाने सुनेला वाटावे की, सासू पुत्रोत्पत्तीसाठी माझ्या शूर दिराची निवड करते म्हणून, व तशी आशा बिचाऱ्या अंबिकेच्या मनात उत्पन्न झाली असे कवीने पुढे स्पष्टच केले आहे. पुढच्या अध्यायाच्या पहिल्या चार कविता म्हणजे मला काव्याची परिसीमाच वाटते. त्या वाचताना जुनी व न बुजलेली जखम परत वाहावी तसे मला होते. प्रत्येक चरणात किती चित्रे डोळ्यांपुढून जातात! आठच ओळींत एका पतित, भ्रष्ट वृद्धेचे कारस्थान, एका अभागी राजकन्येची सुंदर सुंदर स्वप्ने, तिची विटंबना व मानहानी इतक्या घटनांची हकीकत स्पष्ट मोजक्या शब्दांत, गूढपणाचे अवडंबर न माजवता दिलेली आहे.

''ततः सत्यवती काले वधूं स्नातां ऋतौ तदा।
संवेशयन्ती शयने शनकैः वाक्यमब्रवीत।।''

''नंतर योग्य वेळी ऋतुस्नात अशा वधूला शय्यागारात पोहोचवताना सत्यवती खालील शब्द बोलली.''

''कौसल्ये देवरः ते अस्ति सो अद्य त्वानुप्रवेक्ष्यति।
अप्रमत्ता प्रतीक्ष्यैनं निशीय आगमिष्यति।।'

''कौसल्ये, तुझा एक दीर आहे. आज तो तुझ्या ठायी येईल. विनयाने त्याची वाट पाहा, तो आज रात्री येईल.''

(नुसता 'दीर' असा मोघम शब्द आहे. अंबिकेला आपल्या सासूचे पूर्वचरित्र माहीत नव्हते. 'भीष्माने युक्ती सांगितली आहे' असे सर्वस्वी खोटे ती आधी बोललीच होती. शिवाय आपण जो दुष्ट बेत योजला होता तो जणू काय भीष्माचीच युक्ती असेही तिला जगाला भासवायचे होतेच.)

''श्वश्र्वास्तद्वचनं श्रुत्वा शयाना शयने शुभे।
सा चिन्तयत्तदा भीष्ममन्यांश्च कुरुपुङ्गवान।।''

''सासूचे हे भाषण ऐकून सुंदर शय्येवर निजलेली ती मनात भीष्माचे व इतर कुरुवीरांचे चिंतन करू लागली.''

(पहिल्याने सर्व राजांसमक्ष आपल्याला हिरावून नेणाऱ्या भीष्माची

वीरमूर्ती तिच्या डोळ्यांपुढे आली. विचित्रवीर्यासारख्या रोगी नाजूक पुरुषाशी लग्न लागले त्या वेळचा मनोभंग. मनातील सुप्त आशा व आता ती पूर्ण होईल का? अशी सोत्कंठ हुरहुर.... नंतर लगेच त्याची ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा तिला आठवली असावी- छे:! तो कसचा येतो?- मग कोण बरं? म्हणून कौरवांच्या दरबारातील इतर वीरकौरवांच्या मूर्ती ती आठवते.)

''ततो अम्बिकायां प्रथमं नियुक्तः सत्यवाग ऋषिः।
दीप्यमानेषु दीपेषु शयनं प्रविवेश ह।।''

''नंतर अंबिकेसाठी योजलेला सत्यवाक ऋषी दिव्यांनी उजळलेल्या त्या शय्यागृहात आला.''

(शय्यागारात व अंबिकेच्या सोत्कंठ हृदयांत आशेचे दीप पाजळले होते.)

''तस्य कृष्णस्य कपिला जटा दीप्ते च लोचने।
ब्रभ्रूणि चैव श्मश्रूणि दृष्ट्वा देवी न्यमीलयत।।''

''त्या काळ्या पुरुषाच्या तांबड्या जटा, अंगारासारखे डोळे व पिंगट मिशा पाहून देवी अंधारली.''

(न्यमीलयत= निमिमील। (कालिदास: रघुवंश; आठवा सर्ग- ''निमिमील नरोत्तमप्रिया हृच्चन्द्रा तमसेव कौमुदी।'' ''चन्द्र गेल्याने कौमुदी जशी अंधारात विलीन होते तशी चैतन्याने स्फुरणारी राणी काळोखली- मेली.'') अंबिकेचे शय्यागृह व हृदय तसेच आशेने पाजळले होते- तिचे शरीर राहिले, पण हृदयाचे- आशेचे- कोळसे झाले.)

आणि अजून माझे मन त्या अभागी जीवाच्या या भयंकर विटंबनेने बधिर होते. ही बीजक्षेत्रन्यायाची विटंबना आहे, 'दीर' शब्दाची विटंबना आहे, ही एका कोळ्याच्या पोरीने क्षत्रिय कुळाची केलेली विटंबना आहे, की-की भीष्माने आपल्या महत्त्वाकांक्षी, शीलभ्रष्ट सावत्र आईवर उगवलेला भयंकर सूड आहे?

✿

६

# मारीकुट्टी

गाडी स्टेशनात उभीच होती. शोधता शोधता बायांच्या दुसऱ्या वर्गाच्या डब्यावर माझ्या नावाची चिठ्ठी आढळली व मी दार उघडून आत शिरले. सामान वगैरे लावून झाल्यावर बरोबरच्या गृहस्थांना निरोप दिला व पुढच्या चोवीस तासांच्या माझ्या वसतिगृहात सभोवार पाहिले. आणखी दोन बाया डब्यात होत्या- एक मध्यम वयाची व एक तरुण. ती तरुण बाई पोचवायला आलेल्या गृहस्थाशी जोरजोराने हातवारे करीत, मधूनमधून हसत, हसत कुठच्या तरी द्रविड भाषेत बोलत होती. एवढ्यात शिटी झाली, गाडी हलली व थोड्याच वेळात आम्ही मद्रासचे स्टेशन मागे टाकले. त्या तरुण बाईने माझ्याकडे वळून विचारले, ‘‘वेय्यर गोय्यिंग?’’ मी म्हटले, ‘‘कोचीन.’’ लगेच तिने टाळी वाजवली व त्या वयस्क बाईकडे वळून म्हणाली, ‘‘आऊ फन्नी! वि आर आल्ल गोय्यिंग सेम टौन!’’ मद्रासहून कोचीनकडे जाणाऱ्या गाडीच्या एका डब्यात कोचीनला जाणारी तीन माणसे असावीत ह्यात नवल काहीच नव्हते. पण तिला तसे वाटले खरे! ती मनापासून हसली व तिच्या काळ्याकुट्ट चेहऱ्यावर तिच्या पांढऱ्या शुभ्र

दातांचा प्रकाश पडला. किती कुरूप होती ती! तिचे कपाळ अरुंद होते, केस काळेभोर आणि भुंग्यासारखे कुरळलेले, नाक बसके नि फेंदारलेले व ओठ बरेच जाड. तिचे इंग्रजी बोलणे पण कानाला कसेसेच लागे. कुठलेच वाक्य ती व्याकरणशुद्ध बोलत नव्हती; आणि त्यातून जवळजवळ प्रत्येक शेवटचे व्यंजन द्वित्त म्हणायची तिची लकब आणि 'ओ'च्या जागी 'वो', 'ई'च्या जागी 'यी' व 'ग'च्या जागी 'क' म्हणण्यामुळे तिचे बोलणे पण कानाला कठोर लागत होते. ती धाडकन माझ्याशेजारी बसली व माझ्याकडे वळून म्हणाली, "माझे नाव आहे मारीकुट्टी (छोटी मेरी)." ती दुसरी बाई म्हणाली, "माझे नाव आहे सारम्मा (सेराबाई)." अर्थात मलाही म्हणावेच लागले, "माझे नाव-" इतक्यात पंखांची फडफड झाली, व मी चकित होऊन इकडेतिकडे पाहिले तो समोरच माझ्या पेटीवर एक मोठे थोरले टोपले ठेवलेले दिसले. त्यातूनच पक्ष्यांचा फडफड शब्द ऐकू आला. कोंबड्या दिसताहेत- आता माझ्या पेटीची काय घाण होईल देव जाणे! असे मनात येऊन मी 'कोंबड्या कुणाच्या?" म्हणून विचारण्यासाठी मारीकुट्टीकडे नजर टाकली. ती सारम्माशी बोलण्यात गर्क झाली होती. इतक्यात तिच्या डोक्यात काहीतरी हलल्याचा भास झाला आणि मला एक विलक्षण दृश्य दिसले- मारीकुट्टीच्या काळ्याभोर कुरळ्या केसांत एक पांढरीशुभ्र 'ऊ' प्रवास करीत होती. त्या दाट कुरळलेल्या केसांत प्रवास करणे काय सोपी गोष्ट होती? ती ऊ केसाच्या मळसूत्राकार गुंडाळीत सापडली होती की ती फिरून परत पहिल्या जागीच येई. मला अगदी शिसारी आली. पण माझे डोळे तेथून हलेचनात. ती 'ऊ' गोलगोल हिंडून थकून जाईल की तिला पुढचा मार्ग सापडेल ही जणू काय मला काळजी लागली होती. एवढ्यात मारी नाक फेंदारून कर्कश हसली. तिचे ते रूप, ते बोलणे, त्या घाणेरड्या कोंबड्या व ती ऊ! माझ्या मनात घृणा उत्पन्न होऊन, नको ते दृश्य म्हणून मी एक पुस्तक काढून शक्य तो लांब कोपऱ्यात अंग चोरून बसून वाचावयास सुरुवात केली.

अर्धा तास झाला असेल. डब्यात सामसूम होते. ती स्तब्धता मला जाणवून मी वर पाहिले तो सारम्मा पलीकडच्या बाकावर पाय लांबवून पडली होती व मारीकुट्टी माझी पेटी शेतखान्यासमोर ओढून, शेतखान्याचे दार उघडे टाकून, एका हातावर हनुवटी टाकून एकाग्रतेने पायखान्याच्या खोलीत टक लावून बसली होती. तिच्या तोंडावरून ती भावनावश झालेली

दिसत होती. ही विचित्र बाई अशी काय बसली आहे असा माझ्या मनात विचार येतो तोच ती उदगारली, "माझी छबडी ती! जाईच्या फुलांची रास घातली आहे जणू! सिस्टर, बघा ना जरा-" सारम्मा तर उठलीच पण मीही हा प्रकार काय आहे, म्हणून पुढे होऊन उघड्या दारातून शेतखान्यात डोकावले. तोंड धुवायच्या भांड्याखाली मोकळी जागा असते तेथे पाच लहान पांढरीशुभ्र कबुतरे बाजरी खात होती- डौलाने चालत होती- घशातून लाडिक आवाज काढीत होती. मी मारीकुट्टीकडे पाहिले- तिच्या डोळ्यांतून वात्सल्य ओसंडून जात होते. ती सांगत होती, "बिचारी कालपासून त्या टोपलीत कोंडून पडली होती! आता पहा जरा हलायला मिळाले तर कशी खुशालली आहेत ती! माझी जाईची फुलं ती!" तिने एकेकाला उचलून कुरवाळले, क्षणभर आपले गाल त्यांच्या शुभ्र अंगावर टेकले व त्यांना उचलून परत टोपल्यात ठेवले. मी मात्र स्तिमित नजरेने मारीकुट्टीकडे पाहात होते. तिच्या कुरूप चेहऱ्यामागे लपलेले जाईच्या फुलासारखे कोमल, काव्यमय हृदय कसे ढगाआडच्या सूर्यप्रकाशासारखे आल्हाददायक वाटत होते! ती परत माझ्या शेजारी येऊन बसली. मी खिडकीतून बाहेर पाहू लागले. "अंधारात बाहेर काय पाहता आहा?" मी म्हटले, "छे! बाहेर अंधार नाही- पूर्णिमा चार दिवसांवर आली नाही का? पाहा कसं चांदणं पडलं आहे ते!" ती माझ्या खिडकीशी येऊन दोन क्षण मुकाट्याने बाहेर डोकावून पाहात होती. एक निश्वास टाकून ती म्हणाली, "ह्या वेळी आम्ही पुनवेचा चंद्र परस्परांच्या सहवासात पाहू." मला तिच्या बोलण्याचा अर्थ कळला नाही. वाक्य तर ती संबंध डबाभर ऐकू जाईल एवढ्या मोठ्याने म्हणाली होती. मी हळूच विचारले, "तुम्ही काय म्हणता मी उमजले नाही." ती सांगू लागली, "त्याचं असं आहे, मी घरापासून शेकडो मैल दूर राहाते. मागच्या वेळी मी नोकरीच्या गावी गेले, आई लागली रडायला. तशी मी तिला म्हटले, 'हे बघ आई, मी तुला दर दोन दिशी पत्र पाठवीन आणि दर पुनवेला बरोबर आठ वाजता चंद्राकडे पाहा, मी पण पाहीन- एकाच चंद्राकडे दोघींनी एकाच वेळी पाहिलं म्हणजे एकमेकींशी बोलल्यासारखंच आहे.' गेल्या वर्षभर तसंच केलं. आता पुढचा चंद्र मात्र घरच्या अंगणात आईजवळ बसून बघेन मी." त्या विलक्षण बाईने अगदी सहजगत्या सांगितले- मला आश्चर्याचा आणखी एक धक्का बसला. तिचे बोलणे, हसणे सगळे कसे अगदी लहान मुलासारखे भाबडेपणाचे होते! तिच्या भावनात काव्य होते व तिचे

मन मुलासारखे सरळ होते. त्यात गुंतागुंत नव्हती, साशंकता नव्हती- आयुष्यात जे पडेल ते करायचे, जे मनात येईल ते बोलायचे. काय तिला कधी धक्के बसलेच नव्हते का? इतका का तिच्या जीवनाचा मार्ग सरळ गेला होता? मी तिला विचारले, ''तुम्ही काय करता? कॉलेजात असता होय?'' ''छे, छे! मी वेड्यांच्या एका इस्पितळात मुख्य नर्स आहे.'' तिने सांगितले. ''वेड्याच्या संगतीत संबंध दिवस घालवायचा म्हणजे फार कठीण नव्हे का?'' मी विचारले. ''नाही हो, मुळीच नाही. उलट दवाखान्यातल्या कण्हणाऱ्या-कुंथणाऱ्या रोग्यांपरीस हे बरं! मुलांसारखं त्यांचं करावं- त्यांचं मन रमवावं. आठवड्यातून दोनदा मोटारीत घालून त्यांना फिरायला नेते. कोणाला वाटतं आपण राणी आहोत, म्हणून तिच्याशी तसं बोलावं; एकाला वाटतं, मी मोठा वकील आहे, म्हणून त्याच्याशी कोर्ट-कचेरीची बोलणी काढावी; एकीला वाटतं की, तिला खूप मुलं आहेत- तिला बाहुल्या आणून दिल्या आहेत- रोज ती आपल्या मुलांच्या गोष्टी सांगते. आणि खरं सांगू का हो, ती लहानपणीच विधवा झाली आहे. तिला हो कुठची मुलं?'' मारीकुट्टी मोठ्याने व मनापासून हसली. मला क्षणभर त्या हसण्याचा राग आला; पण मग लक्षात आले की, मारी हसली ती काही दुष्टपणाने नव्हे- केवळ बालिशपणामुळे. जिला कधी मूल झालेच नाही तिने आपल्याला मुले आहेत म्हणून सांगावे हा विरोधाभास तिच्या बुद्धीला कळला. त्याच्यामागच्या भग्न मनोरथांचे आकलन होण्याइतकी ती मोठी झाली नव्हती- नाही, कधीही होणार नाही. तिचे म्हणणे बरोबर होते. एरवीचे रोगी आयुष्याच्या झगड्यात दुखावलेले, पराजित झालेले, सदा कष्टी असे असतात; पण वेड्यांचे तसे नाही. त्यांना आयुष्यात जे मिळवता आले नाही ते मिळवलेच ह्या गोड भ्रांतीत ते आनंदात असतात. त्यांनी जीवनाचा पराजय करून हेचि देही हेचि डोळा निर्वाण- इच्छापूर्ती-गाठलेली असते. ते वेडे आणि ही सदा मूल असलेली त्यांची नर्स! योग्य ठिकाणी योग्य माणूस पडले बुवा! हा विचार माझ्या मनात आला-

शेजारच्या बाकावरची सारम्मा मोठ्याने हसली. ''काय हो, तुम्हाला हसायला काय झालं?'' सारम्मा पडल्या पडल्याच म्हणाली, ''मला ह्या मारीची गंमत वाटली. आता पाहा कशा गप्पा सांगते आहे! दहा-बारा वर्षांपूर्वी तुम्ही तिला पाहायची होतीत. एवढीशी काटकुळी पोर होती. नुकतीच नर्सचं शिक्षण घेण्यापूर्वी माझ्या हाताखाली आली होती. सारखी

रडायची, धड खायची नाही, प्यायची नाही. चोरासारखी वावरायची. कधी प्रश्न विचारला तर दोन शब्द बाहेर पडायचे नाहीत तिच्या तोंडातून. काल इतक्या वर्षांनी अचानक गाडीत एकदम भेट झाली. मला ओळखलीच नाही तीच ही मारी म्हणून. मारी पण हसली व मान वेळावून म्हणाली, ''सिस्टर, त्या वेळी माझी स्थिती निराळी होती. मी अनोळखी माणसांत आले होते. मला नर्सच्या कामाची इतकी शिसारी यायची की काम केलेल्या हातानं काही खाऊ-पिऊ नये असं वाटायचं.'' मला पटले तिचे. शरीरशास्त्र शिकवताना प्रेताची हळूहळू चाकूने चिरफाड करावी लागे त्यावेळी पहिल्या-पहिल्याने मला अगदी असेच होई. मी विचारले, ''तुम्हाला जर ह्या कामाची इतकी शिसारी तर त्यात शिरला कशाला?''

''मला गत्यंतरच नव्हतं.'' ती म्हणाली. ''माझे बाबा होते तोवर एखाद्या राणीसारखी माझी परिस्थिती होती. घरात इकडची काडी तिकडे करू द्यायचे नाहीत. पण ते अगदी ऐन उमेदीत वारले. त्यांचा धंद्यात गुंतवलेला पैसा बुडला, कारण आम्हाला त्यात काहीच समजत नव्हते. पाच भाऊ माझ्या पाठचे- मग काय करायचे? गावच्या पाद्यांच्या वशिल्यानं आईनं माझी नर्स म्हणून शिकण्याची व्यवस्था केली. आता भाऊ मिळवते आहेत- कुटुंब सावरलं आहे. आई म्हणते नोकरी सोड म्हणून. मण मलाच बरं वाटत नाही भावांच्याकडे तुकडे मोडणं.'' ही सर्व हकीकत तिने सहज नेहमीच्या स्वरात सांगितली. त्यात दुःख नव्हते, स्वतःबद्दल कीव नव्हती. की अभिमान नव्हता. ती काही स्थितप्रज्ञ नव्हती. तिला सुख-दुःखे सारखी नव्हती. तिचे मन काही योग्यासारखे मानवी व्यवहारापासून अलिप्त नव्हते. उलट ती जीवनात पूर्णपणे बुडालेली होती. अगदी लहान सहान गोष्टीतून ती स्वतःला आनंद निर्माण करीत होती आणि स्वतःला नकळत जिथे जाईल तिथे आनंद पसरीत होती. आताच पाहा ना, ती मला पुढे सांगू लागली, ''आणखी आता मला नोकरी चांगली आहे. माझं बिऱ्हाड सुरेख आहे. आठवड्यातून दोनदा सिंहाचलमवर गेलं की समोरचं बंदर व पुढे पसरलेला अफाट समुद्र कितीदा जरी पाहिला तरी परत-परत पाहावासा वाटतो. आता मला पारूरसारख्या लहान गावात करमणार पण नाही.'' ''म्हणजे तुम्ही विजगापट्टमला असता वाटतं?'' मी विचारले. ''नाही, वाल्टेरला- तिथून कधीकधी बंदरावर जाते. पण आमचं इस्पितळ वाल्टेरला आहे. तुम्ही पाहिलं आहेत का? फार छान शहर आहे, नाही?''

''खरंच छान आहे. ते विक्रमदेव कॉलेज आणि काजूच्या झाडांचा माळ तर मला छान आठवतात,'' मी मनापासून म्हटले. ''आणखी वाल्टेर म्हटलं म्हणजे मला भाजलेल्या काजूंचा खमंग वास येऊ लागतो. आम्ही किती काजू विकत घेतले आणि आजारी पडेपर्यंत खाल्ले! तशीच तुमच्या वाल्टेरची आंब्याची साठी- बर्फीसारखी जाड आणि मधुर.''

आपल्या शहराची स्तुती ऐकून मारी खुशालली. सारम्मा पलीकडून म्हणाली, ''काय म्हणता वाल्टेर इतकं छान आहे! मला तर वाटतं, मद्रासइतकं सुंदर शहर नाही. समुद्रकाठचा मोठा रस्ता व सुंदर-सुंदर इमारती! तुम्हाला नाही आवडत मद्रास? तुम्ही मद्रासलाच राहता ना?''

तसे पाहिले तर मद्रास मला कधीच विशेष सुंदर वाटले नव्हते, पण मद्रासबद्दल मत सांगणे नको म्हणून मी म्हटले, ''छे! मी मद्रासची नाही... कोचीनची गाडी पकडण्यासाठी मला मद्रासला यावं लागलं. मी आहे पुण्याची.'' ''अहो तुमचं पुणं कसं आहे हो? आणि कशाबद्दल प्रसिद्ध आहे?'' मारीने विचारले.

''आता मात्र पंचाईत आली खरी. पुण्याबद्दल कोणी काही विचारले म्हणजे माझी त्रेधा उडते. बाकीच्या किती गावांविषयी वा शहरांविषयी बरेवाईट मत देताना माझी जीभ मुळीच अडखळत नाही. पण कुणी पुण्याबद्दल विचारले म्हणजे मला अगदी पेचात पडल्यासारखे होते. पुणे म्हणजे इतर गावांसारखेच एक गाव आहे, त्याला रूप आहे, त्याला वाण आहे, त्याला गुण आहेत व त्या सर्वांचे नीट योग्य शब्दांत वर्णन करता येईल ही कल्पनाच मला करता येत नाही. आपल्याला अतिपरिचय नसलेल्या माणसांबद्दल कोणी काही विचारले तर आपण नाही का चटदिशी उत्तर देऊन मोकळे होत? पण तेच अगदी आपल्या जवळच्या माणसाच्या स्वभावाबद्दल आपल्याला काही सांगणे कसे जड जाते? तसेच माझे पुण्याबद्दल होते. पुणे म्हटले म्हणजे हजारो चित्रे माझ्या डोळ्यांपुढून जातात- हजारो आठवणी गर्दी करून उसळतात व त्यातील कुठचे पुणे हेच मला ठरवता येत नाही. लहानपणी तपकीरगल्लीतून बाहेर पडले की किर्लोस्कर नाटकगृहापासून तो बाहुलीच्या हौदापर्यंतचा रस्ता म्हणजे मला एक माणसांचा समुद्र वाटे, व दार्जीचा हात धरून मंडईपर्यंत जाऊन आल्यावर केवढा पराक्रम केला अशा फुशारकीत मी असे. जरा मोठी झाल्यावर फुटक्या बुरुजावरून शनिवारच्या रस्त्याने पांजरपोळातून हसबनिसांच्या बोळात एका मैत्रिणीकडे जात-येत

७

# गौराई

मुले खेळत होती. मधूनमधून गौरीचा आवाज ऐकू येई, ''माधव, आता तुझी पाळी. आता तू मास्तर हो, आम्ही मुलं होतो... अरे, असं काय? ताठ उभं राहून मोठ्यानं बोल ना? असं तोंडातल्या तोंडात का बोलतात मास्तर?...'' मध्येच कशानेसा चंदू रडू लागला. परत गौरीचा आवाज ऐकू आला, ''बघू रे, लागलं का आहे? हात्तिच्या! काहीसुद्धा लागलं नाही, आणि आपला उगीच गळा काढून काय रडतोस? सांगते ना? ऊठ बघू.'' तिचा स्वर उंचावला, मी मुलांना हाक मारली, त्यांच्या हातावर खाऊ ठेवला आणि गौरीला म्हटले, ''गौरे, का ग सारखी त्या चंदूला दटावतेस? पाहावं तेव्हा आपलं तुझं गुरकावणं चालू असतं. नीट खेळावं.'' ''अगं, पण मी काही उगीच बोलत नाही. सारखा एवढंसं झालं म्हणजे 'यँ-यँ' करतो म्हणून म्हटलं...'' असे पुटपुटून ती आपल्या मित्रांना घेऊन पळालीसुद्धा. आणि रोज हे असेच चालायचे. तिघेजण बरोबरीचीच, पण जेव्हा पाहावे तेव्हा ही त्यांना शिकवायची, त्यांची समजूत घालायची, प्रसंग पटल्यास त्यांचा कैवार घेऊन आमच्याशी भांडेसुद्धा. ''गौराई

आमची बाळाई-सकरुबा आमचा जावाई.'' मला बायकांचे गाणे आठवले. गौरी महाराष्ट्राचे माहेरवाशिणीचे प्रतीक, तर भोळा शंकर जावयाच्या स्थानी योजलेला.

आमच्या शेजारीच पाहा ना! तीन भोळे रागीट शंकर आहेत. थोरला भोळसर, मधला रागीट व धाकटा हेकट. पण त्यांच्या घरची गौराई तिघांना पुरून उरते. दिसायला कशी नाजूक दिसते! जयदेवाची सगळी मृदु व्यंजने घालावी तिच्या वर्णनासाठी! ठेंगणी, गोरी, नाजूक हसणे, मृदू बोलणे, बोलताना किंचित मान खाली घातलेली, टपोऱ्या डोळ्यांवर पापणी अर्धवट मिटलेली; पण अशी पक्की आहे! बोलता बोलता जरा मान उचलून तिने डोळे पूर्ण उघडले म्हणजे लक्षात येते की, मांजरडोळ्यांची ही पोर चांगली वस्ताद आहे. थोरल्याच्या दादागिरीला ती दाद देत नाही; मधल्याचा रागीटपणा तिच्यापुढे चालत नाही; धाकट्याला ती नीटपणे प्रेमाने सांभाळील, पण हट्टबिट्ट मुळीच चालायचा नाही हो तिच्यापुढे!... तसेच ते समोरचे बिऱ्हाड. सगळी मुले काळी-सावळी, पण मुली दिसायला हुशार, हसतमुख, तोंड भरून बोलणाऱ्या, आणि मुलगे सगळे संकोची, मागे-मागे राहणारे!

जी स्थिती मुलींची तीच मोठ्या बायांची. आमची गया आली म्हणजे फाटकातच तिची सलामी होई. कुत्र्याच्या अंगावर हात फिरवील, मांजराला उचलून घेईल, ''काय भागूजी, बागेत काय लावलं आहेस?'' म्हणून माळ्याला विचारील. घरात आली म्हणजे धाकटीला गाणे म्हणून दाखवील. ''वा ताईबाई! माझ्यापरीस मोठ्या दिसता की!'' म्हणून ताईला म्हणेल. आणि मग चहा पिता पिता आपल्या घरच्या सगळ्या हकीकती सांगेल. चार महिने झाले, आली होती. मी म्हटले, ''अग या इतक्या लांब कशाला आलीस एवढं पोट घेऊन?... तोंड कसं सुकलं आहे?'' ती म्हणाली, ''बाई, मी निरोप पाठवला म्हणजे एवढी अंगणातली खाट द्या पाठवून तीन महिन्यांसाठी.'', ''हात्तिच्या! एवढ्यासाठी का इथंवर आलीस? निरोप का नाही लावलास?'' ती हसली, ''तुम्हाला माहीत नाही का घरधन्याचा सोभाव? ते काही यायचे नाहीत. मग काय करू? 'बाईंनी कबूल केलं तर खाट न्यायला येईन!' असं बोललेत मात्र.'' ती गेल्यावर आठ दिवसांतच तिचा नवरा छकडा घेऊन खाट न्यायला आला. बाहेरच्या बाहेरच जात होता, पण मी थांबवले व विचारले, ''कधी बाळंत झाली गया?'' ''काल.'' त्याने उत्तर दिले. ''काय झालं?'' त्याने तोंडातल्या तोंडात पुटपुटत खालच्या मानेने उत्तर दिले ते मला नीट ऐकूच

आले नाही. ''ठीक आहे न गया?'' ''होय जी.'' असे तो परत पुटपुटला व आता ही बाई विचारणार तरी काय-काय या भीतीने खालच्या मानेने आपला चालू लागला. गया बाळाला घेऊन आल्यावर मी तिला ही हकीकत सांगितली. तशी ती पोटभर हसली व मान वेळावून म्हणाली, ''तसेच हैत ते. कोणाशी बोलायचं म्हंजे जिवावर येतं त्यांना. मी एवढी घरात बोलते ना, पण ते निसते हूं म्हंतील. नाही तर नाही म्हंतील. आन निसते भोळे सांब! माजी सासू सांगेल ते ऐकायचं. आता कुटं चार पोरं झाल्यावर मी काय सांगते ते ऐकतात.''

बजाबाई तर आली म्हणजे सगळ्या घरादाराला जाहिरात लागते. ''अहो माळीदादा, बाई हैत का?'' अशी खणखणीत आरोळी ऐकू आली की, घरातली माणसे मला म्हणतात, ''हं. आला वाटतं तुझा पठाण!'' उंचनिंच, हाडाने रुंद अशी आहे ती. रूपसुद्धा चांगले आहे, पण कष्टाने चेहरा सुकलेला. बिचारी विधवा आहे आणि आपल्या दोन भावांचा संसार करते. भावजय घरात शिजवते, भाऊ धारा काढून गावात दूध विकतो, आणि गोवऱ्या करणे, म्हशी विकणे, विकत घेणे, चार माणसांजवळ गोड बोलून कर्ज काढणे, ते फेडणे, म्हशीचे गवत, पेंड, सरकी विकत घेणे आणि अगदी तिच्या मर्जीतल्या खाशा गिऱ्हाईकांना स्वत: दूध घालणे हे सगळे ती स्वत: करते. मावळातल्या भावांकडून चिंच आली की ती विकणे, काकड्यांची गाडी आली की भावाला घेऊन जाऊन आपल्या मोजक्या गिऱ्हाईकांना पाट्या ओपून त्याला पैसे करून देणे; कशी बाई एकटी एवढी कामे करते कोण जाणे!- भाऊसुद्धा चांगले कामसू आणि देखणे, पण तिच्यासारखा व्यवहार काही त्यांना जमत नाही. तिची सगळ्या कुटुंबावर हुकूमत, पण ती काही नुसती बसून हुकूम सोडणारी नाही. तिचा अधिकार कष्टाने, प्रेमाने मिळविलेला आहे. आज स्वारी संध्याकाळी आली, ''बाई, कावो माज्या भावाला परत लावला? मी इचारायला लावला होता 'बाईंना चीच हवी का?' म्हणून.'' मी म्हटले, ''अग, मला काय माहीत तुझा भाऊ म्हणून! इथे फाटकाबाहेर घोटाळत होता; मुलांनी विचारलं, 'काय पाहिजे?' म्हणून तशी म्हणतो, 'माळीबाबा कुठं हायेत?' भागू घरी नव्हता. मी म्हटलं, 'कोण उगीच रेंगाळतो आहे?' 'जा' म्हणून सांगितलं.'' तशी ती अगदी गयाबाईसारखीच हसली नि मान वेळावून म्हणाली, ''आता काय करावं? निसते भोळे सांब हती. तरी म्यां नीट सांगितलं होतं, बाईंना इचार म्हणून.''

महाराष्ट्रात फिरता फिरता अशा किती गौराया मी पाहिल्या आहेत! किती कष्ट करतात! किती अधिकार गाजवतात! गौरीचा लाडिकपणा, गौरीचा भोळेपणा, गौरीचा प्रेमळपणा, सगळे त्यांच्यात दिसून येते. ती हिमालयाची मुलगी, तर ह्या सह्याद्रीच्या माहेरवाशिणी. वन्य, राकट, पण प्रेमळ. आपल्या तापट रानटी भावांना सांभाळणाऱ्या, आपल्या रागीट नवऱ्यांना ताळ्यावर आणणाऱ्या, भोळ्या सदाशिवांच्या डोक्यावर बसलेल्या अशा पार्वत्या सर्व जातींत सर्व महाराष्ट्रभर दिसतात. त्यांना उत्तरेकडील सुसंस्कृत रुबाबी-नबाबी बोलणे-चालणे माहीत नसेल, त्यांच्या हास्यात नाजूकपणा नसेल, त्यांच्या जिभेच्या रासवटपणात प्रेमाचा ओलावा कोणाला दिसत नसेल तर ते पाहणाऱ्यांचे दुर्दैव. बजाबाई विधवा होऊन वीस वर्षे झाली असतील. नवऱ्याचे दुःख ती कधी कोणाला दाखवीत नाही; पण नुकतीच ती नवीन लुगडे नेसून आली होती तेव्हा मी तिला म्हणाले, "बनाबाई, भाऊ अगदी चोज करतात नाही तुझे? काय सुरेख लुगडं घेतलं आहे!" तशी तिचे हसे मावळले. सुकलेला चेहरा एकदम उदासीन व दुःखी दिसला. ती बोलली तेसुद्धा स्वतःच्या शब्दांत नाही, तर तिच्या देशातील स्त्रियांच्या अनंत अज्ञात पिढ्यांनी दोन ओळींच्या साठवलेल्या त्यांच्या हृदयाच्या व्यथेत. ती म्हणाली, "बाई, काय करायची दिराभावाची पालखी? भर्तारावाचुनि नार दिसते हालकी!"

आमची माळीणबाई अगदी म्हातारी झालेली आहे. तिचा नवरा तर कित्येक वर्षे काम करीत नाही. त्यातून गेले वर्षभर त्याला भ्रम झालेला. तो नाही-नाही ते बायकोकडून मागतो. पण ती बिचारी त्याचे सगळे कोड पुरविते. परवा डोक्यावरची पाटी अंगणात ठेवून जरा विश्रांतीसाठी खाली बसली. मी म्हटले, "काय माळीणबाई, कसं काय माळीबुवा, बरे आहेत ना?" ती कावून-थकून गेली होती. "नुसता तरास हाय बाई! आज मला म्हनतात, 'तू कुनाकडे भाजी इकू नकोस. मी नाही तुला जाऊ देणार.' मी त्यांना चुकवून आले बघा. भाजी इकूं नको तर खायला काय घालू कपाळ!" आमचा भागू तरुण आणि फटकळ. तो म्हणतो, "काय म्हाताऱ्याचा वनवास आहे तुम्हाला? एकदा गेला तर सुटाल तरी." "नग-नग. भागुजी, असं म्हनूं नये रे राजा. तुला काय ठावं त्यांनी मला किती सुखाचे दिवस दावले ते!" म्हातारीने डोळे टिपले. अशी ही शंकर पार्वतीची सदा भांडणारी, सदा रुसणारी, गळ्यात गळा घालणारी जोडी आहे.

मुलांचा खेळ संपला होता. तिघेजण फाटकाशी उभी होती. गौरी बोलत होती, ''माधव, तूं इथे उभा रहा. मी चंदूला पोचवून येते बरं का?'' तिने चंदूला दहा पावलांवर असणाऱ्या त्याच्या घराच्या फाटकाशी पोचवले. ''नीट जा हं चंदू. धावू नकोस. पडशील वाळूवर.'' असे त्याला बजावून ती परत आली, माधवचा हात धरला आणि म्हणाली, ''चल महाद्या, तुला पोचवते.'' आणि तो महादेव पण मुकाट्याने तिचा हात धरून चालू लागला. मी हसत गुणगुणले, ''गौराई आमुची बाळाई, सकरुबा आमचा जावाई.''

✿

८

# एकेश्वरी पंथाचा विजय

भावोजी मला नेहमीच सनातनी व बुरसटलेली म्हणतात. पहिल्याने मला त्याचा राग येई, मग-मग गम्मत वाटे, पण आज मात्र जुनेपणाची जाणीव मला तीव्रतेने होते आहे. आज माझे मलाच कळते आहे की, मी गतिमान (dynamic) तर नाहीच नाही, पण नुसती स्थितीमान (static)सुद्धा नाही, तर सर्वस्वी प्रतिगामी आहे. जुन्या नाहीशा झालेल्या किंवा मरू घातलेल्या गोष्टीबद्दल मला आज किती वाईट वाटत आहे! माझ्या भोवतालच्या सुशिक्षित जाणत्या लोकांना काही नाहीसे झाले ह्याची जाणीवसुद्धा नाही, आणि मी मात्र गेलेल्या मूल्याबद्दल अश्रू ढाळीत आहे.

नुकतेच वर्तमानपत्रात वाचले की, ‘‘हिंदुस्थानातील लिबरल (नेमस्त, मवाळ) पक्ष राजकीय पक्ष म्हणून स्वत:ला बरखास्त करून टाकणार आहे.’’ किती क्षुद्र बातमी! कोणी म्हणाले, ‘‘म्हणजे ह्या नावाचा राजकीय पक्ष होता तर?’’ कोणी म्हणाले, ‘‘नाहीतरी मेलेलाच पक्ष होता, आता काय बरखास्त होण्याचे राहिले होते?’’ मला मात्र कशी हुरहूर लागून राहिली आहे! मी माझ्या मनाला विचारते आहे की,

पक्षोपपक्षांची, जातीपातींची पर्वा न करता साधारण मानव्याची तरफदारी करणारे आता भारतात कोण राहिले आहे? आधी माणुसकी आणि मग पक्षाचे राजकारण अशी वृत्ती ठेवणारे हे लोक गेले म्हणजे आमचे काय होणार? इंग्रजांच्या घरच्या राजकारणातील लोकशाहीची तत्त्वे नेमस्त पुढाऱ्यांनी खरी आचरणात आणली. त्यांची लोकसेवा पक्षातीत होती- कोणत्याही पक्षाशी केव्हाही लोककल्याणासाठी सहकार्य करण्यास त्यांना कधी कमीपणा वाटला नाही. काँग्रेसच्या लोककल्याणासाठी सहकार्य करण्यास त्यांना कधी कमीपणा वाटला नाही. काँग्रेसच्या स्वातंत्र्य संपादनाच्या मार्गाचा निषेध करूनही प्रत्येक वेळी तुरुंगात गेलेल्या काँग्रेस पक्षीय लोकांसाठी खटपट ह्या लोकांनी केली. सरकारच्या प्रत्येक प्रतिगामी धोरणाचा निषेध त्यांनी न चुकता व्यक्त केला. 'सरकारचे पित्त्ये', 'देशद्रोही' अशा सर्व तऱ्हेच्या शिव्या खाऊनही त्यांनी रागाच्या भरात किंवा सत्तेच्या लालसेने स्वजनद्रोह व लोकशाही तत्त्वांशी द्रोह केला नाही. त्यांचे राजकारण अभ्यासू वृत्तीचे होते. त्यांचे लिखाण बहुजन समाजाच्या वृत्ती थरारून सोडण्यासाठी नसून बहुजन समाजाला शिक्षण देण्यासाठी होते. त्यांनी आपल्या शहाणपणाची प्रौढी मारली नाही, देशभक्तीचे प्रदर्शन केले नाही- मुद्दाम तर ते कधीच नव्हते; अशा विद्वान, सर्वसंग्राहक वृत्तीच्या माणसांना आजच्या समाजात स्थान नाही म्हणून मी हळहळते आहे. आज ते असते तर कम्युनिस्ट व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ह्यांची मते अमान्य असतानाही ह्या लोकांच्या विनाचौकशी तुरुंगवासाविरुद्ध त्यांनी निषेध प्रदर्शित केला असता. त्यांच्यापैकी एकाने तरी कौन्सिलात प्रश्न विचारला असता की, ''आज भारतात विनाचौकशी किती लोक तुरुंगात आहेत? किती संस्थांना न्यायालयासमोर चौकशी न करता बेकायदा ठरवले आहे? किती वर्तमानपत्रांवर बंदी घातली आहे?'' पूर्वी सरकारचा केवळ शाब्दिक निषेध करणारे म्हणून ह्या लोकांची हेटाळणी होत असे. पण आजच्या स्वराज्यात शाब्दिक निषेधही करण्याची कोणाची प्राज्ञा आहे का?

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ बेकायदा ठरवला त्या दिवशी माझ्या ओळखीच्या एका लहान मुलाला काय आनंद झाला! मला नवल वाटले, पण मी काहीच बोलले नाही. तोच लहान मुलगा दुसऱ्या दिवशी संतापलेला असा माझ्याकडे आला व सरकारला शिव्या देऊ लागला. ''का रे बाबा, आज काय झाले?'' तर त्याने सांगितले की, ''सरकारने दलावर बंदी

घातली आहे.'' दल म्हणजे काँग्रेसांतर्गतच एका उपपक्षाचे स्वयंसेवक मंडळ आहे असे मला समजले. ''अरे, जशी R.S.S.वर बंदी, तशी तुमच्यावर; त्यात एवढे संतापायला काय झाले?'' ''छे! छे! तुमच्याशी बोलण्यात काही फायदा आहे का? R.S.S. आमचे दल नि कम्युनिस्ट सर्व काय सारखे आहेत? त्यांच्यावर बंदी घातली, उत्तम झाले! पण आमच्या दलावर घातली हा काय न्याय आहे?'' म्हणजे बंदी घालणे योग्य की अयोग्य? हा प्रश्नच नव्हता, फक्त आमच्यावर असता कामा नये, इतरांवर असावी हा कटाक्ष होता. जी गोष्ट ह्या छोट्या मुलाची तीच इतर छोट्या-मोठ्यांची. परवापासून वाचते आहे व ऐकते आहे; ''काय सांगावे हो, अठरा वर्षांखालील कोवळ्या मुलांनासुद्धा R.S.S.ने सत्याग्रह करावयास लावला!'' शाळेतील व कॉलेजातील मुले म्हणजे सत्याग्रहातील मुख्य शस्त्र हे तंत्र पहिल्याने कोणी अंमलात आणले? ह्या बाबतीतील एका काँग्रेसजनाचा व एका भाईचा वादविवाद मोठा बोधप्रद वाटला म्हणून सांगते. काँग्रेस पक्षीयाने सांगितले की, ''तेव्हाची गोष्ट निराळी होती. परकी सत्तेविरुद्ध प्राणपणाने लढावयाचे होते. राष्ट्राच्या जीवनमरणाचा प्रश्न होता, तेव्हा सर्वच सैनिक होते- लहानमोठा भेद करण्याचे कारण नव्हते. आता आपले राज्य आहे. म्हणून पूर्वीचा मार्ग बरोबर ठरत नाही.'' भाईंनी तितक्याच गंभीरपणाने सांगितले, ''गृहस्था, मागे फक्त राष्ट्राचा प्रश्न होता, आता सबंध मानवी मूल्याचा प्रश्न आहे. हा लढा जागतिक आहे- येथे सर्वांनी लढले पाहिजे- मुले आणि मोठी माणसे हा भेद ठेवता येत नाही...'' पुढची पुस्ती मी जोडते; R.S.S.चा मनुष्य म्हणेल, ''आमचा लढा न्यायासाठी आहे. मूलभूत मानवी हक्काचा लढा चालू असता मुले व मोठी माणसे असा भेद ठेवता येत नाही.'' म्हणजे मिळून काय, शाळांतील मुलांना राजकीय लढ्यात ओढू नये असे कोणीच म्हणत नाही, फक्त आमच्या मूल्यासाठी ओढावे, इतरांच्यासाठी नाही!

जी गोष्ट सत्याग्रहाची तीच इतर बाबींची. प्रत्येक पक्षाचा गणवेश आहे, प्रत्येकाचे निशाण आहे, प्रत्येकाचा स्वयंसेवक संघ आहे, प्रतिज्ञा आहे, शिस्तपालन आहे. पक्षातीत राहणाऱ्याची ह्यात काय ओढाताण होते ते काय सांगू? मुलांच्या वर्गातून राजकीय पक्षाच्या नावावर सदैव भांडाभांडी चाललेल्या असतात. मूल अभ्यास टाकून कुठच्या पक्षात जाईल ह्याचा नेम नाही. मूल म्हणून त्याला पक्षोपपक्षात ओढावयास कोणी कचरत

नाही, व ते त्यात अडकले तर मूल म्हणून त्याला कसलीही दयामया दाखविली जात नाही. १९४२ सालची गोष्ट. जळिताचे किती खटले माझ्यापुढे आले! तेरा तेरा-चौदा-चौदा वर्षांची पोरे स्टेशने, चौक्या, शाळांच्या इमारती जाळीत होती! त्या जळलेल्या इमारतींपेक्षा एका उगवत्या पिढीच्या जीवनात कालवलेल्या विषारामुळे माझे आईचे मन तळमळत होते. त्या मुलांची नैसर्गिक घृणा, दया नाहीशी झाली होती. त्यांपैकी एकाला विचारले, ''काय रे, तुमच्या पुढाऱ्याने सांगितलेली गोष्ट तू ऐकशील का रे!'' त्याने आपली बालदृष्टी माझ्याकडे लावून म्हटले, ''अर्थात, वाटेल त्याचा खून करावयास सांगितले तरी करीन.'' माणुसकीची मूल्ये मिळवायला हजारो वर्षे लागतात, ती धुळीला मिळवायला एक पिढीसुद्धा लागत नाही!

''ला इलाहा इल्लिल्लाह, मोहंमद रसूल्लिल्लाह!'' अल्ला एकच आहे आणि महंमद त्याचा प्रेषित आहे! काय भयंकर तत्त्वज्ञान! सबंध मानवतेच्या अंगी आज तेच विष भिनले आहे. अल्लाचा प्रेषित जो महंमद त्याचे जो ऐकत नाही तो मरणास योग्य आहे, त्याचा नायनाट झाला पाहिजे. हेच ब्रीदवाक्य आज सर्व पक्षांचे आहे, फक्त 'महंमद रसूल्लिल्लाह'ऐवजी 'गांधी रसूल्लिल्लाह', 'स्टालिन रसूल्लिल्लाह' व 'गोळवलकर रसूल्लिल्लाह' हे शब्द घातले म्हणजे झाले! ह्या प्रेषितांच्या विरुद्ध एक शब्द कोणी बोलता कामा नये. ह्यांच्या चिन्हाचा कोणी अनादर करता कामा नये. प्रत्येकाने ह्यांपैकी कोणातरी एकाच्या पंथाचे असले पाहिजे. गांधीवादी म्हणतात, ''देशभक्त काय ते आम्हीच, इतर देशद्रोही आहेत, विनाशक आहेत, त्यांचा नायनाट केला पाहिजे.'' हेच शब्द स्टालिनवादी उच्चारतात, व तेच आर.एस.एस.वाले उच्चारित असणार. माझ्यासारख्या अनेक दैवतवादी हिंदू संस्कृतीत रूजलेल्या व ह्या वादाने भांबावलेल्या मनाला वाटते, एकाचाच आग्रह का? सगळेच राहीनात! कोणी कोणावर जुलूम नाही केला म्हणजे झाले!

आम्ही लहानपणी कडक वैष्णव व शैव लोकांना हसत असू. नेसणे, कुंकू, उपासतापास काय, पण केससुद्धा वैष्णव व शैव निरनिराळ्या पद्धतीने काढीत! पण आजच्या ह्या आधुनिक एकेश्वरीवादापुढे बिचारे शैव व वैष्णवसुद्धा फिके पडतील. आमच्या आळीत मागे सर्व मुले शाळेतून आली की एकत्र खेळत, पण आता ते सर्वस्वी अशक्य झाले आहे. खेळाच्या जागेवर काठी उभी असते, त्यावर पक्षाचे निशाण असते, खेळाच्या

सुरुवातीला व शेवटी विशिष्ट प्रार्थना असते, आठवड्यातून एकदा बौद्धिक(?) असते. हे सर्व ज्यांना पसंत आहे त्यांनीच खेळायला यावे, इतरांनी नाही. दलात पाच वर्षांपासून पंधरा वर्षे वयापर्यंत मुले आहेत. तेव्हा शाळांतील मुलांना पक्षाचे शिक्षण द्यावे की नाही, हा प्रश्नच उभा राहत नाही.

निरनिराळ्या पक्षांची बौद्धिके मी पाहिली आहेत. सर्व भर असतो संघटनेवर. संघटना करा, संघ, दल, समितीप्रमुखाच्या आज्ञेचे पालन करा, पक्षाच्या निशाणाला नमस्कार करा, पक्षाच्या पुढाऱ्याला भजा, ह्या शिकवणीत आणि एकेश्वरी पंथाच्या शिकवणीत फरक काय?

म्हणून म्हणते, माझे प्रतिगामी मन मरू घातलेल्या लिबरल पार्टीसाठी, अनेक दैवतवादासाठी, परस्परसहिष्णुतेसाठी, साध्या माणुसकीसाठी हळहळते आहे.

✿

९

# जुळी मुले

महाभारतातील एक मजेदार प्रसंग मी वाचीत होते. कुंतीने आपल्या मंत्रसामर्थ्याच्या जोरावर यम, इंद्र वगैरे देवांकडून तीन मुलगे मिळवले, त्याच्यापुढचा कथाभाग होता तो. माद्री पांडूला म्हणत होती, ''राजा, तुला व्यंग असले तरी मी कधी मनाचा संताप केला नाही, पण तिला तीन मुले व्हावी आणि मला मात्र एकही नसावे ह्याचेच मला दुःख होते. ती तर बोलूनचालून सवत, तिजजवळ मी ही गोष्ट कशी काढणार? तर तूच माझ्या वतीने कुंतीजवळ याचना कर, त्यामुळे माझी तृप्ती व तुझा लाभ अशा दोन गोष्टी साधतील.'' माद्रीचे म्हणणे पटून राजाने माद्रीसाठी कुंतीची मनधरणी केली, व कुंतीनेही उदार होऊन कोणत्याही दैवताचे एकदा चिंतन करावयास माद्रीस सांगितले. माद्रीने विचार करून अश्विनीदेवांना बोलावले, व त्यांच्याकडून तिला अत्यंत सुंदर अशा दोन मुलांची प्राप्ती झाली. काही दिवस गेल्यावर राजाने परत माद्रीसाठी शब्द टाकला, तेव्हा कुंती म्हणाली, ''तिला एक मंत्र दिला त्याच्या बळावर तिने जुळे मिळविले! मी बिचारी चांगलीच फसले! मला तिच्या वरचष्म्याची भीती वाटते.

आमचे बायकांचे मेले दैवच असे! मी वेडी, माझ्या काही लक्षात आले नाही की, द्वंद्वाचे पाचारण केले म्हणजे दोघांची प्राप्ती होते ते. राजा, आता मुलांच्यासाठी मला भरीस घालू नको. आता एवढे माझे मागणे ऐक.'' अर्थातच मुले होण्याच्या खटाटोपातून कुंतीने अंग काढून घेतले व माद्रीलाही काही करता येणे शक्य नव्हते म्हणून पांडव पाचच राहिले. मी हसले व म्हटले, ''वा रे सवती-सवतीचे भांडण!''

पण माझ्या वाचणाऱ्या मनाच्या मागे उभे राहून, माझ्या खांद्यावरून पुढे डोकावून, माझे दुसरे एक मन तोच मजकूर वाचीत होते. त्याचे काही समाधान झाले नाही. वाचलेल्या प्रसंगाला 'सवतीमत्सर' अशी चिठ्ठी चिकटवून अनुभूतीच्या कपाटात तो टाकून पुढे जावे असे त्याला वाटेना आणि ह्या त्या आगंतुक, मला माहीत नसलेल्या, मनाच्या हेकटपणामुळे पुढे वाचण्याकडे लक्ष लागेना, व मला पुस्तक मिटावे लागले. ते मन जुन्या अनुभूतींच्या भूमीत पुरलेली काहीतरी गतस्मृती हुडकून काढण्यात गढले होते. सापडले वाटते ते गतस्मृतीचे हाडूक, व त्याचबरोबर दोन्ही मनांची जुळणी पण झाली; कारण त्याच क्षणी मी उल्हासले, पुस्तक परत उघडले. ज्या मजकुरावर माझे दुसरे मन घोटाळत होते तो परत वाचला, ''न ज्ञासिषम अहं मूढा द्वंद्वाह्वाने फलद्वयम।'' ही ती ओळ होती. माद्रीने पुत्रार्थ जुळे देव बोलावले व ह्या युक्तीने एका आवाहनात दोन मुलांचा लाभ घेतला. मग काय मरुदगणांचे चिंतन केले असते तर तिला एकदम अकरा मुले झाली असती?

मला आठवले की, युरोपातील काही जुनी गाणी वाचीत असता त्यांत एक अशी कथा होती की, एका व्यभिचारिणीला जुळे मूल झाले तेव्हा तिचा व्यभिचार सिद्ध झाला असे समजून तिला व मुलांना लोकांनी ठार मारले. त्याच्याबरोबर कित्येक वर्षे न सुटलेल्या एका कोड्याचा निकाल लागतोसे वाटले.

रामाने सीतेला टाकले- लोकापवादावरून टाकले- ही एक अशी घटना आहे की, त्यापुढे मान तुकवायला माझे मन कधीही तयार होत नाही. लहानपणी मला राम ह्या व्यक्तीबद्दल द्वेष व संताप येई. स्वतःच्या मोठेपणासाठी त्याने आपल्या बायकोचा बळी दिला असे माझे अगदी ठाम मत असे. आमच्या शाळेत किंवा हिंगण्याच्या अनाथ बालिकाश्रमात जेवणाच्या वेळी मुली ''सीताकांतस्मरण जयजयराम'' म्हणतात. मला वाटते, निदान स्त्रियांच्या संस्थेत तरी रामाचा बडेजाव होता कामा नये.

त्यापेक्षा पार्वतीवर मनापासून प्रेम करणारा, राकट, जंगली शंकर पत्करला. लहानपणी मन कसे स्वच्छ असते! त्याची प्रवृत्तीसुद्धा कशी सरळ असते! तेव्हा मनात फक्त राग येई. मोठेपणी मन संस्कारित झालेले, फाटे फुटलेले, गढूळ झालेले- आता परित्यक्ता स्त्रियांनी आश्रमात ''सीताकांतस्मरण'' अशी घोषणा केली की मनात राग येऊन राहात नाही तर ''खरेच, रामासारख्या माणसांमुळेच तर असले आश्रम भरतात, तेच असल्या संस्थांचे आश्रयदाते, तेव्हा त्यांचे स्मरण योग्यच आहे!'' असा कडू, कुटिल विचारही मनात डोकावतो. कालिदास व भवभूती वाचून रामाबद्दल वाटणारा संताप कमी झाला, पण त्याची जागा तिरस्काराने घेतली. चांगले-वाईट काय, न्याय्य-अन्याय्य काय, हे माहीत असूनही चांगल्याची व न्यायाची कास ज्याला धरता येत नाही त्याची कीव करावी का तिरस्कार करावा? सीतेलासुद्धा तसेच वाटले असले पाहिजे. नाहीतर शेवटी ती मानिनी पृथ्वीच्या पोटात जाण्याचे का पत्करती? रामाची सत्यप्रियता, चांगुलपणा, सीतेवरील प्रेम ह्यांचा सीतात्यागाशी मेळ कसा घालावयाचा? काही वर्षांपूर्वी 'महाराष्ट्र-साहित्य पत्रिके'त 'अंकुशरामायण' म्हणून बायकांचे एक गाणे त्रुटित स्वरूपात प्रसिद्ध झाले होते. माझ्या ऐकण्यात निरनिराळ्या स्त्रियांकडून त्या गाण्यातील मधल्यामधल्या ओव्या आलेल्या होत्या. ते गाणे रचणाऱ्या बाईला वा बुवाला पण सीतारामाच्या गोष्टीचे कोडे पडलेले दिसते. पण ते मात्र अगदी निराळे कोडे, मला पडलेले नव्हे. सीता शुद्ध तर तिला दोन मुले एका वेळी झालीच कशी? ह्या कोड्यातून त्याने एक विलक्षण युक्ती योजून आपली सुटका पण करून घेतली. त्या गाण्यात खालील कथा सांगितली आहे. रामाने टाकल्यावर सीतेचा प्रतिपाळ वाल्मिकीने केला. वाल्मिकीला बायांच्या गाण्यात सर्वत्र 'तातोबा' असे नाव आढळते. ह्या तातोबाच्या आश्रमातच ती बाळंत झाली व तिला एक सुंदर मुलगा झाला, त्याचे नाव लहू. एकदा सीता मुलाला पाळण्यात ठेवून नदीवर धुणे धुवावयास गेली, तेथे तिला एक माकडीण भेटली. तिने विचारले, ''सीते, नदीवर काय करतेस?'' सीता म्हणाली, ''माझी न बाळाची धुणी धुते.'' माकडीण आश्चर्याचे उद्गारली, ''काय? तुला अगदीच कशी माया नाही? तेथे पाळण्यात एकट्याला कोणी काही इजा केली म्हणजे? मी बघ, माझ्या पोराला कधी विसंबते का? बघ, माझ्या पाठीवर नाहीतर पोटावर त्याला बाळगते. धन्य आहे तुम्हा माणसांची!'' हे ऐकून सीता घरी गेली व बाळाला

घेऊन आली. तिने बाळाला शेजारच्या एका दगडावर, आपल्यापासून जवळच असे ठेवले व ती धुणी धुऊ लागली. सीता बाळाला घेऊन गेल्यावर थोड्याच वेळाने रानातून कंदमुळे, फळे वगैरे घेऊन तातोबा आले. नित्याप्रमाणे त्यांनी बाळाच्या पाळण्यात डोकावून पाहिले तो बाळ नाही! म्हाताऱ्याला धक्काच बसला. कोणी श्वापदाने बाळाला पाळण्यातून ओढून नेले वाटते! आता सीता परत आली आणि तिला हे कळले म्हणजे ती आकांत करील- ती खात्रीने प्राणच टाकील- असा मनात विचार येऊन सीतेला दु:ख नको म्हणून ऋषींनी योगबलाने गवतापासून नवा मुलगा उत्पन्न केला व त्याला पाळण्यात घालून आंदुळत बसले. धुणी झाल्यावर कडेवर मूल व डोक्यावर धुणी अशी सीतामाई घरी येऊन पोहोचली. पाहते तो तातोबा पाळणा हालवीत बसले आहेत व पाळण्यात एक बाळ! तशी ती म्हणते, ''माझे बाळ माझेपाशी! तुम्ही हालविता कोणाशी?'' सर्व घटनेचा उलगडा झाल्यावर वाल्मिकीने तिला नव्या बाळाचा पण स्वीकार करावयास सांगितले व ''लहू तो पोटीचा। आकोस (अंकुश) धर्माचा। सीताबाई झाला। पवाडा तुझ्या कर्माचा।।'' ह्या ओळींनी हे कथानक संपते. कवीच्या मते ह्या विलक्षण घटनेने सीतेला दोन मुले झाली अशी वार्ता सर्वत्र पसरली व तिच्या चारित्र्याचा डांगोरा जगभर झाला. लोकांना त्या दुसऱ्या मुलाच्या उत्पत्तीची खरी कथा माहीत असती तर सीतेला रामाने परत घेतली असती. सीतेच्या शुद्धतेविषयी जशी कवीची खात्री, तशी जुळी मुले अव्यभिचारिणीला होणे शक्य नाही हीही खात्री. बरे, दोन मुले होती अशी तर मूळ कथा! तीही खोटी म्हणणे शक्य नाही. म्हणून उदभवलेल्या पेचातून सुटण्यासाठी त्याने वरील युक्ती योजली.

आणि ह्या जुन्या गाण्यात व कुंतीच्या उदगारांत तर सीतात्यागाच्या रहस्याचा उलगडा नाही ना? सीतेबद्दल लोकांत प्रवाद होता. रामाने तिला वाल्मिकीच्या आश्रमात पोहोचवली व ती बाळंत झाल्यावर, तिला व मुलाला वाल्मिकीने पुढे घालून आणावे व परत तिचा स्वीकार व्हावा असा बेत झाला असावा. मुलगा चक्रवर्तिचिन्हांकित आहे, रामाचाच असल्याबद्दल दैवी पुरावे, आकाशवाणी, सर्व काही ब्राह्मणांच्या साहाय्याने करता येणे शक्य होते; पण दुर्दैवाने तिला जुळेच झाले! लोकभ्रमाला सीता बळी पडली नाही. ''द्वंद्वाह्लाने फलद्वयम।'' हा त्या वेळचा केवळ अशिक्षितांचा समज वा 'लोकभ्रम' असणे शक्य नाही. हे त्या वेळेचे 'शास्त्र'

होते- अगदी पक्का युक्तिवाद होता. म्हणूनच तर आकाशवाणी वगैरे नेहमीच्या दैवी चमत्कारांचा उपयोग नव्हता. जेथे ज्ञान किंवा शास्त्र लंगडे पडते अशा ठिकाणी दैवी उपायांचा अवलंब केला जातो; पण ज्या वेळी एखादी गोष्ट पक्की नि:संदेह माहीत असते, तेव्हा दैवी उपायांच्या मदतीची आवश्यकता नसते. जुळे होईपर्यंत जी गोष्ट केवळ प्रवादरूपाने होती ती आता नि:संदेह सिद्ध झाली होती व त्यावर सीतेचे लोकविलक्षण भयंकर दिव्य हाच एकमेव उपाय होता. तेव्हापासून आतापर्यंत जुळी मुले म्हणजे व्यभिचाराचा पुरावा असा समज असूनही सीतेच्या शुद्धत्वाविषयी सर्व प्राचीन व अर्वाचीन कवींची खात्री आहे, अगदी जुळे झाले तरीसुद्धा खात्री आहे! मराठी कवीप्रमाणे जुळे झालेच नाही असे म्हणण्यापर्यंत कित्येकांची मजल जाते. लोकांच्या अगदी रुजून बसलेल्या समजुतीविरुद्ध घटना होऊनही सीतेने हा कौल कसा मिळविला? रामाला सीतेचा परत स्वीकार करण्याची इच्छा होती. सीतेचे तर सर्व हृदय राममयच होते. रामाच्या प्रेमाचा उपभोग परत घ्यावयास तिचेही मन आसावलेलेच होते. पण प्राप्त परिस्थितीत वसिष्ठ, अरुंधती व वाल्मिकी ह्यांच्या सांगण्यावरून रामाने तिचा स्वीकार केला असता तरी लोकप्रवादाने ताबडतोब परत उचल खाल्ली असती, व त्यांच्या सांसारिक जीवनात प्रवादाचा विषार परत भिनला असता. प्राप्त परिस्थितीत पूर्वीचा प्रसन्न, आनंदमय संसार करणे अशक्य होते. हे सर्व जाणूनच सीतेने मुलांचा, प्रियकराचा, राणीपणाचा एका क्षणात त्याग केला. ह्या असामान्य त्यागानेच त्या वेळच्या शास्त्राला खोटे ठरविले, व ज्या सीतेला जिवंत राहून उजळ माथ्याने वावरता येणे शक्य नव्हते ती मृत्यूने शुद्धचरित्रा, प्रेममय, साध्वी सीता म्हणून भारतात अमर झाली.

१०

# स्त्रीराज्य

दोन-चार तासांतच मला कळून चुकले की, मी एका स्त्रीराज्यात आले आहे म्हणून. हे कुटुंब सध्या तरी फक्त स्त्रियांचेच होते. सर्व जाणती माणसे बाया होती व निरनिराळ्या वयांचे म्हणजे १५ वर्षे ते एका महिन्यापर्यंतचे मुलगे घरात होते. माझ्या मैत्रिणीचे यजमान परगावी नोकरीला होते. घरी माझी मैत्रीण व तिच्या दोन वन्सं असत आणि ह्याच सुमारास तिची धाकटी बहीण बाळंतपणासाठी आली होती. लेकीचे करायला म्हणून तिची आई आली होती व चार दिवस हवापालट म्हणून आईची आई पण आली होती.

घरात घडणाऱ्या लहानसहान गोष्टींतही पुरुषमाणूस नसले म्हणजे किती फरक दिसून येतो! सारा दिवस कानावर मध्यसप्तकाच्या मध्यमापासून तो तारसप्तकाच्या पंचमापर्यंत सूर आदळत असतात. संभाषण जोपर्यंत गोडीत चालले असते तोपर्यंत मधूनमधून हसणे आणि किनऱ्या (thin) आवाजातले अस्पष्ट बोल कानाला गोड वाटतात- तेच रागावून किंवा त्रासून बोलणे चालले तर आवाज एकदम तारसप्तकात जातो- आवाजात कंप वाढतो- तीक्ष्णपणा येतो, पण तो मोठा येत नाही- त्यात

एक प्रकारचा एकेरीपणा असतो, आणि ऐकणाराच्या कानाला कशा झिणझिण्या येतात. तेच एखाददोन पुरुष घरी असले म्हणजे त्यांचे साधे बोलणेच नादाने इतके भरलेले असते की घर भरल्यासारखे वाटते. सगळा आवाज मन्द्र आणि मध्य पट्टीत असल्यामुळे त्यात तीक्ष्णपणा किंवा एकेरीपणा येत नाही आणि पुरुष जर रागाने अस्सल प्राकृतात शिव्या देणारे असले तर ढगाच्या गडगडण्याप्रमाणे घर दणाणून टाकतात. माझ्या मैत्रिणीच्या घरी बायाच पुष्कळ भेटावयास यावयाच्या, आणि त्यांचे बोलणे-हसणे कसे सगळेच नाजूक होते. पुरुष आले तरी थोडा वेळ बसून चार औपचारिक गोष्टी बोलून निघून जायचे. पण अप्पासाहेब- तिचे यजमान- घरी आले म्हणजे पुढच्या दालनातील बैठक रंगत असे. सर्वांचेच मोठ्याने बोलणे, हसण्याचा गडगडाट, घरात बसून रस्त्यावरून कोणी मित्र गेला की, त्याला मोठ्याने हाका मारणे- दिवसातून दहा वेळा पानासाठी गड्याला चौरस्त्यावर पिटाळणे, घरात जणू एखादे कार्य चालल्याची गडबड असायची.

गडीमाणसांच्या वागण्यातही फरक दिसून यायचा. जेवायला बसले की कोणी तरी कुरकुरत म्हणावयाची, ‘‘काय करावं बाई, ह्या सदाशिवाला दहादा सांगितलं तरी कधी वेळेवर येत नाही.’’ दुसरीने सूर काढायचा, ‘‘आणि कुठं कामाला गेला म्हणजे तास-तास परत येत नाही.’’ माझी मैत्रीण मग अगदी गंभीर चेहरा करायची व हाक मारायची, ‘‘सदाशिव! ए सदाशिव!’’ सदाशिव असा हाकेसरसा थोडाच येणार? तो चांगली पाच मिनिटे झाल्यावर एकदाचा आला की रागाचा पारा उतरलेला असायचा, आणि ‘‘उद्यापासून वेळेवर ये बरं का!’’ अशी अगदी मिळमिळीत ताकीद त्याला मिळायची, व पुनश्च दुसऱ्या दिवशी सर्व प्रकार मागील प्रकरणावरून पुढे चालू व्हावयाचा. बया मोलकरीण तर काय, स्त्रीच. त्यातून विधवा. बाईंच्या हृदयाची किल्ली तिने कधीच काबीज केली होती. ती रोज उशिरा यायची, कधी तर यायचीच नाही; आणि कोणी कुरकुर करायच्या आतच बाईंपुढे जाऊन, ‘‘काय करावं? पोराला ताप आला...’’ आज काय, ‘‘लेकीला नवऱ्यानं मारलं...’’, उद्या काय, ‘‘दीर फाडफाड बोलला...’’ असे अगदी आसू पुशीत-पुशीत सांगावे; की बाईंनी म्हणावे, ‘‘बरं बरं, बया, लाग कामाला- जाताना पोराला औषध घेऊन जरा रोजच्यापेक्षा लवकरच जाहो.’’ एखाद्या गड्याने फारच आगळीक केली तर त्याला

मधल्याला आंघोळ घालीत होती. आजीबाई स्वैपाकघरात काहीतरी तळीत होत्या, त्याचा खमंग वास घरभर दरवळला होता, व त्यांच्या शेजारी जिन्नस कधी होईल म्हणून एक 'चिक्कमूर्ती' केव्हाची वाट पहात बसली होती. पणजीबाई माझ्या शेजारी बसून एकासाठी लोकरीचा अंगरखा विणीत होत्या. आणि माझी सखी?... तिच्या हातात टपालाने नुकतेच आलेले पत्र होते. तिचे डोळे दूर कुठे लागले होते. तिच्या ओठांवर गोड हसू होते. तिच्या तोंडावर उत्कंठा होती. अगदी आतल्या गाभाऱ्यातल्या दोड्ड वैष्णवमूर्तीच्या पूजेत तिची समाधी लागली होती हे काय सांगायला पाहिजे?

✿

११

# मराठ्यांचा मट्ठपणा

केवढे भांडण चालले होते दोघांचे! सगळी माणसे त्यांच्याभोवती गोळा झाली होती. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आश्चर्य दिसत होते. तुळशीराम आणि लाला ह्यांच्यातले भांडण होते ते. तुळशीराम असेल जेमतेम पाच फूट उंच.. अंगाने काटकुळा... वजन शंभर पौंडसुद्धा भरले नसते; आणि लाला होता सहा फूट उंचीचा पठाण! त्याचा लालबुंद उग्र चेहरा, बैलासारखी मान, जाड मिलिटरी बूट व निमुळती टोपी ठेवून बांधलेला फेटा ह्यांमुळे तर तो होता त्यापेक्षाही उंच वाटायचा. तो नुसता खाकरला तरी आसपासची पोरे घाबरून पळायची. त्याचे एकेक मनगट असेल तुळशीरामाच्या मांडीएवढे जाड. "थांब, थांब, तुझा जीवच घेतो," तुळशीराम लालाच्या अंगावर धावला. भोवतालच्या माणसांनी तुळशीरामाला धरून ठेवला. एवढ्यात इंजिनियर कामावर आले व "काय गडबड आहे?" म्हणून विचारू लागले. "कुछ नहीं मालिक, ये आदमी खाली झगडा करता है." लवून सलाम करीत लाला म्हणाला. तिकडून तुळशीराम शिरा ताणीत ओरडला, "ऐकतोस काय, सायबा? शाप खोटं बोलतोय तो. मला शिव्या दिल्यान अन् आता गोंडा

घोळतो.'' साहेब दोघांना घेऊन हाफिसच्या खोलीत गेले व तुळशीरामाला शांत करीत झाली हकीकत त्यांनी विचारली. लाला रोजच्याप्रमाणे तयार होऊन बांधकामाच्यापुढे उभा होता. कामकरी येतायेता गर्दीत एकाचा धक्का लागून तुळशीराम ढकलला गेला व तोल सावरता-सावरता त्याचा पाय लालाच्या शेजारीच ठेवलेल्या वळकुटीवर पडला. ''क्यों साला, बेवकूफ! तुम क्या अंधे हो?'' लालाने गुरकावले. ते सहन न होऊन तुळशीराम लालाचा जीव घ्यायला धावत होता. ''अरे तुळशीराम, काय हमरीतुमरीवर येता? जा पाहू कामाला. लाला! माझ्या माणसांना शिव्या दिलेल्या मला खपणार नाहीत.'' असे दोघांनाही सांगून साहेबांनी दोघांना दोन दिशांना पाठविले. तरी जाता-जाता लाला 'बेवकूफ मरगठ्ठे!'' असे पुटपुटला. ते ऐकून तुळशीराम दारापर्यंत गेलेला तावातावाने परत आला व साहेबांच्यापुढे हात नाचवीत म्हणाला, ''बघ, सायबा, कसा माजला आहे बैल!- थांब, त्याला दाखवलंच पाहिजे. त्याची वळकटीच फेकून देतो समुद्रात.'' ''माझे आई! जा आता कामावर...'' साहेबांनी परत सांगितले व तुळशीराम निघून गेला. त्या दिवसापासून लाला प्रत्येक कामकऱ्याला सांगायचा की, तुळशीराम माझा बिछाना दर्यात टाकणार आहे आणि हसायचा, आणि सगळीजण हसायची. पण तुळशीरामाने लक्ष दिले नाही. तो फक्त जळजळीत दृष्टीने लालाकडे पाहायचा. तुळशीरामाचे काम सर्वात उंच जागी असायचे. तो होता खारवी. दुसऱ्यांचे डोळे फिरतील इतक्या उंचीवर अरुंद फळ्यांवरून तो खुशाल बेफिकीर इकडून तिकडे जायचा व आपले काम करायचा. उंच वाशांवर चढून परांच्या बांधायच्या, टोकावर कप्पी बसवायची, कप्पीची दोरी सरकली तर वर चढून ती परत बसवायची; ही कामे म्हणजे त्याच्या हातचा मळ. स्वारी तशी सरळ, पण लालाची मग्रूरी तो कधी ऐकून घ्यायचा नाही; आणि सर्वांना धास्ती वाटायची की, एखादे दिवशी लालाने थप्पड मारली तर ह्या काटकुळ्या प्राण्याचा जीव जायचा म्हणून. ज्या इमारतीचे बांधकाम चाललेले होते तेथे वरच्या मजल्यावर तुळशीराम निजायचा आणि खालच्या दाराशी लालाचा पहारा असायचा, आणि रोज त्यांच्या कटकटी चालायच्या. ह्या दोघांचे भांडण म्हणजे सायबालासुद्धा कुतूहलाचा विषय होता. ही उंदीर-सिंहाची चुरस मोठी मजेची होती. त्यालाही तुळशीराम लालाची वळकटी समुद्रात टाकणार ह्या कल्पनेने हसू आले. हे भांडण झाल्यापासून दोन-तीन दिवसांनी साहेब जो कामावर येतो तो त्याला एक

अदभुत दृश्य दिसले. कामकरी नुकतेच कामावर आले होते आणि मोठे रिंगण करून उभे होते. मध्यभागी लाला रागाने अक्षरश: नाचत होता. त्याच्या तोंडून शिव्यांचा भडिमार चालला होता. तो तुळशीरामाची गठडी वळायच्या गोष्टी बोलत होता. त्याचा आधीच लाल असलेला चेहरा रागाने आता फुटणार असे वाटत होते. तो मान उंचावून आकाशात हात नाचवीत ''खाली तर ये म्हणजे तुला दाखवतो'' असे वारंवार म्हणत होता. साहेबाने वर पाहिले तर सगळ्यात उंच नि अरुंद परांचीवर तुळशीराम एखाद्या माकडासारखा बसला होता व नि:शब्द हसत होता. साहेबाला पाहताच लाला जरा थबकला. पण पुढे होऊन सलाम करून त्याने आपले गाऱ्हाणे साहेबांना सांगितले की, ह्या तुळशीरामाने माझी वळकटी कुठे नाहीशी केली आहे, ती मला परत करवा. साहेब आलेला पाहताच तुळशीरामही माकडासारखा झरझर खाली आला. ''काय रे, लालाची वळकटी तू चोरलीस काय? कुठे आहे ती?'' ''मी नाय चोरली बा-- मी ती दर्यात फेकून दिली.'' तुळशीराम म्हणाला. लाला म्हणाला, ''चोरून वर खोटं बोलतो आहे. माझी दुलई होती व तीत शिवलेले पैसे होते.'' तुळशीरामाने लांब हात केला व बोट दाखवून म्हटले, ''ती बघ तिकडे मी फेकली- अजून सापडेल. जा जाऊन बघ.'' लाला व त्याच्याबरोबर दोघेतिघे धावतच किनाऱ्याशी गेले व साहेब तुळशीरामाला घेऊन आत गेले. सकाळी लाला उठून बाहेर गेला व ही संधी साधून तुळशीरामाने वळकटी पळवून फेकून दिली होती एवढी हकीकत जो साहेबाला कळते तेवढ्यात लाला आला. त्याचा राग कमी झाला होता- पैसे न वळकटी भिजलेली, पण काहीही चोरीस न जाता मिळाली होती. तो जरा हसतच म्हणाला, ''मालिक, ये बिलकुल बेवकूफ है. रजाईमें सौ रुपिये थे वे सब वापस मिले। इसकु कुछ पैसे की बात मालूम नहीं हुई!'' साहेबांनी तुळशीरामाकडे पाहिले. क्षणभर दोघांचे डोळे भिडले. दोघांच्याही चेहऱ्यावर हसू झळकले. साहेब आणि तुळशीराम दोघेही 'बेवकूफ मरगठ्ठे'- काय हसण्यासारखे झाले त्यांनाच माहीत. एवढे खरे की, त्या दिवसापासून लाला परत तुळशीरामाच्या वाटेस गेला नाही. पण ह्या मठ्ठ मराठ्याने मोठ्या युक्तीने वळकटी हस्तगत करून ती हातोहात न लांबवता समुद्रात कशी फेकली व आपले पैसे कसे परत मिळाले हे सांगताना बाकीचे मठ्ठ मराठे हसत का नाहीत हेही त्याला कधी कळले नाही.

बिचारा लालाच काय, पण इतर परप्रांतीयांनासुद्धा मराठ्यांच्या वागणुकीचे आश्चर्य वाटते. मराठ्यांना व्यवहारच नाही हा सिद्धांत तर मी आतापर्यंत पाच-पंचवीस वेळा तरी ऐकला असेल.

पुष्कळ वर्षांमागची गोष्ट. मी शेटना आमचे नवीन घर दाखवीत होते. घर दाखवून झाल्यावर त्यांनी बारीक चौकशी केली- जमिनीला काय पडले? घराला काय पडले? वगैरे आणि शेवटी विचारले, ''पण ताई, एवढे पैसे कुठून आणले?'' मी बेफिकीर स्वरात सांगितले, ''थोडे जवळ होते ते दिले व बाकीचे कर्ज काढले- फेडू हळूहळू.'' शेटनी गंभीरपणे मान हलवली- ''छे, हेच पैसे तुम्ही एखाद्या धंद्यात गुंतवले असते तर तुम्हाला दरवर्षी इतके व्याज आले असते. त्या व्याजापैकी काही भाग देऊन भाड्याचे छान घर घेता आले असते. परत उरलेले व्याज रकमेत टाकून वीस वर्षांत चांगली पुंजी जमवता आली असती. पण तुम्हा मराठ्यांना (महाराष्ट्रीयांना) व्यवहारच कळत नाही. आपले असे घर आणि मागे-पुढे अंगण असले म्हणजे तुम्हाला वाटते स्वर्ग हाती आला.'' मी हसून म्हणाले, ''शेटजी, तुम्ही हेटाळणीने म्हणून जे म्हणाला ते अगदी शंभर टक्के खरे आहे. बँकेतल्या पैशांचे व्याज खाण्यापेक्षा स्वत:ची झोपडी का होईना, असली म्हणजे आम्हाला जन्म सफळ झाल्यासारखा वाटतो.'' ह्या मराठ्यांना काही अक्कलच नाही असा अभिप्राय त्यांच्या तोंडावर दिसला, व त्यांनी आमचा निरोप घेतला.

आमच्या ओळखीच्या परप्रांतीय संस्थानिकांना वर्षाकाठी घर घ्यावयाचे होते. घर बघून पसंत केले, वर्षाचा भाडेपट्टा झाला व उद्या राहायला यायचे एवढ्यात मंडळींच्या लक्षात आले की, घरात विजेचे दिवे नाहीत. आता काय करायचे? दिवस लढाईचे म्हणून वीज कंपन्या नव्या घरांना वीज देत नव्हती व तिथे वशिला चालेना. एवढ्यात राजेसाहेबांना असे आढळले की, त्यांच्या आळीत एका पाटीलबुवांचा वाडा व जमीन होती. तेथील विहिरीसाठी मोठा विजेचा पंप लावला होता- त्यातून पाटीलबुवांनी मेहेरबानीने दोघाचौघा शेतकऱ्यांना विजेच्या तारा जोडून दिल्या होत्या. आणि व्यवहार जरी चोरीचा होता तरी वीज कंपनी तिकडे कानाडोळा करीत होती- तसेच काही संधान राजेसाहेबांनी पाटीलबुवांकडे लावले तर वीज कंपनी त्यात ढवळाढवळ करणार नव्हती. राजेसाहेब लगेच आपल्या भारी किंमतीच्या प्रचंड मोटारीत बसले व पाटीलबुवांकडे आले. राजेसाहेबांची मोटार सुरेख व खूपच मोठी होती. आमच्या भिकार गावात

काही अशा मोटारी सहजी दिसत नाहीत. त्यांची मोटार गेली की, रस्त्याने जाणारी मुले उभी राहून कौतुकाने मोटार बघायची. हाकणारासुद्धा ऐटीत असे. राजेसाहेबांची मोटार पाटीलबुवांच्या वाड्याजवळ आली, मोटारहाक्या खाली उतरला व वाड्यात जाऊन 'बाहेर अमके-अमके आले आहेत. तुमची गाठ घ्यायची आहे, क्षणभर बाहेर आलात तर बरे' असा निरोप त्याने बैठकीत जाऊन सांगितला. पाटील जरा अनिच्छेने उठले व फाटकाशी आले. राजेसाहेब खाली उतरले. रामराम वगैरे झाल्यावर त्यांनी सांगितले, "हे पलीकडचे घर आम्ही घेतले आहे. तेथे वीज पाहिजे आहे. किती पैशाला तुम्ही कनेक्शन द्याल म्हणून विचारायला आलो आहे." पाटीलबुवांनी विडा चावीत संथपणे उत्तर दिले, "वा! फार छान! आपण आमचे शेजारी होणार- आनंद आहे आम्हाला. पण वीज काही तुम्हाला नाही बुवा देता येणार." राजेसाहेबांनी व त्यांच्या कारभाऱ्यांनी अतिशय गळ घातली, लोकांच्या चौपट पैसे देण्याचे कबूल केले. पण पाटीलबुवांचे आपले एकच उत्तर, "छे, हो! आधीच दोन- चार घरांना दिली आहे- आमच्याच पंपाला पुरे पडत नाही- तुम्हाला नाही देता येत." राजेसाहेबांनी ही सारी हकीकत मला सांगितली, व मराठ्यांना व्यवहारच कळत नाही म्हणून ते आपल्या मुलुखात निघून गेले. घर अंगावर पडू नये म्हणून लगेच दुसरा एक भाडेकरी पाहून वर्षाच्या कराराने त्यांना देऊन टाकले. नवी भाडेकरू बाई होती, घरात तीन-चार मुले होती. बाई राह्यला आली व हळूहळू पाटलीणबाईशी मैत्री झाली. 'एकटी बाईमाणूस, शाळकरी मुलं, रॉकेल मिळायची पंचाईत, मुलांचा अभ्यास तरी कसा होणार? बरं, बंगल्याचं भाडं तरी किती! आणखी मी गरजू; आत वीज नाही हे मला सांगितलंसुद्धा नाही हो त्यांनी- मी आपली ह्या दिवसात घर मिळतं आहे म्हणून लगेच वर्षाचा भाडेपट्टा की हो केला!" अशी बाईने आपली हकीकत दोन-चारदा सांगितल्यावर पाटलीणबाईंच्या सांगीवरून कुटुंबवत्सल पाटीलबुवांनी बाईंना आपली लगेच कामकरी माणसे लावून वीज जोडून दिली.

पंधरा दिवसांनी राजेसाहेब परत ह्या गावी आल्यावर त्यांनी बंगल्यात वीज पाहून कसे आकांडतांडव केले, नव्या भाडेकरी बाईला घर मोकळे करण्याची नोटीस कशी दिली, बाई वर्षभर कोर्टात वकील न देता स्वत: कशी भांडली, व शेवटी वर्ष संपता संपता खऱ्या घरमालकाशी तिने नवा

भाडेपट्टा करून संस्थानिकांना कसे हात चोळीत बसवले हे सांगायचे म्हणजे एक मोठा ग्रंथ होईल; पण पाटीलबुवांनी मुळातच वीज द्यायचे नाकारले का हे जाणण्याची मला उत्सुकता होती. काय परप्रांतीयांना आपल्या आळीत थारा द्यावयाचा नाही असा विचार होता की काय पाटीलबुवांचा? इतका लांब विचार शक्य दिसत नव्हता. पाटीलबुवा काही फारसे शिकलेले नव्हते, पण व्यवहाराला मोठे चतुर म्हणून त्यांचा लौकिक होता. मग त्यांनी पैसा नाकारला का? बऱ्याच दिवसांनी मला पाटलांच्या वागण्याचे रहस्य उलगडले. हे छोटे राजेसाहेब मोटारीतून उतरून पाटीलबुवांच्या बैठकीपर्यंत पायी गेले असते म्हणजे त्यांना ताबडतोब वीज मिळाली असती. पण पाटीलबुवांना बोलावून आणून मोटारशेजारी बोलणी झाली त्यामुळे पाटलांची मिजास बिघडली होती. त्यांनी चार जणांना बोलून दाखविले. ''राजेसाहेबांचे बूड इतके जड झाले होते काय?... मला मोटारीची ऐट दाखवतो होय?-- त्याला म्हणावे, तू राजा आहेस तर मी पाटील आहे-वाटेल ते पैसे दिलेस तरी वीज देणार नाही.'' पैसा मिळत असला म्हणजे कसलाही कमीपणा किंवा लाचारी स्वीकारायला हरकत नाही हे व्यापारी धोरण पाटीलबुवांना नव्हते हे स्पष्ट झाले.

परवाचीच गोष्ट घ्या ना! आमची गाडी लोणावळ्याजवळ थांबली. डब्यातून घाईघाईने एक पारशी उतरला. त्याला ताजी जांभळे विकत घ्यायची होती. डब्याच्या खिडकीजवळ एक कातकरीण एका लहानशा चौकोनी कुरकुलीत करवंदांचे द्रोण भरून विकायला आली. तिला पाहिल्याबरोबर त्या पारश्याने घाई करून संबंध टोपली हिसकावून घेतली व 'हेचा दाम काय?'' म्हणून विचारले. बाईने सांगितले, ''आठ आणे.'' ते पैसे तिच्या हातावर ठेवून गृहस्थाने कुरकुली बायकोच्या हातात दिली. मी आपली जांभळे म्हणून होणारा हा करवंदांचा सौदा स्तिमित होऊन पाहत होते. दोन मिनिटे झाल्यावर बाहेरची कातकरीण म्हणाली, ''बाबा, माझी टोपली द्या'' पारशी म्हणाला, ''मग जांभळे न्यायची कशात? तुझ्या टोपलीची किंमत देतो, सांग नी.'' बाई म्हणाली, ''छे! मला टोपली नाही इकायची.'' त्याने त्या एक आणा किंमतीच्या टोपलीला एक रुपया देऊ केला तरी तिचे म्हणणे एकच, ''मला टोपली इकायची नाही.'' शेवटी त्याने रागाने सबंधच्या संबंध टोपली तिला परत दिली. तिने त्याचे आठ आणे परत दिले व वेळ खाल्ल्याबद्दल चार शिव्या हासडून ती पुढे गेली. त्या पारशिणीला मी हळूच

म्हटले, ''बाई, ती करवंदे होती... जांभळे नव्हती. तुम्हाला पाहिजे असतील तर तो पहा पलीकडे माणूस उभा आहे, त्याच्याजवळ जांभळे आहेत.'' 'बरे झाले टोपली गेली' असे म्हणून तिने नवऱ्याकडून जांभुळवाल्याला बोलावले. तो होता एक कुणबी आणि जी कातकरणीची कथा तीच त्याची पण कथा. तो म्हणे, ''मी जांभळं विकायला आणली आहेत. टोपली नाय. हवी तर घ्या, नाहीतर मी पुढे जातो.'' शेवटी चरफडत त्या बाईने रूमालात जांभळे विकत घेतली, व तो माणूस आपली जीर्ण टोपली घेऊन निघून गेला. मला मात्र ''मराठे लोकाला कसा बेपार कळत नाही'' हे पुराण मुंबईपर्यंत ऐकावे लागले.

आजही परत ते शब्द मी आणखी एका माणसाकडून ऐकत होते. हे गृहस्थ एक सुप्रसिद्ध म्हणा की कुप्रसिद्ध म्हणा एजंट होते. कोणाला काहीही पाहिजे असो, पुरेसे कमिशन मिळाले की आपण मिळवून देऊ अशी ह्यांची प्रतिज्ञा होती, व त्या प्रतिज्ञेला आतापर्यंत कधीही बाध आला नव्हता; पण आज मात्र त्यांनी हात टेकले होते. ते रस्त्यावरून अगदी मंदपणे जात होते. त्यांचा चेहरा पाहून मी विचारले, ''काय, इकडे कोणीकडे? बरे नाही वाटत? हवा पालटायला का आलात?'' ''अहो, मी अगदी चांगला बरा आहे. पण किती खटपट केली तरी काम होत नाही म्हणून त्रासलो आहे.'' त्यांनी सांगायला सुरुवात केली. ''ते पलीकडे...... चे रस्त्यावर एक लहानसे घर नाही का, ती जागा व घर मी पंधरा हजाराला मागत होतो....... नी सांगितले आहे माझ्यासाठी घ्या म्हणून.'' ते घर व त्या घराची मालकीण माझ्या चांगली माहितीची होती. ती एक पांढरपेशाची पन्नास वर्षे वयाची विधवा होती. तिच्या मुलाने आणि तिने पै-पै करून साठवून शंभर दीडशे रुपयांना जमीन घेतली होती व तीवर काही विटा, काही पत्रे, काही खोक्याच्या फळ्या अशी विविध सामुग्री जुन्या बाजारातून आणून एक लहानसे घर बांधले होते. घरात राह्यला येऊन दोन वर्षे होतात तो मुलगा वारला व सध्या घरात विधवा सासू, विधवा सून व तीन वर्षांचा एक नातू अशी राहात होती. घरी खायची भ्रांत होती. सासू चार ठिकाणी कामे करी. घरातल्या चार खोल्यांपैकी तीन भाड्याने दिल्या होत्या, व कुटुंबाची कशीबशी गुजराण होत होती. मुंबईला बाँबहल्ला होणार ह्या भीतीने मुंबईचे लोक वाटेल ते पैसे देऊन बाहेरगावी घरे व जमिनी घेत होते. आज तिची दोन-तीन हजारांची मालमत्ता पंधरा हजारांना जात होती. ते एजंट पुढे सांगू

लागले, ''अहो, घरापुढून मोठा रस्ता म्युनिसिपालिटीने काढला आहे म्हणून इतकी किंमत देतो आहे. म्हातारीला सांगितलेसुद्धा की, जरा मागच्या बाजूला जमीन आहे ती घ्या व घर बांधा. आठ-दहा हजारांत सर्व होईल. काही हजार बँकेत राहातील. पंधरा हजार पुरे नसले तर काय हवे तो आकडा सांगा. पण तिचे आपले एकच... 'मला घर नि जमीन विकायची नाही.'... आता सांगा ह्या मठ्ठपणापुढे काय करणार? आणि अशा माणसांशी व्यवहार तरी कसा करायचा?''.... ते तावातावाने निघून गेले. मी समोरच्या मारुतीच्या देवळाकडे तोंड केले व हात जोडून प्रार्थना केली, ''देवा, मारुतिराया! मराठ्यांना आणखी थोडे मठ्ठ कर रे...''

✿

१२

# महार आणि महाराष्ट्र

महाराष्ट्रातील प्रत्येक गावी मराठे असलेच पाहिजेत असा काही वर्षांपूर्वी माझा समज होता. पण मराठे नाहीत, अशी कित्येक गावे मी पाहिली आहेत. मराठ्यांपेक्षा कुणबी जास्त ठिकाणी आढळतात. पण इतर कोणतीही जात घेतली तरी सार्वत्रिक वास्तव्याबाबत महारांची सर दुसऱ्या कोणत्याही जातीला नाही. महार बहुसंख्य कोठेही नाहीत. पण महारांची वसती मुळी नाहीच अशी गावे मला अजून आढळली नाहीत.

हे महार आहेत तरी कोण? हे एक कोडेच आहे. ते काय महाराष्ट्रातील अतिपूर्वीचे आदिवासी आहेत? उत्तरेकडील संस्कृत भाषा बोलणाऱ्यांनी महाराष्ट्राची वसाहत केल्यावर काय ह्या आदिवासींना आपले गुलाम बनवले व ते हे महार आहेत? का ते दक्षिणेकडून आलेल्या कैकाडी, रामोशी, वडार, वगैरे जातींपैकी आहेत? ह्या दोन्हीही गोष्टी मला संभाव्य दिसत नाहीत. महाराष्ट्रातील अर्धवट रानटी जातींचा संबंध जंगलाशी आहे. त्यांचे पोटही काही अंशी जंगलाच्या देणगीवर व जंगलाच्या कामावर अवलंबून आहे. तसे महारांचे मुळीच नाही. बरे भटक्या जातीतही त्यांना घालता येत नाही.

त्यांच्या पायाला चाक बांधलेले असते व त्यांच्याइतकी पायपीट खेड्यात दुसरे कोणी क्वचित करीत असेल, पण ही सर्व भ्रमंती गावकामगार म्हणून असते. भटक्या जाती आज येथे तर उद्या तेथे अशा असतात, फक्त पावसाळ्यात त्यांचा मुक्काम एके जागी असतो. पण महार आपापल्या गावचे पिढीजात रहिवासी असतात. इतके असूनही महारांना नांगरटी फारशी माहितीच नाही. गावात सगळ्या महारांचा मिळून सगळ्यांत वाईट जमिनीचा एखादा तुकडा असायचा. त्या तुकड्यात पिकणार काय आणि त्यातील प्रत्येक कुटुंबाच्या वाट्याला तरी काय येणार? कोणाचेच लक्ष तो तुकडा कसण्याकडे नसते. इतर गावकऱ्यांचे तसे नसते. त्यांचा प्रत्येकाचा स्वत:च्या जमिनीशी एकजीव झालेला असतो. शेताला अंकुर फुटला की, त्यांच्या आशेला अंकुर फुटतो. शेत करपले की, त्यांचे जीवन करपते. शेताला पाऊस चांगला मिळाला की, त्यांची तोंडे टवटवीत होतात. पीक तान्हेले राहिले तर त्यांच्या तोंडाला कोरड पडते. शेतातल्या झाडापेक्षाही खोलवर त्यांचे आयुष्य पिढ्यानपिढ्या जमिनीत रुजलेले असते. जमिनीच्या सहवासाने त्यांना जमिनीचे वाण आणि गुण दोन्हीही लागतात. जमिनीचा रंग आणि जमिनीचा जडपणा दोन्हीही त्यांच्या अंगी येतात. त्यांचे चालणे धीरगंभीर, त्यांचे बोलणे अतिसावकाश आणि त्यांच्या मनाचे सर्व व्यवहार पण हळू चालतात; ह्याच्याबरोबर उलट महारांची स्थिती असते. त्यांना जड जमिनीतून पोटाला मिळवायचे नसते, तर माणसांकडून मोठ्या मिनतवारीने कोर-अर्धा कोर भाकर काढावयाची असते. घरात साठवण करण्याइतके कधी त्यांना मिळत नाही; इतके त्यांचे पोट हातावर असते. पडेल जनावर ओढायचे, गावचे निरोप घेऊन जायचे, पाटलाच्या मागे असायचे, गावात गस्त घालायची, सगळ्यांच्या जमिनीच्या भांडणात महारांची साक्ष असायची. यामुळेच चौकसपणा, हजरजबाबीपणा ही महारात दिसून येतात. बुद्धी चंचल आणि लवचिक असते. नव्या मनूत नवे चटकन् उचलण्याची त्यांची तयारी असते. पोटाच्या रोजच्याच काळजीमुळे म्हणा किंवा एकाच उद्योगाने पोट भरणे शक्य नसल्यामुळे म्हणा, ते हजार उद्योग करतात. त्यांना गावच्या सगळ्या घरातील खडानखडा माहिती असते. आणि तीसुद्धा फक्त चालू पिढीची नसून कित्येक पिढ्यांची! गावातली सगळी बिंगे, सगळ्या भानगडी, सर्व घरगुती कटकटी यांची महार म्हणजे एक चालतीबोलती नोंदवही असते. महारांना गाणे, नाचणे व नक्कल छान करता येते, आणि

त्यात त्यांना पिढीजाद मिळालेले मनुष्यस्वभावाचे ज्ञान फार उपयोगी पडते. हजारो वर्षे हीन स्थितीत काढून आता इतरांच्याबरोबर आम्ही आहोत ही भावना येऊ लागल्याने ह्या पिढीतील महारांची मनोवृत्ती मोठी नाजूक व भावनाप्रवण असते. वंशपरंपरा बळावलेले गुण व नवी परिस्थिती यांचे द्वंद्व त्यांच्यात उत्कटतेने पाहावयास सापडते. पैसे चांगले मिळोत किंवा थोडे मिळोत, महार चांगले कपडे घालतो, हे त्याच्या कलावान मनाचे दर्शक आहे असें मला वाटते. मी पाहून ठेवले आहे की, वर्गात साधारणपणे गबाळ पोशाक करणारे विद्यार्थी ब्राह्मण असतात. मराठ्यांचा पोशाक साधारणपणे बऱ्यापैकी असतो, व सर्वात झोकात असतो महार. ब्राह्मण आज चार पैसे मिळाले तर दोन मागे टाकील. पण महार आज सर्वच्या सर्व खर्च करील व उद्या परत पोटासाठी वणवण हिंडेल.

मी पुंण्यात निरनिराळ्या मराठा जातींची पाहणी करीत होते. एक दिवस महारांची व इतर काही जातींची मोजणी चालली होती. प्रत्येक माणसाचे नाव, गाव व पोटजात नोंदवहीत टिपून घ्यावयाची व नंतर त्याच्या डोक्याची मापे घेऊन रक्त घ्यावयाचे असा क्रम असे. माझ्या शेजारी माझा एक महार विद्यार्थी उभा राहून मला मदत करीत होता. येतील तसतशी नोंद होत होती- महार, भंगी, मांग, मांगगारुडी वगैरे. एवढ्यात एकजण आला व त्याने आपली जात 'हरिजन' म्हणून सांगितली. एक लहानसा विजेचा धक्का बसावा तसे सर्वांना झाले. मी माझ्या विद्यार्थ्यांकडे पाहिले तो त्याच्या चेहऱ्यावर राग, विषाद, तुच्छता हे विकार दिसत होते. त्याची-माझी दृष्टादृष्ट झाली तशी तो थोडा हसला. त्या हरिजनाला मला विचारावे लागलेच, "अहो, 'हरिजन' शब्दाने जात कळत नाही... माझ्या कामासाठी मला तुमच्या पोटजातीची नोंद करायची आहे." "अरे, 'हरिजन', 'हरिजन' काय चालवले आहेस? सांग की, तू महार आहेस म्हणून..." माझा विद्यार्थी हेटाळणीने म्हणाला, स्वाभिमानी महारांना 'हरिजन' शब्दाचा तिटकारा वाटतो. 'हरिजन' शब्दातील करुणा, खोटी दया त्यांना नको आहे. 'महार' शब्दामागे इतिहास आहे, परंपरा आहे. त्यांना 'महार' म्हणूनच मानाने जगायचे आहे. अशाच कितीतरी प्रसंगी महारांचे वैशिष्ट्य माझ्या नजरेस आले व अरबी समुद्रापासून तो वैनगंगेपलीकडे सर्व महार इथून-तिथून एकाच साच्यातले ही गोष्ट अनुभवास आली.

खानदेशातल्या एका गावी एका संध्याकाळी वंजाऱ्यांची मापे आटपून

आम्ही घरी चाललो होतो. रस्त्याने फारच थोड्या माणसांची आवकजावक होती. एवढ्यात एका वळणावर खड्या सुरात म्हटलेले गाणे ऐकू आले. वळण संपल्यावर पाहिले तो तिघे-चौघेजण सावकाश रमतगमत चालले होते. एकजण गाणे म्हणत होता. बाकीचे मधूनमधून साथ करीत होते व मधूनमधून गप्पा मारीत होते. आम्ही झपाझप चाललो होतो. आम्ही जवळ आलो तो गाणे थांबले. मी विचारले, ‘‘कसलं गाणं चाललं होतं?’’ सर्वांनीच चमत्कारिकपणे माझ्याकडे पाहिले, पण उत्तर दिले नाही. काय एवढेसुद्धा माहीत नाही? आम्हाला सांगायची जरूरी नाही, असाच भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसला. थोडे लांब गेल्यावर बरोबरच्या गृहस्थाने सांगितले की, ‘‘ते महार होते... आंबेडकरांचा पोवाडा चालला होता.’’ ते पुढे म्हणाले, ‘‘उगीच बोललात तुम्ही त्यांच्याशी.’’ पण मला तसे वाटले नाही. शब्दांनी न बोलता त्यांना काय सांगायचे होते ते त्यांनी अगदी स्पष्ट सांगून टाकले होते.

दुसऱ्या दिवशी मी ज्या जहागीरदाराकडे उतरले होते, त्यांच्याकडे गावचा महार काही कामासाठी आला होता. त्याने प्रत्येकाला लवून जोहार केला. जहागीरदारांच्या सांगण्यावरून ‘‘माप देण्यासाठी माणसे ताबडतोब लावून देतो’’ असे त्याने मोठ्या अगत्याने सांगितले. इतक्यात मला त्याची काठी दिसली. काठी कळकाची, धुराने लालसर काळी झालेली अशी होती. तीवर पितळेच्या तारेने हरतऱ्हेने विणून नक्षीकाम केले होते. मी काठी मागितली तेव्हा त्याने वाकून लांबून माझ्या हातात ती टाकली. स्वतः जहागीरदार व त्यांचे चिरंजीव अस्पृश्यता मानणारे नव्हते. मी तर त्यांच्यादेखतच एका महाराचे माप घेतले होते, मग काठी लांबून माझ्या हातात टाकण्याचे प्रयोजन काय? मी म्हटले ना की, महार एक स्वभावसिद्ध नट असतो म्हणून, त्याचे हे उदाहरण. ‘तुम्ही हल्लीच्या माणसांनी शिवाशीव केली म्हणून काय आम्ही रीत सोडायची? जहागीरदारांकडे कशी वागणूक पाहिजे ती काय आपल्यासारख्यांनी विसरायची होय?’ असेच जणू तो मला विचारीत होता. पण हे करीत असताना त्याच्या तोंडावर किंचित हसू होते. त्याच्या डोळ्यात मिस्किलपणा भरलेला होता. ‘‘हे सगळे नाटक आहे, हे तुम्हाला ठाऊक आहे अन मला पण ठाऊक आहे.’’ हाच त्याचा भाव होता.

नागपूरला बेझन बागेत मी मापे घेत होते व माझ्याभोवती महारांचा घोळका जमला होता. ही मापे मी का घेते? ह्यापासून काय अनुमाने

काढणार? वगैरे प्रश्नांचा पाऊस पडत होता व शक्य तितक्या प्रश्नांची उत्तरे शक्य तितक्या सोप्या भाषेत द्यावयाचा माझा प्रयत्न चालला होता. इतक्यात एकजण म्हणाला, ''बाई, ह्याबद्दल लिहिलेले एखादे पुस्तक दाखवा की आम्हाला.'' मला हेच हवे होते. मी जराशा ऐटीनेच स्वत: लिहिलेले एक इंग्रजी लिखाण त्याच्यापुढे टाकले व म्हणाले, ''पाहा, यात सगळे काही आहे.'' इतर जातींच्या बाबतीत माझी ही युक्ती हटकून यशस्वी झाली होती. माझे इंग्रजी पुस्तक पाहून व साधारण इंग्रजी जाणणाऱ्यांनासुद्धा न कळणारे ते जाडे-जाडे शब्द पाहून चौकस माणसे गप्पच बसायची; पण ह्या गृहस्थाने मला दाद दिली नाही. त्याने एकदा पुस्तकाची पाने चाळली, पुस्तक टेबलावर फेकले, आणि मान हलवून मला म्हणाला, ''हे पुस्तक तर इंग्रजीत आहे. आमच्यासारख्यांना ह्यात काय लिहिलं आहे ते काय कळणार? आम्हाला कळायला तुमचं पुस्तकं मराठीत हवं होतं, नाही का?''

ह्यानंतर काही दिवसांनी मी भंडाऱ्याहून साकोरीला चालले होते. गाडी भंडाऱ्याहून सकाळी निघाली. जवळजवळ गाडीची भरती झाली होती. अर्धा मैल जाऊन गाडी थांबली व गृहस्थ गाडीत शिरले, ''आज सकाळीच काम सोडून बाहेरगावी कुठं निघाला?'' गृहस्थ म्हणाले, ''ह्या महारांची प्राथमिक निवडणूक आहे ना! त्याच्या प्रचारासाठी मला तीन दिवसांची सुटी मिळाली आहे.'' म्हणजे तुमचा ह्या निवडणुकीशी काय संबंध?'' गृहस्थ सांगू लागले, ''तो शिदू महार आहे ना आमच्या कारखान्यातला, तो काँग्रेसच्या तिकिटावर उभा राहिला आहे. आमचे शेट त्याला मदत करताहेत.'' ''मग शेटची दुसरी माणसे का नाही जात?'' ''हेच तर तुम्हाला कळत नाही. तो शेटचा माणूस म्हणून काही जाहिरात नाही लावायची, समजतात? इकडे लोकांना कुणकुण आहे, पण तिकडे गोंदियाचे बाजूस अजून लोकांना माहीत नाही तोवर त्याच्याबद्दल काँग्रेसच्या बाजूने प्रचार करण्यास जात आहे.'' थोडा वेळ कोणी काही बोलले नाही. परत एकाने प्रश्न केला, ''कोठचा उमेदवार निवडून येईल ह्याचा काही अंदाज आहे का?'' कार्यकर्त्याने तोंड जरा आंबटच करून उत्तर दिले, ''आंबेडकरांचा माणूस पहिला हे ठरलेलेच आहे. बहुधा दुसराही त्यांचाच येईल. किती पैसा ओतला तरी पहिली जागा आम्हाला मिळणे शक्य नाही.'' मनातल्या मनात मी महारांना धन्यवाद दिले. माझे मन केवढे मोठे झाले होते! कार्यकर्त्यांचे तोंड जरा खुलले. तो पुढे म्हणाला, ''पण तिसरी व चौथी जागा आमचीच

आहे. आणि मग सार्वत्रिक निवडणुकीत आंबेडकरांच्या माणसाचा धुव्वा ठरलेलाच आहे. पैसा मात्र खूप खर्च होणार आहे.'' हे ऐकून एक गृहस्थ म्हणाले, ''काय भाव चढला आहे आज त्यांना!'' ''रोज अडीच रुपयालासुद्धा काम करायला तयार नाहीत ते.'' शेवटचा माणूस म्हणाला.

गोंदिया-भंडाऱ्याच्या बाजूला देशी बिड्या प्रचंड प्रमाणात करतात. त्यासाठी जी टेंभुर्णीची पाने लागतात ती गोळा करणाऱ्या हंगामाला अजून नीटशी सुरुवात झाली नव्हती. पण लवकरच काम सुरू व्हावयाचे होते. हिवाळा संपून नवी पात फुटली की, जास्तीत जास्त पाने गोळा करून आणण्याची धांदल सबंध जंगल प्रदेशात उडालेली असते. विडी कारखान्यातील कामे- पाने गोळा करणे, ती निवडणे, कातरून त्यांना आकार देणे, ती वाळवून पुडे बांधणे, विड्या वळणे वगैरे सर्व महारच करतात. घरातील पुरुष उजाडण्याच्या आतच कारखानदारांच्या रिंग्या घेऊन रानात जातात. तेथे सूर्य उगवल्यापासून मावळेपर्यंत पाने ओरबाडण्याचे काम चालते. जसजशा गाड्या भरतात तसतशा त्या मालक सांगेल त्या त्या ठिकाणी रवाना होतात. तेथे म्हातारे-कोतारे, बायका-पोरे दिवसभर पाने कातरीत असतात. दिवसाचा वेळ फुकट जाऊ नये म्हणून बायका रात्रीचीच दळणे करून भाकरी भाजून ठेवतात. मी कार्यकर्त्यास- विडी कारखानदाराच्या आश्रितास- विचारले, ''महारांना दिवसाचे किती तास काम पडते हो?'' तो उत्तरला, ''तास कसचे विचारता? हंगामात दिवसाचे बारा तासही कामाला पुरत नाहीत. पाने आणणे, कातरणे, पुडे बांधणे वगैरे निरनिराळ्या कामाप्रमाणे दाम मिळतो त्यांना. आजकाल फारच शेफारले आहेत ते.'' दुसरा एकजण म्हणाला, ''आणि एकेकाचा पोशाक तरी पाहा. कोशा, सिल्कचा शर्ट व सोन्याच्या रिस्टवॉच! दिसतात का तरी तुम्हाआम्हाला?'' तिसरा बोलला, ''अहो, त्यांचं सगळं कुटुंबच्या कुटुंब पैसे मिळवतं ह्या दिवसांत.'' मत्सराचा एक सामुदायिक ध्वनी गाडीत उमटला.

मला माझ्या प्रवासातली एक सकाळ आठवली. रानातून प्रवास करीत असता मी महारांच्या वस्तीला आले होते. घराच्या पुढेच एक अशक्त व फिक्कट दिसणारा मुलगा पानांची रास पुढे घालून बसला होता. त्याच्या आईने सांगितले, ''बाई, तो अशक्त आहे, त्याचे पाय लुळे आहेत, चालता येत नाही. पण बसून पानं कातरली म्हणजे दिवसाचे आठ-बारा आणे

मिळतात. तेवढंच त्याचं पोट बाहेर पडतं.'' त्या मुलाचे केविलवाणे डोळे, त्याच्या आईचे कित्येक दिवसांत वेणी न घातलेले डोके, कित्येक दिवसात न धुतलेले लुगडे व माझ्याशी बोलताना सुद्धा चाललेला पाने कातरण्याचा उद्योग ही सर्व माझ्या डोळ्यांपुढे उभी राहिली. खरेच, महाराच्या घरी तान्ह्या मुलाखेरीज सगळे कुटुंबच्या कुटुंब पैसे मिळवीत असते. चार पैसे मिळाले की, खर्च होण्यासही वेळ लागत नाही. शेजारच्या मोठ्या शहरी जायचे, बाजारात छानछोकीची जी वस्तू दिसेल ती दुप्पट पैसे देऊन विकत घ्यायची, चार दिवस निरनिराळ्या उपाहारगृहात जाऊन मन मानेल तसे चरायचे, यथेच्छ दारू प्यायची, तमाशाला जायचे आणि खिसे मोकळे झाले की घरी येऊन घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणे कामाला लागायचे. गाडीतल्या पांढरपेशा माणसांना ह्या आयुष्यक्रमाचा का बरे एवढा हेवा वाटावा?

भंडाऱ्याच्या पुढे हाळबी लोकांच्या प्रदेशात माझे ह्यापुढील काम होते. तेथे अर्जुनीला दोन-तीन दिवसांचा मुक्काम होता. शेजारच्या दोन-चार गावांतून महारांना बोलावले होते. तेथेही नागपूरचाच अनुभव मला आला. गोंड, हाळबी, कुणबी मापे देऊन रक्त देऊन जात होते. पण मी हे काय चालवले आहे हे काही कुणी विचारले नाही. महार आले ते सगळे मिळून चार-पाच मैल चालून आले. त्यांनी मापे घेताना मी डोके का मोजते हे विचारले, सरकारांतून त्याबद्दल मला काय मिळते ते विचारले, किती रिक्रूट पाठवले तर किती कमिशन मिळते ते विचारले. शेवटी माझे काम रिक्रूट भरतीसाठी नाही ह्याची खात्री पटल्यावर दोन क्षण मोजणीचे काम पूर्ण शांततेत झाले. मला वाटले, संपली ह्यांची प्रश्नावली. पण छे! रिक्रूट भरतीसाठी तर नाही, पण मग ही मोजणी कशासाठी चालवली आहे ते समजावून सांगण्याची भुणभुण सुरू झाली. शेवटी अगदी निरक्षर माणसांना मानवशास्त्राचे धडे देण्याइतपत माझी तयारी आहे का नाही ह्याची परीक्षा मला देण्याची वेळ आली. रक्त काढल्यावर मला जेवायचे होते. ते रक्त मीच तपासणार हे कळल्यावर तर मंडळी तेथून हलच ना. ''तुम्ही काय करता ते आम्ही पाहू न मग जाऊ'' असे त्यांनी निक्षून सांगितले, व मग माझ्याभोवती कोंडाळे करून कोणाचे रक्त 'अ' आहे, कोणाचे 'ब' आहे, ते कसे ओळखायचे, ह्याची समजूत करून घेतली. ''काय रे मग बामणाचं रक्त न आपलं रक्त सारखं आसलं तर काय होईल?'' ''मग म्हणून काय झालं? आम्ही काय माणसं नाहीत?'' ''अरे, पण निराळं असलं तर रे?'' ह्याला

उत्तर न सुचल्यामुळे सर्वांनी माझ्याकडे वळून "मग बाई..." अशी सुरुवात केली. पण माझ्या सुदैवाने गावचा पोलीसपाटील तेवढ्यात येऊन सर्वांना काही कामाला घेऊन गेला, व मी त्यांच्या प्रश्न-राक्षसांच्या तावडीतून सुटले.

ह्यापुढचा मुक्काम खजरी येथील हाळबी जमीनदाराकडे होता. तेथला पटवारी एक हुशार, मध्यम वयाचा व अर्थातच लिहिता-वाचता येणारा महार होता. नेहमीप्रमाणे त्याने माझी सर्व व्यवस्था केली व आम्ही जेवावयास बसलो. मला अर्थातच स्पृश्यास्पृश्यतेचा प्रश्न नव्हता. पण बरोबर काही इतर गावकरी होते. पटवाऱ्याने कोळ्याकडून पाने अशा खुबीने मांडली की लहानशा ओसरीवर साधारणपणे वर्तुळात एकमेकांपासून दूर...दूर.... सर्वजण तर एकत्र आणि कोणी कोणाच्या पंक्तीत तर नाही... अशी आम्ही बसलो व जेवणे झाली. हा गृहस्थ दोन दिवस माझ्याबरोबर हिंडावयास होता. त्याच्या गप्पा, त्याचा अनुभव, मोकळेपणाने वागूनही कधी चुकून मर्यादेचा अतिक्रम न करणे ह्या गुणांनी मला त्याच्याबद्दल आपुलकी वाटू लागली.

माझ्या मनात सारखे येई... त्याच्या मुलांना खाऊसाठी म्हणून काही द्यावे. पण ज्या माणसाबरोबर बरोबरीच्या नात्याने दोन दिवस काढले त्याला अशा प्रकारे उचलून पैसे द्यावे हेही मनाला प्रशस्त वाटेना. दुपारी रक्तपासणीचे काम चालले होते. माझ्याजवळ दोन-चार काचेच्या नळ्या-मागे रबराचा फुगा लावलेल्या अशा रक्त घेण्यासाठी होत्या. त्यांची पेटी उघडून माझे काम चालले होते. पटवारी म्हणाला, "बाई, तुमचं अडणार नसेल तर एक नळी द्या. फाऊंटन पेन भरायची भारी पंचाईत पडते." त्यांच्याबरोबरच साकोरीपासून वाटाड्या म्हणून पाठवलेला एक ब्राह्मण होता, तोही आमच्यात गेले चार दिवस होता. तो म्हणाला, "अहो, असं मागता काय... मला पण फाऊंटनची अडचण पडते, पण मी मागितलं का?" पटवारी म्हणाला, "त्यांत काय झालं? बऱ्याचशा नळ्या दिसल्या. एक मागितली; अडणार नसेल तर घेतली, नाही तर नाही." पटवाऱ्याने क्षुल्लक वस्तू आपण होऊन अगदी सहजगत्या मागण्यात कोणतेच दैन्य दाखवले नव्हते. उलट, दोन दिवसांच्या सहवासात उत्पन्न झालेल्या खेळीमेळीच्या, बरोबरीच्या भावनेचे ते द्योतक होते. मागणी ऐकून मला पण आनंद झाला. देणगी इतकी क्षुल्लक की, देणाऱ्याला व घेणाऱ्याला

आनंदाखेरीज कसलीच देवाणघेवाण करण्याची तसदी नव्हती. महारांना माणसा-माणसांच्या संबंधाचे ज्ञान उपजत असते असे मी म्हणते ते ह्यामुळेच. ज्या गोष्टी आम्हाला शिकाव्या लागतात त्या त्यांना आधीच माहीत असतात आणि त्या बोलून जाण्याची त्यांची पद्धत इतकी सहज, सरळ व बिनतोड असते की, त्याच्यापुढे उत्तरच नसते. माझ्या प्रवासात मी जवळजवळ मराठी मुलुखाची सीमा गाठली होती. पुढे जावे का नाही हे अजून ठरले नव्हते. रम्य वनप्रदेश, साधे-भोळे, निरक्षर, मला पूर्वी माहीत नसलेले मराठी बोलणाऱ्यांचे समाज ह्यात मन रमले होते. पण घर सोडून फार दिवस झाल्यामुळे घरची ओढ लागली होती. महाराष्ट्राची सीमा कोणती ह्याबद्दल आमचे बोलणे चालले होते. कोणी म्हणत होता, ‘‘ह्या नदीच्या पलीकडे हिंदी बोली सुरू झाली;’’ कोणी म्हणत, ‘‘त्या गावातले लोक निम्मे मराठी, निम्मे हिंदी आहेत.’’ महार पटवारी म्हणाला, ‘‘जेथपर्यंत महार पोचले तिथपर्यंत महाराष्ट्र!’’

१३

# दिक्काल

गौरी विचारत होती, ''आता परत ग कधी खीर करणार?'' मी म्हटले, ''तुझ्या पुढच्या वाढदिवसाला.'' खीर खाता-खाता ती थांबली. तिने क्षणभर मोठ्या गंभीरपणे विचार केला व परत विचारले, ''म्हणजे पुढच्या मंगळवारी ना?'' सगळी भावंडे तिला हसली. ताई म्हणाली, ''अहा रे वेडाबाई! काल एवढं कोष्टक शिकलीस तरी आपलं डोकं रिकामच. अगं चोवीस तासांचा एक दिवस, तीस दिवसांचा एक महिना व बारा महिन्यांचं एक वर्ष. बरोबर एक वर्षानं तुला खीर मिळणार, समजलीस?'' हे कोष्टक गौरीला तोंडपाठ होते, पण ह्या कोष्टकाचा तिच्या अनुभवाशी काडीमात्र संबंध नव्हता. तिची कालगणना अगदी तिची स्वत:ची अशी होती. ''गौरे, आपण तासाभरानं गाडीत बसून फिरावयास जाऊ'' असे म्हटले म्हणजे ती चटदिशी तयार होते व दर दोन मिनिटांनी येऊन विचारते, ''झाला का गं तास?'' तेच फिरून येताना ''चला घरी, फार उशीर झाला'' असे म्हटले म्हणजे ती ताडतोब म्हणते, ''आत्ता तर फिरावयास निघालो, इतक्यातच काय ग घरी

जायचं?'' तिचे तासच काय, पण क्षण, दिवस वगैरे सगळीच कालपरिमाणे अगदी रबरासारखी लवचिक व सर्वस्वी तिची स्वत:ची अगदी खासगी अशी आहेत. आम्ही तिचे आचारविचार घड्याळाच्या वाटोळ्या तबकडीत बसविण्याचा प्रयत्न करीत आहोत व ती बिचारी लौकरच ह्या प्रयत्नाला बळी पडेल, पण अजून तरी तिचे कालमापन स्वतंत्रपणे चालू आहे.

असेच स्वतंत्र कालमापन लहानपणी, मला वाटते, सगळ्यांचे चालू असते. मोठेपणी मात्र आपली काळाची जाणीव दिशेच्या जाणीवेशी इतकी जखडून टाकलेली असते की, आयुष्यातील काही असामान्य प्रसंगीच दिङनिरपेक्ष काळाची जाणीव आपणास होते. रात्री निजले म्हणजे सकाळी उठेपर्यंत काही काळ गेला हे कळावयास मुलांना किती उशीर लागतो! कधी कधी मुले बोलतात त्यावरून आपल्याला त्यांच्या मनात डोकावता येते, पण ती बरेचदा आपले अनुभव सांगत नाहीत- तशी त्यांना गरज वाटत नाही. एखादे वेळी आपल्या लक्षात येते की, त्यांचे आणि आपले विश्व अगदी निराळे आहे म्हणून! नंदू काकाकडे राहावयास जाऊन आला होता व मी त्याला विचारीत होते की, काकाकडे काय काय गंमत केलीत म्हणून. खेळणे, हुंदडणे, खाणे, भांडणे, वगैरेचे वर्णन झाल्यावर नंदू आठवण झाल्यागत थांबला व म्हणाला, ''काकाकडे सगळं चांगलं होतं, पण रात्री झोप मात्र मुळीच येत नसे.'' ''म्हणजे काय बाबा? काय डास ढेकूण फार होते?'' मी आश्चर्याने विचारले. ''छे! ग! डास ढेकूण काही नव्हतं... पण झोप यायची नाही एवढं खरं. जरा कुठे अंथरुणावर पडतो न पडतो तो चहाच्या कपबशाच्या खडखडाटानं जाग यायची.'' रात्री नवापासून सकाळी आठापर्यंतचा गाढ झोपेत घालविलेला अकरा तासांचा वेळ नंदोबाच्या मते काही क्षणांचा होता!

आणि खरोखरच तो काही क्षणांचाच होता. त्या क्षणांना अकरा तास म्हणणे ही एक फसवणूक आहे. काल ही एक संवेदना आहे, व तिचे मोजमाप करायचेच तर कालपरिमाणानेच व्हावयास पाहिजे; पण आपण कालाची दिशेशी सांगड घातली आहे व दिशेची लांबी, रुंदी, खोली व उंची ही परिमाणे मोजून काळ मोजल्याचा आभास निर्माण करीत असतो. घड्याळ, घटियंत्र, छायायंत्र, सर्वच साधने एका अचल पार्श्वभूमीवर दुसऱ्या हलणाऱ्या वस्तूंचा संचार किती झाला एवढेच दर्शवितात. घड्याळाच्या गोल

तबकडीवर काटे हलत असतात, त्या काट्यांच्या हलण्याच्या गतीवरून आपण क्षण, तास व दिवस मोजतो. छायायंत्रामध्ये एका उभ्या दांड्याची छाया प्रवास करते, व तिचा जमिनीवरील प्रवास किती झाला हे बघून वेळ ठरविता येतो. घटिकापात्रात तर दिशेची- अवकाशाची- सर्वच परिमाणे कालमापनासाठी योजतात. वाटीची सर्व लांबी, रुंदी व उंची भरली म्हणजे कालाचा एक घटक झाला असे मानतात- ह्या सर्व युक्त्यांनी आपण मोजतो काय, तर पदार्थांची सापेक्ष गती व त्याला नाव देतो कालाचे! सर्व पदार्थ जर सारखेच गतिमान असते तर काळ कसा मोजता आला असता? मी आगगाडीच्या डब्यातून प्रवास करताना बाहेरचे सर्व पदार्थ विरुद्ध दिशेने धावताना दिसतात, पण मी स्वतः गतिमान आहे ह्याची जाणीव मला नसते. पृथ्वीबरोबर पृथ्वीवरील सर्वच सजीव-निर्जीव पदार्थ फिरत असतात, पण त्याची आपणाला जाणीव कोठे आहे? आपल्याला जाणीव आहे ती फक्त पृथ्वीच्याच गतीने न फिरणाऱ्या वस्तूंची, व आपण त्यांचा कालमापनासाठी उपयोग करतो. वस्तूंचे स्थित्यंतर म्हणजे काळ अशीच आपण काळाची व्याख्या करून टाकली आहे. सूक्ष्मात सूक्ष्म व मोठ्यात मोठा काळ गेला हे दाखवितानाही आपण ह्याच व्याख्येचा आधार घेतो. निमिषमात्र म्हणजे डोळ्यांच्या पापण्यांची अवकाशात जाणारी एक हालचाल. जैन वाङ्मयात काळाचे एक अचाट कोष्टक सापडते. एक महायोजन लांब, तितकीच रुंद व तितकीच खोल अशी विहीर खणावी. ती कोकराच्या अगदी अतिशय बारीक कापलेल्या केसांनी इतकी ठासून भरावी की, त्याच्यावरून पूर लोटला तरी फक्त वरचा थरच भिजावा. अशा ह्या विहिरीतून दर युगशतानंतर एक-एक केस काढीत ती रिकामी होण्यास जो वेळ लागेल तो पल्योपमा काळ! जैनांच्या कल्पनाशक्तीचे कौतुक वाटते, पण त्यांनाही काळाची कल्पना आली असे म्हणवत नाही. सर्व परिमाणे मुळी दिशेचीच दिली आहेत. 'युग' हा शब्द तेवढा कालदर्शक आहे, पण युग हे संवत्सरावर, संवत्सर दिवसावर व दिवस सूर्याच्या आकाशातील स्थलांतरावर आधारलेला आहे असे पाहिले म्हणजे आपण मोजतो ते स्थित्यंतर, काल नव्हे, हे कळते.

पण लहान मुलांना- अगदी तान्ह्या मुलांना- घड्याळ वगैरे माहीत नसते तेव्हा काळ गेला हे कळतेच की नाही? ती कशी दर तीन साडेतीन

तासांनी खायची आठवण ठेवतात-- रात्री निजली म्हणजे कशी अगदी नेमकी भल्या पहाटेस चार वाजता जागी होतात? आमचा नंदू म्हणे की, त्याच्या पोटात घड्याळ आहे. लहान मुलांचे सर्वच आयुष्य ह्या पोटातल्या घड्याळाबरहुकूम चालू असते- पण लहान मुलांना काळ गेला ही जाणीव असेलसे वाटत नाही. त्यांना जाणीव असते फक्त भुकेची. ती उठतात ती पोट रिकामी झाली म्हणजे... थकलेली इंद्रिये ताजीतवानी झाली म्हणजे ती टकटक बाह्यजगाकडे बघतात, उगीचंच हातापायांची हालचाल करतात, भूक लागल्यास पितात व थोड्याच वेळात परत झोपी जातात. आपण मोठी माणसे वेळ मोजतो आणि तो वेळ म्हणजे बाळाच्या भरल्या पोटातून अन्न आतड्यात प्रवास करते तो वेळ- ऊर्फ अन्नाचे पोटाच्या पिशवीतून आतड्यात होणारे स्थलांतर. म्हणजे परत चल वस्तूंचे एका विशिष्ट अवकाशातील भ्रमण! मुलांना काळाचे ज्ञान मोठी माणसे हळूहळू करून देतात पण त्यांना काळाची अनुभूती वा संवेदना कधी येते ते मात्र कळत नाही.

थोडा वेळ माझे काळाचे ज्ञान बाजूला ठेवून माझी काळाची संवेदना वा अनुभूती काय आहे ह्याचा विचार केला तर ती गौरीपेक्षा निराळी नाही असेच दिसते. मलासुद्धा काही क्षण युगासारखे वाटतात व काही वर्षे क्षणासारखी वाटतात. आयुष्यातले कुठचेच दोन दिवस सारख्या लांबीरुंदीचे वाटत नाहीत. कित्येक वेळा मुठीत घट्ट धरलेल्या वाळूच्या कणांप्रमाणे काळ झपाट्याने सरत असतो. तर कित्येकदा एखाद्या पर्वताप्रमाणे. स्थिर व अचल कालाची धोंड माझ्या हृदयावरून काही केल्या मला दूर करता येत नाही. ह्या अनुभूतीचा दिशेशी काही संबंध नसतो व ती सर्वस्वी आत्मगत असते. सर्वच संवेदना, मग ती कालाची असो, सुख-दु:खाची असो वा वस्तूची असो, अशी आत्मगत, स्वतंत्र असते. व्यवहाराच्या किंवा भाषेच्या द्वारे आपण तिला सार्वजनिक बनवतो. जेव्हा संवेदना भाषेच्याद्वारे सार्वजनिक बनते तेव्हाच निरनिराळ्या संवेदनाची तुलना करता येऊन ज्ञानलाभ होतो. कालाच्या संवेदनेला ज्ञानाच्या चौकटीत बसविण्यासाठी, सार्वजनिक बनविण्यासाठी, तिची दिशेशी सांगड घातली आहे व कालांतर म्हणजे स्थित्यंतर असे समीकरण आज सर्वांनी मानले आहे. आपण जसजसे मोठे होतो.... जसाजसा इतरांशी आपला व्यवहार वाढतो, तसतसे काळाच्या

मूळ संवेदनेचे स्वरूप आपण पार विसरून जातो व मूळ जाणिवेला माहीत नसलेले कित्येक गुणधर्म काळाला चिकटवतो. हेच आपले कालविषयक ज्ञान!

काल सार्वजनिक केल्यामुळे तो सारखा एकजिनसी आहे व व्यक्तिनिरपेक्ष आहे असे मानणे अगदी चूक आहे. व्यावहारिक कालमापन सूर्याच्या आकाशातील स्थलांतरावर आधारलेले आहे. सूर्याचे स्थलांतर वास्तविक एक भास वा माया आहे व ही माया पृथ्वीच्या दैनंदिन गतीमुळे उत्पन्न होते. जेव्हा पृथ्वी तरुण पोर होती तेव्हा आतापेक्षा कितीतरी जास्त वेगाने आपल्याभोवती गिरक्या घेत होती. तिचा गिरक्या घेण्याचा वेग सारखा मंदावत आहे आणि जेव्हा ती आणखी वयस्कर होईल तेव्हा तिचा वेग हल्लीपेक्षा कितीतरी मंदावेल, आणि जेव्हा बिचारी मरणोन्मुख आणि जराजर्जर होईल तेव्हा तिच्या गाऱ्या-गाऱ्या भिंगोऱ्या पूर्णतया थांबतील. पृथ्वीवरील दिवस सारखा लांबतो आहे व एक वेळ अशी येईल की, काहींना अनंत दिवस मिळेल तर काहींना अनंत रात्रीच्या भयाण अंधारात कुजावे लागेल. तेव्हा सार्वजनिक काळ ही काही कधी न बदलणारी सर्वनिरपेक्ष अशी चीज मुळीच नाही, किंवा कोणत्या तरी शकाप्रमाणे कालगणना करू म्हटले तरी तीसुद्धा सर्वस्वी सांकेतिक व बरीचशी अनिश्चित अशी राहते. ज्या व्यक्तीच्या जन्मावरून शकगणना होते त्या व्यक्ती कधी जन्मल्या हेच नक्की माहीत नसते. शालिवाहन व विक्रम हे कधी झाले, ते खरोखरीच्या व्यक्ती होते की केवळ काल्पनिक पुरुष आहेत ह्याबद्दलच मुळात शंका आहे. ख्रिस्ती शकाची तीच कथा. बरे, ही शकगणना खरी म्हणून मानली, तरी ती जीवर आधारलेली आहे ती व्यक्ती कधी जन्मली? अशी विचारणा केली तर त्याचे उत्तर धड देता येत नाही. अर्थात ही कालगणना निरुपयोगी असे मी म्हणत नाही, पण ती असावी तितकी व्यक्तिनिरपेक्ष व दोषरहित नाही हे खास. जेथे अशा कालगणनेचा उपयोग असेल तेथे अवश्य करावा, पण सर्वच वैयक्तिक कालगणना त्यावरून करण्याचा आग्रह का? माझा शास्त्रज्ञ नवरा म्हणतो, ''तुम्हा बायकांना कोणतीही घटना कधी झाली म्हणून विचारलं तर तुम्ही त्याचं कधी नीट शास्त्रशुद्ध उत्तर देणार नाही. अमक्या साली, अमक्या महिन्यात, अमक्या तारखेला, इतक्या वाजता असं कधी तुम्ही सांगतच नाही-- काय तर म्हणे, 'जाई शाळेत जाऊ लागली तेव्हा नंदू

तीन वर्षांचा होता- गौरी जिन्यावरून पडली तेव्हा नुकतीच आमची रात्रीची जेवणं आटपत होती.' ह्या बोलण्यावरून तुम्हा बायकांना काय अर्थबोध होत असेल देव जाणे! जाई १९३८ साली शाळेत जाऊ लागली- गौरी रात्री साडेआठच्या सुमारास जिन्यावरून पडली... म्हणजे कसं लख्ख सर्वांना कळतं.'' त्याच्या शास्त्रीय मनाला व्यक्तिगत कालगणना पसंत नाही हे उघडच आहे. पण खाजगी गोष्टींना सार्वजनिक कालगणना लावण्याचा अट्टाहास का हेच मला समजत नाही. सार्वजनिक कालगणना अगदी शास्त्रशुद्ध असती तर कदाचित हा अट्टाहास ठीक म्हटला असता, पण तीच जर तर्कशुद्ध नाही तर जेथे तिचा उपयोग खरा तेथे ती वापरावी, नाही तिथे इतर जास्त अन्वर्थक, सहेतुक कालगणना करण्यास प्रत्यवाय का? शिवाजीराजे १६३० मध्ये जन्मले व १६८० मध्ये वारले असे म्हटले तरी ठीक झाले. शिवाजी महाराजांसारख्या युगपुरुषांच्या जन्मेतिहासाचे कालमापन सार्वजनिकरित्या व मानवेतिहासाला महत्त्वाच्या ठरलेल्या दुसऱ्या घटनेशी संबंध जोडून अवश्य करावे. पण माझ्या जाईच्या शाळेत जाण्याची ख्रिस्ताच्या जन्माचा संबंध जोडणे निरुपयोगी व म्हणून अशास्त्रीय नाही का? मी कधी मॅट्रिक झाले ते मला सांगता येत नाही. एवढे बारीक आठवते की, माझ्या धाकट्या भावाची मुंज त्या वर्षी झाली. त्या मुंजीच्या निमित्ताने मला आईने घेतलेल्या शालूची आठवण येते. आमच्या पुण्याच्या घरचे पहिलेच मोठे कार्य म्हणून सर्व नातेवाईक मंडळी आली होती ते आठवते; माझ्या भावाला पुढ्यात घेऊन मातृभोजनाला बसलेली आई डोळ्यांपुढे दिसते; कधी नव्हत ते सोवळ्याचा पीतांबर नेसलेली, अंगावर शाल पांघरलेली माझ्या वडिलांची भव्य मूर्ती आज पुढ्यात उभी आहे असे वाटते. पण मी अमक्या साली मॅट्रिक झाले असे म्हटले तर त्यापासूनच मला अर्थबोध होत नाही. की माझ्या व माझ्या स्वकीयांच्या आयुष्यातील एक सुखमय घटना म्हणून संवेदना होत नाही. 'ख्रिस्ताच्या जन्मानंतर एकोणीसशे अमुक वर्षानंतर तुझं लग्न झालं' हे म्हणणे जास्त बरे की, 'लग्न झालं तेव्हा तुला नुकतीच नोकरी लागली होती- लग्न झाल्यावर तुझ्या बायकोच्या परीक्षेचा निकाल लागला' अशी इतर घरगुती घटनांना सापेक्ष अशी कालगणना बरी अशी विचारणा केली तर, मला वाटते, अगदी पक्का शास्त्रीय माणूससुद्धा आमची बायकी कालगणनाच पत्करील.

अवकाशाचे अत्यल्प परिमाण बिंदू हे आहे. ह्या बिंदूला अवकाशात स्थान असते. पण लांबी-रुंदी-उंची नसते. त्याचप्रमाणे कालाचे अत्यल्प परिमाणही बिंदुमात्रच आहे. आपल्याला अवकाशाची वा कालाची जी संवेदना होते ती मात्र कधीही बिंदुमात्राची नसते. अवकाशाची संवेदना डोळ्यांनी व शरीराच्या हालचालींनी होते, व दर वेळी ती संवेदना ज्याला लांबी नाही, रुंदी नाही, अशा रोडक्या अवकाशाची नसून लांबी, रुंदी व खोली ह्या तीन परिमाणांबरोबरच रंग व प्रकाश ह्यांनी भरगच्च भरलेली व भावनांनी जिवंत अशी असते. हा संवेदित अवकाश बिंदू-बिंदू मिळून झाला असे मुळी आपल्याला कधीच प्रत्यक्षपणे कळत नाही. जशी अवकाशाची संवेदना साकार, सवर्ण असते तशी कालाची संवेदनासुद्धा नेहमीच घटनांनी भरलेली, भावनांनी प्राणलेली अशी होते. फार काय, आपल्याला काळाची संज्ञा होत नाही. आपण काळ जगत असतो व घटना अनुभवीत असतो. तर्कदृष्ट्या अवकाशाच्या प्रत्येक बिंदूच्या मागे, पुढे, वर, खाली अवकाशाचे इतर बिंदू असतात, संवेदनात्मक अवकाश नेहमीच एक मोठा तुकडा असतो व त्याच्या अवतीभोवती अंधुक जाणलेली पण पूर्ण संवेदित न झालेली अशी अवकाशाची सबंध अस्पष्ट मर्यादा असते. त्याचप्रमाणे, संवेदनात्मक काळ हा नेहमीच एक मोठा छेद असतो व त्याच्या पुढचा-मागचा काळ अंधुकरीत्या त्याला मर्यादा म्हणून जाणीवेत असतो. बिंदुमय अवकाश व त्याचे योगाने मोजलेला बिंदुमय काळ ह्यांच्यातील प्रत्येक बिंदू इतरांपासून विलग असतो- प्रत्येक बिंदू एकापुढे एक असतो. प्रत्येक क्षण गेलेल्या क्षणाच्या पुढे व येणाऱ्या क्षणाच्या मागे असतो. पण संवेदित दिक व संवेदित काल हा पुंजरूप असल्यामुळे त्यात पुढचे व मागचे ह्या मर्यादा पुसट झालेल्या असतात. साकार, सवर्ण अवकाशात आकाराची व वर्णाची जाणीव एकदम होते. त्यात अमके मागे, अमके पुढे असे नसते. त्याचप्रमाणे घटनात्मक कालाचा प्रत्येक तुकडा भूत, वर्तमान व भविष्य मिळून झालेला असतो. संवेदित कालाच्या प्रत्येक क्षणावर मावळत्या भूतकाळाची छाया व उगवत्या भविष्याचे अरुणकिरण दाट पसरलेले असतात. आपल्या संवेदनेतील काल हा भूत, वर्तमान व भविष्य ह्या तीन परिमाणांचा बनलेला असतो. वर्तमानाच्या जाणिवेत भूताचा वा भविष्याचा किती लांब तुकडा येईल हे अर्थातच संवेदनेवर अवलंबून असणार. प्रत्येक क्षणाची लांबी-रुंदी

जर बदलती असेल तर त्याची भूतभविष्याची परिमाणेही थोडीबहुत लवचिकच असणार. कधी चालू क्षणाचीच जाणीव इतकी तीव्र असेल की, इतर क्षण केवळ नाममात्र त्यात असणार, तरी कधी टेकडीवर उभे राहून अफाट अवकाशाचे क्षेत्र पाहता येते, त्याचप्रमाणे जाणीवेच्या एका क्षणात अनंत भूतकाळ व अनंत भविष्यकाळही दिसावयाला काहीच हरकत नाही.

ज्याला आपण स्मरण वा आठवण म्हणतो ती वर्तमानकाळात जिवंत असलेली भूताची संवेदनाच नाही का? राम विश्वामित्राबरोबर जात असताना वामनाश्रमापाशी येऊन पोचल्यावर त्याच्या मनात खळबळ झाली असे कालिदास म्हणतो, आणि तेसुद्धा कसे तर पूर्वजन्मचेष्टाची आठवण न होतासुद्धा! प्रत्यक्ष घटना विसरल्या, पण त्या घटनांच्याबरोबर अनुभवलेल्या भावना मात्र राहिल्या. दुष्यंत एवढा विलासी, नाना स्त्रियांबरोबर प्रणय करून त्यांना विसरून जाणारा, पण त्याचेही सौंदर्यपिपासू मन एका क्षणाच्या सौंदर्यप्रचीतीने अनेकदा अनुभवलेल्या व अनेकदा विसरलेल्या, जुन्या काळच्या, जणू गतजन्माच्या झालेल्या सौंदर्योपभोगाच्या स्मृतीने विव्हळ झालेच ना? येथेही कालिदास 'अबोध' हेच विशेषण वापरतो, पण जन्मांतरीचे व्यापार कसे तर 'भावस्थिर सौहृद'रूपी प्रत्यक्ष प्रणयाची, जिच्याशी प्रणय केला त्या व्यक्तीची स्पष्ट आठवण नाही, पण त्या वेळची भावना मात्र ह्या क्षणाला अंतःकरण हलवते. वर्तमानकाळातील भूताच्या प्रचीतीचे कालिदासाचे वर्णन हे असे आहे. जैनवाङ्मयात जरी इतक्या काव्यमय पद्धतीने नाही तरी जन्मांतरीच्या स्थितीची जाणीव वर्तमानातील प्रसंगावरून झाल्याची उदाहरणे जागजागी विखुरलेली आढळतात. ही प्रचिती सौंदर्यप्रचीतीच्या द्वारे झाल्याचीच उदाहरणे दिसून येतात. पण मला वाटते इतरही संवेदना भूतकाळाचे वर्तमानकाळाशी साहचर्य घडवून आणावयास समर्थ आहेत. कलावंताच्या हृदयाला हा अनुभव सौंदर्याच्याद्वारे येतो इतकेच. उत्तर रामचरितात भूत, वर्तमान व भविष्य ह्यांची एकता, ह्यांचे एका अविभाज्य अनुभवात दर्शन, अती उत्कटतेने दाखविले आहे. राम, सीता व लक्ष्मण चित्ररूपाने रामाच्या पूर्वचरित्राचे अवलोकन करीत आहेत, त्या चित्रांच्या दर्शनाने गतानुभव इतके उसळून येतात की राम व सीता हे सर्व प्रसंग पूर्वी घडलेले आहेत हे विसरून शोकाने

विव्हळ होतात. पूर्वी अनुभवलेले दु:ख हे सुखाच्या क्षणी सुखकारक व्हावे- दु:ख झालेच तर आजच्या क्षणाची सुखानुभूती वाढवण्यापुरते व्हावे- पण ह्या अंकात तसे न होता रामाचा शोक व मन:संताप वाढतच जातो- वाचणाराचेही मन जड होते. लवकरच होणाऱ्या अतिदु:खदायी व शोककारक घटनांची त्या प्रसंगावर छाया पडलेली आहे. खरे म्हटले म्हणजे सीतारामांनी आयुष्यातील आत्यंतिक सुखाचे शिखर ह्या अंकात गाठलेले आहे... पण अंकातील वातावरण आनंदाने फुलत नाही. ह्याचे कारण ह्या अंकात सीता-रामाच्या वर्तमानाच्या संवेदना भूत व भविष्याशी निगडीत झालेल्या आहेत व त्यांच्या सावल्यांनी सुखाचे क्षण झाकळून टाकले आहेत.

ही त्रिकालसंवेदना फक्त कलावंतांना होते, इतरांना नाही, असे मुळीच नाही. सर्वांना ती असते- मला वाटते काही परिस्थितीत पशूंनासुद्धा ही संवेदना होते. कालाची संवेदना त्रिपरिमाणात्मक असल्यामुळे एका क्षणात मागचा व पुढचा क्षणही सामावलेले असतात. वोल्फगांग कोलरने काही वानरांचे निरीक्षण केले, त्यात पुढील हकीकत सांगितली आहे. चिंपाझी वानरांच्या एका पिंजऱ्यातच हात पुरणार नाही व उडी मारूनही हाती लागणार नाही इतक्या उंच एक केळ्यांचा घड टांगला होता. एकात एक बसतील असे पोकळ वाशांचे तुकडेही पिंजऱ्यात होते. वानराने पहिल्याने हात लांब करून, नंतर निरनिराळ्या लांबीचे वाशांचे तुकडे हातात घेऊन, केळ्यापर्यंत पोहोचता येते का ते पाहिले. व शेवटी निराश होऊन ते खाली बसले. काहीतरी चाळा म्हणून ते त्या वाशाच्या तुकड्याशी खेळत होते. खेळता खेळात सहज गमतीने एका वाशाचे टोक त्याने दुसऱ्यात बसवले. ही क्रिया होताक्षणीच वानर तात्काळ उडी मारून उठले, व आता लांब झालेल्या काठीने त्याने ताबडतोब केळ्यांचा घड हस्तगत केला. ज्या क्षणाला काठ्या एकात एक सांधल्या गेल्या त्याच क्षणाला वानराच्या मनात केळ्यांचा घडही हस्तगत झाला होता- भविष्यात होणाऱ्या क्रियेची जाणीव त्याला पूर्णतया झाली होती. फक्त क्रिया घडण्यास वेळ लागला इतकेच. सर्व क्रियेच्या बुडाशी त्रिकालपरिमाण असलेल्या कालाची संवेदना असतेच. मनाचा एक पाय भूतात रोविलेला असतो तर एक पाय पुढच्या क्षणात टाकलेला असतो.

आपले व्यवहारही असेच चाललेले असतात व क्वचितप्रसंगी कालाचे दिङनिरपेक्षत्व आपणास अगदी तीव्रतेने जाणवते. गौरी उदाहरणे सोडवीत बसली होती. भागाकार-गुणाकाराचे प्रश्न होते. गौरीचे उदाहरण काही केल्या बरोबर येईना. म्हणून ती आपल्या बापाकडे आली. ''बघ रे, काही केल्या उत्तर बरोबर येत नाही.'' येणार कसे उत्तर, गौरे? भागाकाराच्या तिथे गुणाकार केलास, आणि त्यातही आकडेमोडीच्या चुका!'' आणि मग भागाकार कुठे व गुणाकार कुठे ह्याची समज तिला काही केल्या होईना. मी तिच्याकडे पाहात होते व बापलेकीचे संभाषण ऐकत होते. आधी मुळी गौरीचे लक्ष नव्हते. मग जेव्हा ती ऐकायला लागली तेव्हा ती बापाच्या तोंडाकडे बघून काहीतरी उत्तर द्यायची. होता होता तिचा जास्तजास्तच गोंधळ उडू लागला. ''गौरे, तुला व चंदूला रोज एक एक लाडू दिला तर चार दिवसात तुम्ही किती लाडू खाल?'' ''गौरे, विचार कसला करतेस? रोज किती लाडू लागतात तुम्हाला?'' गौरीने उत्तर दिले, ''चार.'' ''अग गऊ, असं काय करतेस? तू एक खातेस व चंदू एक खातो, मिळून किती?'' पण गौरीचे तोंड लाल झाले होते. डोळे पाण्याने डबडबले होते- छे! ती गौरी नव्हतीच मुळी. मी थरथरत मास्तरांच्या पुढे उभी होते. माझीच भागाकार-गुणाकाराची उदाहरणे चालली होती. मास्तर अर्धवट कीव येऊन अर्धवट रागाने माझ्याकडे बघत होते, माझे मन बधिर झाले होते. मास्तर काय बोलतात हे कानांना ऐकू येत होते, पण कळत नव्हते. पुढच्या क्षणातील बापलेकीची प्रश्नोत्तरे व्हायच्या आधीच मला समजली होती. इतक्यात त्याने विचारले, ''गौरे, एक न एक किती?'' गौरी बरोबर उत्तर देणे शक्यच नव्हते, पण तिने बापाच्या गळ्याला मिठी मारून रडायला सुरुवात केली व मी भानावर आले. क्षणापूर्वी मला मराठी दुसरीतल्या आठवणी विचारल्या असत्या तर अगदी प्रयत्न करूनही मला काही आठवले नसते, पण अर्धवट तंद्रीत पसतीस वर्षांपूर्वीचा भूतकाल माझ्या आताच्या क्षणात जागा झाला व त्याच क्षणात पुढच्या चार-दोन पळांत काय होणार तेही मला कळले. आताचे भविष्यज्ञान म्हणजे केवळ भूतकाळाची पुनरावृत्ती नव्हती. मास्तरांनी मला पुढे काहीही न विचारता वर्गाच्या बाहेर उभे राहण्यास पाठवले होते, पण गौरीला काय प्रश्न येणार हे मला अगदी स्पष्ट कळले, कारण वर्तमानकाळाशी माझी संवेदना संपूर्ण होती व हे पूर्णत्व भावी क्षणाच्या

जाणीवेशिवाय येणे शक्य नव्हते. जो भूतकाळ आपण जगत असतो तो सध्याच्या क्षणाला लागून अर्धा होऊन गेलेला असतो असे मुळीच नाही. हा क्षणबिंदू त्याच्या अलीकडच्या क्षणबिंदूशीच संलग्न असला पाहिजे ही कल्पना अवकाशबिंदूंच्या तुलनेवरून उचलली असते. वर्तमानातील कालबिंदू भूतकालात कुठल्याही कालच्छेदाशी एकत्व पावेल. फक्त आताच्या व त्या वेळच्या संवेदनात एकात्मता असली पाहिजे. अगदी हेच तत्त्व क्रोचेने आपल्या इतिहासाच्या विवेचनात दिले आहे, तो म्हणतो, ''मानवेतिहासाचे कित्येक कालखंड पार विसरून गेलेले असतात- इतिहासाच्या पुस्तकात सनावळ्यात व बखरीतून ते बिचारे मूक, निर्वासित जीवन कंठीत असतात. पण कुठच्या ना कुठच्या तरी नव्या पिढीच्या जीवनात त्यांना सहसंवेदना मिळून पुनर्जन्म मिळतो व ते परत नवचैतन्याने स्फुरतात. प्रत्येक पिढी आपल्या जीवनाशी एकात्म असलेल्या गतकालाला- गतेतिहासाला- जिवंत ठेवीत असते, वर्तमानात आणीत असते. मनुष्ययुगाचा धार्मिक अंधश्रद्धेचा काल संपून युरोप शास्त्रीय प्रगतीच्या मार्गावर आले तेव्हा थडग्यात दीर्घ निद्रा घेणारा ग्रीक व रोमन इतिहास खडबडून जागा झाला; आणि रानटी, मागासलेल्या समजल्या गेलेल्या मध्ययुगीन इतिहासाला बायरन, शेले, आदीकरून कवींनी उजळ दिला.''

आपली कालसंवेदना निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या प्रकारची असते- पण एक वैशिष्ट्य म्हणजे ती दुहेरी असते. एकाच वेळी निरनिराळ्या कालसंवेदना आपण अनुभवीत असतो. वर्तमान क्षणाचा अनुभव घेणारा एक भाग व त्या अनुभवाची नोंद वा निरीक्षण करणारा दुसरा भाग अशी संवेदनांची तऱ्हा असते. दुसरीचा गणिताचा तास आज पस्तीस वर्षांनी अनुभवणारी मी; एकीकडून गौरीचा गोंधळ दिसणारी मी आणि आज त्रेचाळीस वर्षांची मी ह्या सर्व तिन्ही 'मी'च्या अनुभवाची नोंद करणारे एक आणखी उदासीन पृथगात्म मीपण असते, आणि ह्या पृथगात्म मीची कालगणना काही निराळीच असते. ह्या मीला स्वतः कालातीत असल्याची जाणीव असते, व बाकीच्या सर्व मीचे जीवन निरनिराळ्या कालप्रवाहात झपाट्याने वाहत असल्याची जाणीव असते. म्हणजे निरनिराळ्या व्यक्तींचा काळ निरनिराळा असतो, एवढेच नव्हे तर एकाच व्यक्तीला एकाच वेळी

(घड्याळाप्रमाणे!) निरनिराळ्या कालसंवेदना एकसमयावच्छेदेकरून होत असतात.

संवेद्य काळ हा इतक्या विविध तऱ्हेने जाणवतो की, काळ ही काय चीज आहे ते सांगणेच कठीण होते. मग मनुष्याने ह्या काळाशी दिशेचे लग्न लावून साधले काय? ह्याचे उत्तर काठक संहितेत एका अतिलघू व अतिरम्य कथेत दिले आहे (ही कथा श्री.श्रोत्रियांच्या 'वेदातील गोष्टी' ह्या लहान मुलांसाठी लिहिलेल्या पुस्तकात मी पहिल्याने वाचली.) ती कथा अशी; पहिल्याने फक्त दिवसच होता. रात्र नव्हती. यमीला भावाच्या मरणाचे दुःख सहन होईना. देवांनी तिला विचारले, ''यमे तुझा भाऊ कधी गेला?'' म्हणजे तिने म्हणावे, ''आजच. मग देवांनी विचार करून रात्र उत्पन्न केली. रात्रींमागून दिवस व दिवसांमागून रात्री गेल्या व यमी (काळ गेला हे जाणून) भावाचे दुःख विसरली- यमीला भावाचे दुःख विसरायला लावायची देवांची युक्ती सफळ झाली. पण देव झाले तरी मानवाचे पूर्वजच ना! मनुष्य काहीतरी मनात योजून कृती करीत असतो. त्या कृतीपासून त्याला हवे ते कधीकधी मिळतेही; पण मनुष्याची प्रत्येक कृती इष्टफलाबरोबरच नेहमीच आयोजित, अकल्पित फळही देत असते. असेच अगदी ह्या देवांच्या युक्तीचे झाले. सर्व जगातील दुःख सह्य झाले खरे, पण त्याबरोबर सुखही क्षणभंगुर झाले. वनवासात दुःखात काळ कंठणाऱ्याला ''हेही दिवस जातील'' हा मंत्र सुखाचा वाटला खास, पण हुमायूनाचे मन गादीवर बसल्यावर ह्या उक्तीच्या आठवणीने विषण्ण झालेच असले पाहिजे. काळ जातो आहे, क्षण नष्ट होत आहेत- दिवस मावळतो. रात्र सरते, पण त्याबरोबर आयुष्य झरते, सुखाला ओहोटी लागते. काळ झपाट्याने जात आहे ह्या भावनेने फक्त यमी काय ती सुखी झाली. पण त्याच क्षणभंगुरत्वाच्या जाणीवेने मानवी सुखात कायम विष कालवले ना? सुखाच्या प्रत्येक क्षणाला, ''देवा, हा क्षण माझ्या आयुष्यातला शेवटलाच ठरो'' हे मागणे आपण उत्कटतेने मागतोच ना? सर्व वेदान्त, सर्व आरोग्यपर तत्त्वज्ञान म्हणजे जाणीवेचेच फळ ना? दुःख विसरायला काळाला दिशेचे बंधन घातले आणि मग जेव्हा ह्या कालचक्रात सापडून मानव अगतिक झाला त्यावेळी, कधीही नष्ट होणाऱ्या चिरंतन तत्त्वाच्या शोधाला लागला. ह्या चिरंतन तत्त्वाचे उपनिषदात जागोजागी जे वर्णन आढळते ते दिङ्निरपेक्ष स्वसंवेद्य काळाचेच असावे असे मला वाटते.

''तदेजति तन्नैजति, तददूरे तद्वदन्तिके। तदन्तरस्य सर्वस्य तदु सर्वस्यास्य बाह्यत:॥' अशी काळाची संवेदना नाही का? तो कधी पळतो, कधी स्थिर असतो; तो आपल्या सगळ्यांच्या जाणीवेत असतो, तसाच आपल्या सर्वांच्या बाहेर आपल्याला व्यापून राहिलेला आहे! ह्या काळाचे आपण बाहुले आहो का काळाचे निर्माते आहो! खरे काय कोणास ठाऊक!

✿

१४

# नव-कलेवर

"सुभा, तुला नाही वाटत की, देवळात काही निराळेच वातावरण आहे म्हणून?"

जगन्नाथाचे वाट्यांएवढे गोल गरगरीत डोळे विचाराने जरा संकोचले होते, आवाजात कातरता जाणवत होती; पण सुभद्रेचे मुळी लक्षच नव्हते, भाऊ काय बोलतो तिकडे; ती आपल्या साडीची किनार नीट चापूनचोपून बसविली आहे का नाही ते पाहत होती आणि चारपदरी हारातील मधले चार लोंबते खडे बरोबर एकाखाली एक आले असल्याची खात्री करून घेत होती. सकाळची पूजा झाली की, दुपारचा भोग येईपर्यंतचा मधला वेळ ती रोज असा घालवी; पण आजच्या निरीक्षणाने तिला काही रोजचे समाधान लाभले नाही. आपल्या चंद्राकृती तोंडाचा चंबू करण्याचा प्रयत्न करीत ती पुटपुटली, "हा पुजारी म्हातारा झाला आहे फार; काय वेंधळ्यासारखी साडी नेसवली आहे! आणि धसमुसळेपणानं माझ्या हनुवटीच्या बाजूचा कागदसुद्धा थोडा फाटला आहे. बरं झालं लवकरच सर्वांगस्नानाचा दिवस आहे म्हणून. माझा मुखवटा ठिकठिकाणी सैल झाल्यासारखा झाला आहे; त्या दिवशी नवा मुखवटा मिळाला

म्हणजे तोंड कसं सुरेख दिसेल!'' तिचा क्षणिक रुसवा नाहीसा झाला. स्नान करून, नव्या मुखवट्याने आपण रथात बसलो आहोत व लाखो मानव भोवती जयघोष करीत आहेत ह्या स्वप्नात ती पुजाऱ्याचा अपराध विसरली.

जगन्नाथाची खिन्नता आणखी वाढली. ''पोरी, यंदा रथयात्रा आपल्या नशिबी आहे का नाही कोण जाणे!'' तो भरल्या गळ्याने म्हणाला. सुभद्रेचे लक्ष नाही हे पाहून तो आणखी काही बोलणार एवढ्यात सुभद्रेच्या पलीकडून दटावणीचा गंभीर आवाज आला, ''कृष्णा, तुझ्या शंका-कुशंका मनातच ठेवीनास? तिच्या सुखी जीवनाला काळजीची कीड लावून तुला काय मिळणार? जे होणार ते चुकत नाही. त्याचा विचार करून काय उपयोग?'' ''बरं आहे, दादा.'' जगन्नाथ पडल्या आवाजात म्हणाला. गाभाऱ्यात घुमणारा आवाज थांबला. परत सर्वत्र शांतता पसरली. पुरीच्या जगन्नाथाच्या मंदिरातील मूर्ती आपले निश्चळ डोळे समोर लावून उभ्या होत्या. पाच-पंचवीस दर्शनेच्छू भाविक अंधारातच चाचपडत पंड्यांचे हात धरून गर्भगृहात येत होते. पायांखालची जमीन ओलसर, बुळबुळीत लागत होती. यात्रेकरू एकमेकांचे हात धरून जपून चालले होते. ही वेळ व हा महिनाही विशेष गर्दीचा नव्हता, पण जगन्नाथाच्या देवळात दोन-चारशे लोकांची आवकजावक नाही असे क्वचितच होई. अंधारातून गाभाऱ्यात गेले म्हणजे तेथे लावलेल्या समयांच्या उजेडात देवाचे पहिले दर्शन होते ते आश्चर्यकारकच वाटते. समोर तीन प्रचंड उभ्या आकृती व त्यांची चमत्कारिक रंगवलेली तोंडे दिसतात. डाव्या हाताला सात फूट उंचीचा, पांढऱ्या शुभ्र तोंडाचा, मोठाल्या शंखाकृती डोळ्यांचा बलभद्र, उजव्या बाजूला सहा फूट उंचीचा काळ्याभोर तोंडाचा व मोठाल्या गोल डोळ्यांचा जगन्नाथ ऊर्फ कृष्ण व दोघांच्यामध्ये ठेंगणीशी, चार फुटांची, पिवळ्या तोंडाची सुभद्रा असे हे देवतात्रय आहे. ह्या श्रद्धावस्तूंना मूर्ती हा शब्द योग्य होणार नाही; प्रथमदर्शनी त्यांच्यात मानवी असे काही वाटत नाही. मूर्तींची नाके तेवढी मोठी, पुढे आलेली व्यंगचित्रासारखीच दिसतात. हात म्हणजे कमरेपासून पुढे आलेले दोन दोन दांडकी आहेत. तोंडाच्या ठिकाणी काळा, पिवळा व पांढरा असे मुखवटे चढवले आहेत व त्यांवर लहान मुले काढतात तसे डोळे, नाक व तोंड काढली आहेत. कपाळ व भुवया जवळजवळ नाहीतच. डोळे भक्तांकडे रागाने रोखल्यासारखे वाटतात. तर तोंडाच्या लालचुटूक चन्द्रकोरीचे अक्षय हास्य मानवांना वेडावून दाखवते आहे अशी

भावना होते. ह्या मूर्ती लाकडाच्या ओंडक्यांच्या बनवलेल्या आहेत. दरवर्षी ज्येष्ठी पुनवेला त्यांना सर्वांगस्नान घालतात. त्या मूर्तींच्या तोंडाचा रंग धुवून जातो. देवळाचे दरवाजे बारा दिवस बंद असतात. देवाचे दैता (दैत्य) नावाचे सेवक मूर्तींना मुखवटा चढवून तो रंगविण्यात गुंतलेले असतात. मुखवटे रंगवून झाले की, देवांना नवा साज चढवतात व मूर्ती मंदिराबाहेर आणून तीन निरनिराळ्या रथांत ठेवतात आणि जगन्नाथाच्या रथयात्रेला प्रारंभ होतो. रथयात्रेच्या आदल्या दिवशी नवा रंग दिलेल्या मूर्तींचे भक्तांना दर्शन होते. ह्या दर्शनाला 'नवयौवन' दर्शन म्हणतात. सुभद्रा गुंतली होती ती ह्याच स्वप्नात. वर्षभर पुजून पुजून जुने झालेले तोंड धुऊनपुसून स्वच्छ होईल; बारा दिवस चेहऱ्याची रंगरंगोटी चालेल; नंतर 'नेत्रोत्सवा'च्या दिवशी डोळे रंगवतील; मग महावस्त्रे अंगावर चढवतील आणि मंदिराचे दरवाजे उघडले म्हणजे हजारो लोक एकमेकांना ढकलीत, चिरडीत माझे 'नवयौवन' निरखतील असे ती मनात म्हणत होती-

पण जगन्नाथाचे मन सुचित नव्हते. चैत्री पूर्णिमेला 'दयिता' सेवक 'बसेली' देवीच्या मंदिरात गेले होते. त्यांना नवघटस्थापनेचा कौल मिळाला होता व त्यांनी 'बसेली'च्या गळ्यातील माळ देवीच्या अनुमतीचे निदर्शक म्हणून 'भितरेछ' महापात्राच्या स्वाधीन केली होती, इतकी हकीकत पुजाऱ्यांच्या बोलण्यातून त्याने ऐकली होती. त्याच्याही आधी ''यंदा अधिक आषाढ आहे'' हे वाक्य प्रत्येकाच्या तोंडी होते. 'अधिक आषाढ' ह्या शब्दांनी देवाच्या मनात हुरहूर उत्पन्न झाली होती; जणू जन्मांतरीच्या स्मृती जागृत होत होत्या.

खरोखरच 'अधिक आषाढ' हे शब्द जन्मांतरींच्या स्मृती जागृत व्हाव्यात असेच होते. वीस वर्षांत जेव्हा अधिक आषाढ येतो तेव्हा जगन्नाथाच्या देवळातील मूर्ती नव्याने बनतात. आज वैशाख पूर्णिमा; सकाळी पाच वाजता भितरेछ महापात्र नेहमीप्रमाणे आले व त्यांनी देवळाचे दरवाजे उघडले. सिंहद्वारामागून एक एक दार उघडीत शेवटी गर्भगृहाचे दार उघडले. महापात्र किंवा नुसते पात्र असे नाव उडिशात पुष्कळ ब्राह्मणांचे असते. 'भितरेछ' म्हणजे 'अभ्यंतरेश' असावे असे दिसते. ह्यांच्याकडे देवळाच्या आतील सर्व व्यवस्था असते. देवाचे नवे विग्रह करावयाचा हुकूमही तेच देतात. आज गर्भगृहाचे दार उघडल्याबरोबर ते आत आले, देवाच्या पायांवर त्यांनी डोके ठेवले, मग

मागे सरून, हात जोडून, डोळे मिटून क्षणभर उभे राहिले. त्यांच्या डोळ्यांतून आसू ओघळलेले दिसले. त्यांनी उपरण्याने डोळे पुसले. ''प्रभू! ठाकूरजी! मर्जी तुझी!'' असे म्हणून ते बाहेर गेले. बाहेर 'दयित' सेवक हात जोडून उभे होते. ''जा, दारुशोधार्थ जा, यंदा नव्या घटाची स्थापना करायची!'' अशी आज्ञा त्यांनी दिली व जड पावलांनी ते मंदिरातून परतले. इतर सेवायतांचे डोळे थोड्याशा उत्सुकतेने व करुणेने त्यांच्याकडे लागले होते. ज्या वर्षी नव्या मूर्ती बसतात त्या वर्षी भितरेछ महापात्र मरतात असा सर्वांचा समज आहे. (१९५० साली नव-कलेवर वर्ष होते व उत्सव आटपल्यावर भितरेछ महापात्र मेले अशी माहिती ओरिसा सरकारच्या माहितीखात्याने प्रसिद्ध केली आहे.) दारु म्हणजे लाकूड. देवतांच्या मूर्तीचे लाकूड काही विशिष्ट गुणधर्म व चिन्हे असलेल्या कडुलिंबाच्या झाडाचे असावे लागते. फार प्राचीन काळी जगन्नाथ हा शबर लोकांचा देव होता व तो त्यांनी गुप्त ठिकाणी ठेवला होता. माळव्याच्या इंद्रद्युम्न राजाच्या विद्यापती नावाच्या पुरोहिताने शबरराजकन्येचे प्रेम संपादून देवाचे गुह्यस्थान हुडकून काढले व मग इन्द्रद्युम्न राजाने देवाची जगन्नाथ ह्या नावाने पुरी येथे स्थापना केली अशी कथा आहे. विद्यापतीने शबरराजकन्येशी लग्न केले. त्याचे वंशज ते दयित (दैत्य?) सेवायत. हे दैत लोक जगन्नाथाला आपला वंशज मानतात. रथोत्सवाचे वेळी व स्नानपूर्णिमेनंतर देव त्यांच्या स्वाधीन असतात. देवाचे नवे विग्रह करण्याचे कामही त्यांचेच असते. भितरेछ महापात्राची आज्ञा मिळाल्यावर सर्वजण मिळून जवळच असलेल्या काकतपूर गावी मंगलादेवीच्या दर्शनाला गेले. तेथे एका सेवायताच्या अंगात देवीचा संचार होऊन झाडे कुठे आहेत ते कळले. मग तेथे जाऊन सोन्या-चांदीच्या कुऱ्हाडीचे पहिले घाव घातल्यावर झाडे तोडून रथात ठेवली व वाजतगाजत पुरीला आणली. तीनही झाडांचे जाड बुंधे देवळाच्या आवारात नेऊन 'विश्वकर्मा' नावाच्या वंशपरंपरा मूर्ती घडविणाऱ्या सेवायतांच्या हवाली करण्यात आले. आता अवधी थोडा उरला होता. स्नानपूर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी आषाढ सुरू होतो. (उत्तरेकडे महिना आपल्याकडच्यासारखा अमावास्यान्त नसून पौर्णिमान्त असतो.) त्या वेळी देवतांना रंगरंगोटी चालते. त्याच्या आत मूर्ती घडल्या पाहिजेत. मूर्तीचे शिल्प काही मोठेसे कठीण नव्हते. मूर्ती लवकरच तयार झाल्या व

तीन लहान-लहान रथांत बसवून त्यांना 'अनवसरघरां'त आणले.

स्नानपूर्णिमेच्या दिवशी स्नान झाले की संध्याकाळी जगन्नाथ आपल्या भावा-बहिणीबरोबर मुख्य गर्भगृहात न जाता अनवसर मंडपात जातो व देवालयाचे दरवाजे बंद होतात. स्नानामुळे धुवून गेलेला रंग व मुखवटा नवा चढवतात तोवर देव भक्तांना दर्शन देत नाही म्हणून 'अनवसर' असतो व त्या काळात राहण्याचे ठिकाण ते 'अनवरसघर' ऊर्फ 'मंडप.'

इकडे मूर्ती घडत असता जुन्या विग्रहांचे उपचार व भोग रोजच्याप्रमाणे चालू होते. स्नानपूर्णिमेच्या दिवशी तिन्ही मूर्तींचे भक्तांचे देखत स्नान झाले व नेहमीप्रमाणे तिघेही अनवस घरात गेली. सुभद्रा वाट पाहात होती की, आता दैत सेवायत येऊन आपल्याला दरवर्षीप्रमाणे नवलावण्य देतील म्हणून; पण आज काही निराळाच प्रकार होता. रथांचा आवाज ऐकू आला व तीन नवीन मूर्तींना आणून जुन्या मूर्तींसमोर उभे केले. आता प्रश्न जन्मांतरीच्या आठवणीचा नव्हता, प्रत्यक्ष जन्मांतरीचे दृश्यच डोळ्यांसमोर होते. बारा वर्षे का अकरा वर्षे झाली बरे त्या गोष्टीला? ह्याच अनवसरघरात आपणही रथात बसून आलो होतो. नव्हे का? आपल्यासमोर धुपलेल्या मूर्ती फिकट तोंडाने उभ्या होत्या. पुढे काय होणार ह्याची तिला कल्पना नव्हती, पण तिचे हृदय मरणाऱ्या पतंगाप्रमाणे फडफड करीत होते. तिने कृष्णाकडे पाहिले, पण तिच्याकडे तो पाहत नव्हता. तिने बलरामाला 'दादा' म्हणून हाक मारायचा प्रयत्न केला, पण तोंडातून शब्दच उमटेना.

ठाकूर जगन्नाथ निश्चळ शरीराने व निश्चळ डोळ्यांनी पाहात होता. पुढे ठेवलेल्या कलेवरांना रोज हळूहळू रूप येत होते. जगन्नाथाच्या समोरचे लाकूड जगन्नाथासारखे, सुभद्रेच्या समोरचे सुभद्रेसारखे व बलरामापुढचे बलरामासारखे दिसू लागले. त्यांना वस्त्रप्रावरणादि शृंगार होऊ लागला, पण ती अजून 'कलेवर' होती. त्यांना प्राण नव्हता. जगन्नाथाच्या नाशिवंत शरीरातील अक्षर आत्म्याचे नवे घर घडत होते. समाधिस्थ स्थितीतील जगन्नाथाला दिसत होते की कालचक्र फिरत आहे. दर फेऱ्याला आपला आत्मा 'नव-कलेवरा'त प्रवेश करीत आहे. आतापर्यंत अशी अनंत कलेवरे होऊन गेली. भविष्यात पाहिले तो दृष्टी पोहोचेपर्यंत नवनव्या कलेवरांची मालिका दिसत होती. ह्या चक्रातून, नवनव्या देहांतून सुटका नाही का?

शेवटी महाप्रयाणाची रात्र उगवली. अवसेच्या रात्री विद्यापतीचे वंशज 'पति महापात्र' अनवसरघरात आले. शेजारच्या सेवायतांनी त्यांचे डोळे

बांधले व हाताला रेशमी फडके गुंडाळले. त्यांनी बलभद्राच्या, सुभद्रेच्या व जगन्नाथाच्या हृदयातले 'ब्रह्म' उर्फ प्राण काढून नव्या मूर्तीत घातले. नव-कलेवरांचे- देव कसले? 'कलेवरे'... रथात बसवले व देवालयाच्या प्रांगणातच 'कैवल्य वैकुंठ' म्हणून देवाचे स्मशानस्थान आहे तेथे दयित सेवकांनी नेले. त्या कूपात रथाचे लाकडी घोडे, लाकडी सारथी व देवांची जीर्ण कलेवरे ठेवून त्यांवर माती टाकली. देवाच्या पुजाऱ्यांनी नव्या विग्रहांची गर्भगृहात स्थापना केली. देवळाच्या बाहेरील प्रचंड पटांगणात लाखो यात्रेकरू 'नव-कलेवर' दर्शनाची वाट पाहात बसले होते. सकाळी दारे उघडताच लक्ष कंठांतून 'जय ठाकूरजी!', 'जय जगन्नाथजी!' असा जयजयकार झाला तो कैवल्य वैकुंठाच्या गर्तेतील शेकडो पिढ्यांच्या कलेवरांना ऐकू गेला असेल. जगन्नाथ गोल डोळ्यांनी भक्तांकडे बघत होता. सुभद्रा आपल्या हारातील मणी मोजीत होती. बलभद्र सरळसोट ताठ उभा होता. सोन्या-रुप्याच्या दक्षिणेचा वर्षाव होत होता. मेलेल्या देवाचे सुतक दयित व सेवकांनी पाळले. मुक्तिमंडपात त्यांनी क्षौर उरकले, जुनी स्वयंपाकाची भांडी फोडून नवी आणली, घरचा अग्नी विझवून नवा अग्नी आणला. भितरेछ रोजच्याप्रमाणे दरवाजे उघडायला आले, पण त्यांच्या तोंडावर मृत्यूची कळा होती. नव-कलेवरांच्या ओसंडून चाललेल्या उत्सवाला त्याची दादही नव्हती व पर्वाही नव्हती.

जगात प्रत्यही हा 'नव-कलेवर' उत्सव चाललेला असतो. व्यक्ती मरतात, पण जीवजाती नव-कलेवर धारण करून अखंड असतात. शुद्ध जीवनातीत जुन्या व नव्या कलेवरांची भेटच होत नाही. कीटकांच्या बहुतेक जातींत 'नवयौवना'चा दिवस महाप्रयाणाचा ठरतो. कोशातून पतंग बाहेर पडतो व मादीच्या शोधार्थ उडू लागतो. मादीची गाठ पडली की, प्रेमाची मिठी मृत्यूचीच गाठ घालून देते. नर थोड्याच वेळाने मरतो व पक्ष्यांच्या भक्ष्यस्थानी पडतो. नव्या पिढीच्या ओझ्याने भारावलेली मादी अंडी घालीपर्यंत जिवंत राहते व नंतर मरते. ही अंडी कधी पानावर, कधी झाडांच्या बुंध्यांत पोखरलेल्या भोकात, कधी चिखलाच्या घरात, तर कधी मेणाच्या बनलेल्या षटकोनी 'अनवसर' घरात असतात. जुनी पिढी मरून नवी जन्माला येईपर्यंत 'अनवसरा'चा काळ फार मोठा, असतो. वरच्या पायरीवरल्या जीवजातीत मात्र जुन्या कलेवरांना नवीनांना जन्म देऊन लहानाचे मोठे करावे लागते. मनुष्याच्या बाबतीत तर नव्या-जुन्यांचे

साहचार्य लांबते. नव-कलेवरांचे शरीरच फक्त घडावयाचे नसून त्यात संस्कृतीचा आत्मा ओतायचा असतो. हे कार्य झाले म्हणजे जुन्यांना मरायची मोकळीक असते.

पण मरायची मोकळीक असली म्हणून मरायची तयारी थोडीच होते? आणि मरायची तयारी झाली तरी मरण हाकेसरसे का धावून येणार आहे? पूर्वकालीन वन्य समाजात जीवनाचा झगडा इतका तीव्र असे की, वयाच्या पन्नासाव्या वर्षांपर्यंत जगणारी माणसे नव्हतीच म्हटली तरी चालेल. आजही रानटी व भटक्या टोळ्या एक वस्ती मोडून दुसरीकडे निघाल्या की, वाटचालीतच म्हातारी-कोतारी मरून जातात व फक्त जवान नव-कलेवरे तेवढीच शिल्लक राहतात. पण नागसंस्कृतीने शेतीच्या जागेवर अन्नोत्पादन वाढविले, शरीराची दगदग कमी केली व मानवाच्या आयुष्याची मर्यादा शंभरापर्यंत जरी नाही तरी साठ-पाऊणशेपर्यंत वाढविली. अशा परिस्थितीत जुन्या म्हाताऱ्या पिढीने काय करावे असा प्रश्न येतो. एका शक्तीचा उदय झाला की दुसरी अस्तास जाते व अशा तऱ्हेने जगरहाटी नियमबद्ध चालू राहते हे सांगण्याचा कालिदासाला फार षौक आहे. सूर्य उगवतो व चंद्र अस्तास जातो हे त्याचे नेहमीचे, सर्वस्वी बरोबर नसलेले, उदाहरण आहे. मराठी कविता 'नेमिचि येतो मग पावसाळा' म्हणून सांगते; पण मनुष्याच्या दोन पिढ्यांच्या उदयास्ताचे चक्र असे नियमबद्ध नसते. ते नियमबद्ध करावे लागते व तो नियम काय हे कालिदासानेच वर्णन करून सांगितले आहे. रघुवंशाचे राजे बाळपणी शिकत असत, तारुण्यात विषयोपभोग घेत असत, म्हातारपणी संन्यासवृत्तीने राहात व शेवटी योगद्वारे शरीराचा त्याग करीत, असे तो रघुवंशाच्या पहिल्या सर्गात थोडक्यात सांगतो, व त्याच्या स्पष्टीकरणाकरिताच की काय, आठव्या सर्गाच्या आरंभी रघूचे वर्णन करतो ते फार महत्त्वाचे आहे. अजाने लग्नकंकण सोडायच्या आतच रघूने त्याला राज्याभिषेक केला, नंतर राज्यकारभार नीट होत आहे, शत्रूपासून भय नाही व प्रजा एकनिष्ठ आहे हे पाहून रघूने सर्व विषयांचा स्वर्गसुख--लालसेचासुद्धा-. त्याग केला. तो अरण्यात निघालेला पाहून अजाने रडतरडत त्याच्या पायांवर लोळण घेतली व 'मला सोडू नका' म्हणून विनविले. रघूने पुत्राच्या बोलण्याला मान दिला पण परत लक्ष्मीचा अंगिकार केला नाही. त्याने नगराबाहेर एका आश्रमात वास केला व तेथे इतर योगी आणि संन्यासी यांच्याबरोबर चर्चा करून, यमनियमप्राणायामादींचा अभ्यास

करून, शेवटी समाधी घेतली. मुलाने आपल्या मरणाची वाट पाहात बसायचे किंवा बिंबिसाराने आपल्या दीर्घायुषी वृद्ध पित्याला मारले त्याप्रमाणे मुलाकडून मारून घ्यायचे ह्यापेक्षा आपल्या हाताने आपण सर्वस्वत्याग करायचा हा सर्वोत्तम मार्ग रघूने आचरणात आणला. सर्व तऱ्हेच्या भोगांचा संन्यास करावयाचा- राज्य, द्रव्य, स्त्री, सत्ता ज्याच्या ज्याच्यासाठी म्हणून मानव पूर्ववयात प्रयत्न करतो ते सर्व सोडून द्यावयाचे म्हणजे लौकिकदृष्ट्या मरणेच होय. जगणे ते फक्त 'कौतुकापुरते'च. असे झाले म्हणजे नव्या-जुन्या पिढीचा एकत्र सहवास सुखाचा व लाभाचा होतो; संस्कृतीच्या आत्म्याला नव-कलेवराची प्राप्ती होते. नाहीतर अक्षय आत्मा जीर्ण कलेवरात तडफडत राहतो. कलेवराच्या जीर्णत्वाने संस्कृतीच्या आत्म्याची प्रभा व प्रतिभा नष्ट होते; क्रियाशीलता, साहस व नवनिर्मिती जाऊन, अर्थशून्य बडबड व विकृत भोगलालसा मात्र शिल्लक राहून, संबंध समाजच रसातळाला जातो. मानव समाजात रघूची उदाहरणे फार थोडी, त्याउलट जास्त. आपल्याकडीलच सर्वांना माहीत असलेली ययातीची कथा अशाच एका सुखलोलुप जीर्ण कलेवराची आहे. ययातीचे मुलगे मोठे झाले, पण ययातीची राज्य व भोगलालसा कमी होईना. ''तुमचे तारुण्य मला देता का?'' असे त्याने विचारले. वरच्या मुलांनी स्पष्ट नकार दिला, धाकट्याने मात्र ते दिले अशी कथा आहे. ययातीला अजून काही वर्षे राज्य करायचे होते. मोठ्या मुलांना हा बेत पसंत नव्हता, म्हणून त्याने सर्वांना हाकून दिले. धाकटा पुरू अजून बाळ होता. तो वयात येईपर्यंत राजाला राज्य करण्यास अवसर मिळाला. तो वयात आल्यावर, भोग भोगून तृप्त झालेल्या व शिणलेल्या ययातीने त्याला राज्यावर बसवले अशी ही विलक्षण कथा आहे. रघुवंश हे एक काव्य आहे. काव्याच्याद्वारे कालिदासाने आपल्या सामाजिक मूल्यांचा आविष्कार केला आहे. एकएका राजाचे द्वारे एकएका मूल्याचे स्पष्ट चित्रण केले आहे. त्याचे राजे वास्तवातले नसून कवीच्या कल्पनासृष्टीतील होते. ह्याउलट, महाभारत एक इतिहास आहे. त्यात आलेल्या गोष्टी व प्रसंग वास्तव आहेत. मानवी मनाचा आविष्कार ध्येयवादी कवीने केलेला नसून जगात आहे तसा दाखविलेला आहे. ययातीचे चित्र मानव समाजात नेहमी आढळणारे आहे. त्याच ययातीचा वंशच शंतनु देवव्रताला राज्य देऊन संन्यास घेण्याऐवजी सत्यवतीच्या तारुण्याला भुलला व त्यामुळेच भारतीय युद्ध उदभवून कुलक्षय झाला हीही कथा सर्वांना माहीत आहे. आपली

सध्याची पिढी ययातीच्या प्रकृतीची आहे. गरीबगुरिबांना मरेपर्यंत पोटाची खळगी भरण्यासाठी संसारात राहावे लागते. त्यांना विषयनिवृत्त व्हावयाचे म्हणजे आत्महत्याच करावी लागेल; पण इतरही सर्व कितीही वय असले तरी मोठ्या आसक्तीने जगात वावरत असतात. ''मा गृध्रः कस्यचित धनम॥'' हा उपदेश फक्त धनाच्या चोरीपुरताच नाही, सर्व तऱ्हेच्या चोरीबद्दल आहे. द्रव्याची चोरी क्षुल्लक आहे, पण दुसऱ्याच्या आयुष्याची चोरी भयंकर आहे व ती सर्व तऱ्हेने, सर्व काळ आजच्या जगात चालली आहे. स्वतःच्या संसाराचा पसारा एवढा थोरला मांडून ठेवायचा की, वानप्रस्थाश्रमाची गोष्टच दूर, पण मरताना म्हातारपणाचे मूल दोन-चार वर्षांचे असावयाचे व थोरल्या मुला-मुलींचा जन्म बापाचा संसार आवरण्यात जायचा हे दृश्य कितीतरी कुटुंबात दिसते. वयाची ४०-४५ वर्षे बापाच्या संसारापायी घालविली म्हणजे वेळीच न मिळालेल्या सौख्याच्या आशेने अशी एखादी बाई वा पुरुष अवतीभोवती बघून दुसऱ्याच्या संसारावर दरोडा घालू पाहतात. जुन्या चोरीतून नव्या चोरीचा उगम होतो. जुन्या-नव्या पिढीत सत्तेचे, अधिकाराचे, सौख्याचे संक्रमण सुरळीत न होता दरोडेखोरीच्या वृत्तीने होऊ लागते.

मुले व सुना मोठ्या झाल्या आहेत, त्यांना कुटुंब कसेही चालवू दे, आपण आता ह्या सर्वांतून मन काढून 'कौतुका'पुरते राहावे असे फार थोड्यांनाच वाटते. नव्या पिढीला जुनी पिढी कधी एकदा जाईल असे होते. जुनी पिढी आपले मानाचे व सत्तेचे स्थान सोडण्यास तयार नसते. मग निरनिराळे कायदे व नियम करून कोणाला वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी तर कोणाला साठाव्या वर्षी सक्तीने 'सेवा(!)निवृत्त' करून सत्तासंन्यास घ्यायला लावतात व तेढीच्या वातावरणात नव-कलेवर स्थापना होते. एकीकडून सेवानिवृत्त झाले की, आपल्या बुद्धीचा व अनुभवाचा लिलाव राजरोसपणे सुरू होतो. खाऊनपिऊन सुखी असूनही म्हातारपणी आपल्या परिपक्व ज्ञानाचा फायदा समाजाला निरपेक्षपणे देणारे महात्मे विरळाच. ही झाली सामान्य माणसांची गोष्ट; पण ह्याहीवरच्या वर्गाची दशा तर सर्वस्वी ययातीचीच आहे. कार्यक्षम झालेल्या खालच्या पिढीच्या कर्तबगारीला मुळी वावच मिळत नाही. अशा तरुणांना एकामागून एक हाकलून देण्यात येते व जीर्ण कलेवर व अतिजीर्ण कलेवरे आपल्या जगन्नायकपदाला चिकटून बसतात. अनुयायांनी केलेला जयजयकार ऐकल्याशिवाय त्यांचे कान तृप्त होत नाहीत. हजारो भक्त समोर गोळा झालेले पाहिल्याशिवाय त्यांना चैन

पडत नाही, अधिकार व सत्ता, मानपत्रे व पुष्पहार त्यांना सोडवत नाहीत. एका अधिकारपदाचा त्याग केला की दुसरे ठेवलेलेच असते. सत्तासंक्रमण शांततेने न होता भीषण यादवीनेच होणार काय? ह्या जगन्नाथमंदिरात अधिक, आषाढ मुळी उगवणारच नाही का?

✿

१५

# एक प्रयोग

जंतुशास्त्राची ती एक प्रयोगशाळा होती. निरनिराळ्या जंतूंचे उत्पादन व वाढ कशी व किती होते ह्याचे प्रयोग तेथे चालले होते. काचेच्या लहानसहान तबकड्यांतून साखरेचे पाणी, मांसाचा अर्क, पिठाची कांजी असे निरनिराळे पदार्थ ठेवून त्यांत सूक्ष्म जंतू घालून काही विशिष्ट उष्णता असलेल्या जागी ठेवीत. ज्या ज्या जंतुप्रकाराला जे जे उष्णतामान सर्वांत मानवे तेथे त्यांना ठेवले होते. जे जे अन्न सर्वांत जास्त मानवे ते ते दिले जाई व मग अशा परिस्थितीत जंतूंत वाढ किती झपाट्याने होते त्याचा अभ्यास होई. अन्नरसात ठेवलेला एखादाच जीव खाऊन खाऊन लठ्ठ होई. त्याच्या एकपेशीमय शरीराचे दोन तुकडे होऊन दोन नव्या पेशी- दोन नवे जीव- उत्पन्न होत. काही क्षण जातात न जातात तो दोहोंचे चार, चारांचे आठ ह्याप्रमाणे मागच्या पिढीच्या दुप्पट जीव निर्माण होत. सूक्ष्मदर्शकातून पाहत बसले म्हणजे युगक्षयानंतर प्रलयवृद्ध समुद्रावर एकट्या तरंगणाऱ्या विष्णूप्रमाणे तबकडीतील अफाट पसरलेल्या क्षीरोदधीवर सुरुवातीला एकच सूक्ष्म जीव पोहत असतो. तास-दोन तासांत जीवनिर्मिती इतकी झपाट्याने झालेली असते की, पोहणाऱ्या

जीवांच्या अनंत तोंडांनी शोषण होऊन क्षीरोदधी कोरडा पडण्याची वेळ आलेली असते. एकावर एक जिवांचे थरचे थर रचल्यासारखे झाले आहेत, खालचे जीव हालचाल न करता आल्याने गुदमरून जातात, तर वरच्यांचे अंग कोरडे पडून ते सुकून जातात. अशी परिस्थिती काही वेळ राहू दिली तर तबकडी पार कोरडी पडून सर्व जीव मरून जातील. पण प्रयोगशाळेतील विद्यार्थी अर्धा चमचा गोड पाणी किंवा अन्नरस तबकडीत टाकतो. शेवटच्या काही मिनिटांतील भयानक जीवनकलहातून जिवंत राहिलेले चार-दोन जीव हालचाल करू लागतात; स्वबांधवांच्या मढ्यांनी अधिकच पोषक बनलेल्या नव्या जीवनरसाचे शोषण करतात; युगचक्राला व निर्मितीला परत जोमाने सुरुवात होते. जोपर्यंत सर्वांना पुरेसे अन्न मिळते, तोपर्यंत संख्येची वाढ झपाट्याने यंत्रासारखी चालते; पण अन्नरस कमी व जीव जास्त अशी स्थिती झाली की, निरनिराळ्या तबकड्यांतील जीवांची हालचाल पाहण्यासारखी असते. पहिल्याने एकमेकांना ढकलण्याची धडपड सुरू होते- त्यात बरेच मरून तबकडीत पुरेशी जागा झाली की थोडा वेळ परत शांततेने प्रजनन चालू होते; पण त्यातही पूर्वीचा सुरळीतपणा दिसून येत नाही. विशेषत: तबकड्यातील सूक्ष्म जीव बहुपेशीमय असले तर बदललेल्या परिस्थितीचा परिणाम त्यांच्यावर चटकन दिसून येतो. काही साश्य कारण नसता एकदम सर्व जंतू सैरावैरा पळू लागतात, एकमेकांवर आदळतात, चिरडतात व मरतात. जणू तबकड्यातील सर्व जीवांना भुताटकीने झपाटलेले आहे अशा त्यांच्या हालचाली असतात. कधीकधी सर्व जीव काही हालचाली न करता मृतमय स्थितीत पसरलेले दिसतात. त्यांचे जीवन घड्याळासारखे सुरळीत न चालता त्यात काहीतरी उलथापालथ होतेसे पाहणाराला वाटते. प्रयोगशाळेत काही तबकड्यांतून दर तासाने जीव काढून दुसऱ्या तबकड्यात ठेवतात व नवा अन्नरस देतात. अशा जीवांची संख्या वाढतच असते. हवा, योग्य उष्णता व भरपूर अन्न यांचा त्यांना पुरवठा असतो. बाहेरचे शत्रू नाहीसे झालेले असतात. अंत:कलहाची परिस्थिती येण्याच्या आतच नवे अन्न व नव्या तबकड्या वसाहतीसाठी मिळत जातात व सारखी न थांबता जीवांची संख्या वाढत जाते. मरण जणू आपले कार्य विसरून गेलेले असते. ह्या कृत्रिम सृष्टीत जननाचीच काय ती परवानगी असते.

‘‘अशा प्रकारचे हे जीव वाढायला लागले तर थोड्या महिन्यात पृथ्वी व्यापून टाकतील!’’ एक विद्यार्थी सूक्ष्मदर्शकातून पाहता पाहता उदगारला.

शिकवणारे अध्यापक जणू ह्याच संधीची वाट पहात होते. ते म्हणाले, ''अगदी बरोबर; पण सृष्टीमध्ये जीवांच्या वाढीला काही सर्व गोष्टी अनुकूल नसतात. ज्या डबक्यातून ह्या प्रयोगशाळेत पहिले जीव आणले ती उन्हाळ्यात वाळली की कोट्यवधी जीव मरून जातात. सांदीकोपऱ्यात थोड्याशा चिखलात काही जिवंत राहतात. खूप थंडी पडून पाणी गोठले तरी बरेच जीव मरतात. पाण्यात काही विषार गेला तरी मरतात. जीवोत्पत्ती जास्त होऊन डबक्यातील पाण्यात पुरेसा अन्नरस राहिला नाही तरी लाखोंनी मरतात आणि शेवटी म्हणजे दुसरे निरनिराळे सूक्ष्म जंतू ह्या डबक्यातील जीवांना खायला टपलेले असतात.'' त्यांनी लगेच गड्याकडून एक बादली आणली व तीतले थोडे थोडे पाणी नव्या तबकड्यात घालून वर्गाला परत सूक्ष्मदर्शकातून पाहण्यास सांगितले. आता तबकडीत फक्त अन्नरस व त्यावर पोसणारे एक-दोन जीव असे दृश्य नव्हते. तबकडीत नाना तऱ्हेच्या सूक्ष्म वनस्पती व प्राणी पाण्यात इकडून तिकडे फिरत होते. काही खाऊन खाऊन लठ्ठ होत व नंतर नवी जीवोत्पत्ती होई. पण खाणे थोडे म्हणून जीवोत्पत्ती भराभर न होता फारच सावकाशीने होत होती. तेवढ्यात दुसराच एक सूक्ष्म जीव येऊन त्याने नव्या प्रजेला खाण्यास सुरुवात केली व नव्यानेच जन्माला आलेल्या त्या अणुमय जीवांची पळायची धडपड सुरू झाली. त्या जीवभक्षक जीवाला खाणारेही जीव त्या तबकडीत होते. शिवाय, एकमेकांना खाऊन भक्ष्य संपले म्हणजे भक्षकही उपासमारीने मरायच्या पंथाला लागे आणि शेवटी पाहता-पाहता तबकडीतले पाणी संपले की, सगळ्याच जीवांची धडपड बंद पडायची- तबकडीतल्या विश्वावर मृत्यूची शांतता पसरायची.

त्या प्रयोगशाळेतले प्रयोग मोठ्या प्रमाणावर डोळ्यांपुढे चाललेले आज दिसत होते- पुरुष-बाया येऊन आपली तपासणी करून घेऊन व विचारल्या प्रश्नांची उत्तरे देऊन पुढे चालले होते. ''उंची चार फूट अकरा इंच; पाच फूट तीन इंच...'' एक माणूस उंचीची मापे सांगत होता; ''वजन अठ्ठ्याऐंशी पौंड; शहाण्णव पौंड; एकशे एक पौंड...'' शंभरावर वजन ऐकले की लिहून घेणारा डोळे वर करून, ''आहे तरी कोण पैलवान!'' अशा बुद्धीने वर पाही. छातीचा घेर, श्वासोच्छ्वासाचा जोर, स्नायूंचा जोर अशी एक-एक तपासणी होत होती. ती झाली म्हणजे 'लग्न कधी झाले; मुले किती झाली? मेली किती? जिवंत किती?' अशी प्रश्नावली सुरू होई. वयाप्रमाणे

कोणाला पाच, दहा, कोणाला बारा मुले झालेली आणि त्यांतील निम्मीशिम्मी जिवंत हे उत्तर यावयाचे! ह्या कृश, अर्धपोटी जीवांना एवढी मुले होतात तरी कशी? त्यातून ते जिवंत तरी कसे राहतात? पुरुषांचा ७०-७५ रुपये पगार एवढ्या संसाराला पुरतो कसा? हे सर्व लोक खातात तरी काय?... अशी परिस्थिती असूनही त्या प्रांतातील लोकसंख्या सारखी वाढत होती. किनाऱ्यावरचे काम संपवून आम्ही पुढे निघालो. दुपारी बारा वाजतासुद्धा सूर्याचा प्रकाश संध्याकाळसारखा वाटत होता. अशा अरण्यातून जाता जाता मध्येच एक मोठा मोकळा प्रदेश दिसला. प्रचंड वृक्षांचे जळके बुंधे तेवढे उरले होते. बायका-पुरुष तेही खणून टाकायच्या उद्योगात होते. जरा पुढे गेलो तर जंगल जाळून साफ केलेल्या जागेत नवी शेती झाली होती. कोठे बटाटे व टापिओकाचे पीक लावले होते. किनाऱ्याजवळ शेतीत माणसांची पोटे भरत ना म्हणून सरकार पर्वतराजीवरील जंगले कापून शेतकऱ्यांना लागवडीसाठी नवीन जमीन देत होते. वाढत्या तोंडांची भूक भागवायची असा पण केला तर त्रावणकोरमधली अरण्ये साफ होऊन तेथे पूर्व महाराष्ट्रातल्यासारखे उघडेबोडके डोंगर दिसू लागायला एक शतकाचासुद्धा अवधी नको.

फक्त त्रावणकोर-कोचीनच्या तबकड्यांतून जीव वाढताहेत असे नाही. ह्या प्रयोगशाळेत ठिकठिकाणी अशा तबकड्या आहेत व त्यांतून सर्व तऱ्हेचे जीव भराभर वाढत आहेत. पुरी जिल्हा व चिल्का सरोवर ही डोळ्यांनी पाहावयास पृथ्वीवरील स्वर्गासारखी आहेत. पुरी जिल्ह्यात रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असंख्य जलसंचयांवरून कमळाच्या पानांचे दाट आवरण असते व त्यांत निळ्या, जांभळ्या, पिवळ्या, तांबड्या रंगांची कमळे उगवलेली असतात. जसे रंग विविध तसे आकार पण विविध. बचकेत मावणार नाही एवढ्या मोठ्या कमळापासून तो सदाफुलीच्या फुलाएवढी चिमुकली कमळे त्या पाण्यात चमकत असतात. कमळांच्यामागे हजारो एकर जमिनीवर भाताचे पीक डोलत असते. आश्विनाच्या महिन्यात ते इतके दाट असते की, हिरव्या-पिवळ्या गालिच्यात मुळी फटसुद्धा दिसत नाही. मध्ये खंड असलाच तर आंबा, केळी, पुन्नाग व नारळीच्या बागांचा. चिल्का सरोवराचे काठी भातशेती व बागाईत तर आहेच; पण शिवाय सरोवरात मासे उत्तम मिळतात व ते ताजे मिळावे म्हणून लोक मुद्दाम सुटीत येथे येऊन राहतात. चिल्काच्या अथांग जलाशयावर सूर्योदय अतिरम्य

वाटतो. दुपारच्या उन्हात तळपताना दृष्टी ठरत नाही, पण ते सुरेख दिसते व संध्याकाळच्या सावल्या दाटू लागल्या म्हणजे सरोवरावरून हजारोंच्या थव्यांनी पक्षी उडत काठाशी असलेल्या घरट्यात जातात तेव्हा तर क्षणाक्षणाला बदलणाऱ्या काळोखणाऱ्या सरोवराच्या काठांवरून हलूच नयेसे वाटते. पण अधाशीपणे ही दृश्ये पिणाऱ्या डोळ्यांना प्रायश्चित्तही लगेच मिळते. कोणी नवीन पाहुणे आले ह्या कुतूहलाने खेड्यातील माणसे गोळा झाली होती. त्यांच्या वाढत्या गलबल्यामुळे लक्ष वेधून मी सरोवराकडची नजर काढून मागे वळले. वीस-पंचवीस माणसे होती, पण त्यातील फार तर निम्मी अव्यंग होती. कोणाची बोटे गेलेली, कोणाच्या पायांचे नुसते खुंटच, कोणाची नाके किंवा कान सडलेले, अशी होती. उडिशाच्या सरकारने माझ्याबरोबर एक तद्देशीय मदतनीस दिला होता, त्याला मी विचारले, ‘‘ह्या गावात महारोग्यांची वसाहत आहे वाटते?’’

‘‘नाही. चिल्का सरोवराच्या भोवतालच्या खेड्यापाड्यांतून महारोगाचा फार प्रसार आहे.’’

त्याच्या म्हणण्याचे प्रत्यंतर दोन-चार दिवसांच्या पाहणीत आलेच. रोग अंगात शिरल्यापासून त्याची लक्षणे शरीरावर दिसायला बारा वर्षे लागतात म्हणे; पण मला तर कित्येक महारोगी मुले दिसली! मला त्या वेळी तरी त्यांचे वय बारांपेक्षा कमी वाटले. मग काय गर्भातच त्यांना संसर्ग झाला होता की, मुले मोठी असूनही वाढ खुंटल्यामुळे लहानखोरी दिसत होती कोण जाणे! महारोगी नाही असे एकही झोपडे नव्हते. रोगी निरोगी सगळे एके ठिकाणी राहावयाचे, जेवायचे व झोपायचे. प्रत्येक झोपड्यात पाच-पाच, दहा-दहा मुले होती. उष्ण हवेमुळे कपड्यालत्त्यांची फारशी जरूर नव्हती. जमिनीत भाताचे पीक भरपूर येते. सरोवरात बारमास मासे मिळतात. शेजारच्या जंगलात शिकार व लाकूड मिळते. सृष्टी अनंत हस्तांनी देते आहे, लोकसंख्या वाढत आहे व त्याबरोबरच रोग्यांची संख्याही वाढते आहे. ह्या तबकडीत महारोगी किती भराभर वाढू शकतात ह्याचा प्रयोग चालला आहे.

पुरीला जाताना असेच झाले. प्रत्येक खेड्यापाड्यातून आणि विशेषत: क्षेत्राचे ठिकाण म्हणून पुरीला इतके लोक हत्तीरोग झालेले पाहिले की, कधी येथून सुखरूप बाहेर पडते असे झाले. धडापेक्षाही हात व पाय पाहिले म्हणजे दर वेळी घृणा, भीती व अनुकंपेने मन पिळवटून निघावयाचे. उडिशाच्या सबंध पूर्वपट्टीत ह्या लोकांच्या पैदाशीची प्रयोगशाळा आहे.

पण उडिशाच का, सगळ्या भारतात, सर्व प्रांतातून आज अधिकाधिक वाढ कसली होत असेल तर ती माणसांची.

काही वर्षांपूर्वी एक भिकारीण व तिची तीन मुले लहान मुलांच्या कोर्टापुढे आली होती. मुलांची आई वेडी होती. तिचे आईबाप, भाऊ, नवरा, कोणी आप्तेष्ट चौकशी करून आढळले नाहीत. वेडी म्हणजे चिंध्या चिवडणारी नव्हे... पण अर्धवट. कोर्टामध्ये तिने वारकऱ्याचे अभंग म्हणून कीर्तनकारांच्या शैलीने जीवनाचे असारत्व, पंढरीचे माहात्म्य, संतांचा त्याग व निःस्पृहपणा ह्यावर आम्हाला चांगलेच प्रवचन दिले. मुले पोसणे तिला शक्यच नव्हते म्हणून सरकारने ती ताब्यात घेतली. चार वर्षांनी पाहते तो परत तीच वेडाबाई एक मूल हाताशी व एक स्तनाशी धरून कोर्टात उभी! गोड हसून तिने मला सांगितले, ''तुम्हाला द्यायला आणखी दोन आणली आहेत!''

वेडी-शहाणी, लुळी-पांगळी, रोगी-निरोगी, गरीब-श्रीमंत सर्वांच्या हातून लोकसंख्येत सारखी भर पडते आहे. तिसाचे चाळीस कोटी झाले, आता ह्या वर्षांच्या शिरगणतीत आणखी कितीची भर पडते म्हणून सर्व जग कुतूहलाने भारताकडे पाहत आहे.

भारतासारखे काय इतर देश नाहीत का? चीनही अत्यंत दाट वस्तीचा प्रदेश आहे असे ऐकतो. तेथेही लोकसंख्या वाढतच असणार. चीन काय किंवा इतर काही देश काय; लोकसंख्या दाट खरी, पण तिची वाढ भारताइतकी झपाट्याने होत नाही. ह्याचे कारण म्हणजे एका ऐतिहासिक घटनेमुळे. जिवाच्या पैदाशीसाठी लागणारी परिस्थिती भारतात गेल्या शतकात जशी निर्माण झाली तशी इतरत्र कोठेही आढळत नाही.

इंग्रज यावयाच्या आधीचा महाराष्ट्राचाच इतिहास घ्या ना! अठ्ठावन्न सालचे बंड, पेंढाऱ्यांचा उपद्रव, दुर्गादेवीचा दुष्काळ, पानिपतच्या लढाया, निजामाशी लढाया, कर्नाटकातील लढाया, शिवाजी व राजाराम ह्यांच्या वेळचे सतत पावशतकाचे स्वातंत्र्ययुद्ध ह्यात सारखी माणसे मरत होती. मूल होण्याच्या वयाच्या तरुण पोरी विधवा होत होत्या. प्रजोत्पत्तीला आळा बसत होता. मराठी इतिहासाचे एक गाढे विद्वान असे सांगतात की, ''औरंगजेबाच्या फौजेत असलेले तरुण जवान म्हातारे होऊन दिल्लीला पोचले व सर्व उमेद रणांगणावर गेल्यावर कित्येकांचे निर्वंश झाले असे एका जुन्या बखरकाराने लिहिले आहे.'' ही परिस्थिती जेत्यांची तर खुद्द ज्यांच्या

भूमीवर युद्ध चालले होते, त्यांच्या कुटुंबांची किती धूळधाण झाली असेल त्याची कल्पनाच केलेली बरी. त्याच्याही मागे गेले तरी मुसलमान राजवट, यादव, राष्ट्रकूट, चालुक्य, शातवाहन, अगदी ख्रिस्त शकाच्या पूर्वीपासूनचा इतिहास म्हणजे दोन हजार वर्षांच्या लढायांचा व राज्यक्रांत्यांचा इतिहास आहे. महाराष्ट्र इतरांशी लढत होता व इतर महाराष्ट्राशी लढत होते. सर्व भारतभर राष्ट्राराष्ट्राचे लढे चालले होते. लढाई, अशांतता, झगडा ही राष्ट्रांची नेहमीची प्रकृती होती व दीर्घकालीन शांतता हीच विकृती होती. जी लढाईत मरत नसत अशा अर्भकांना पटकी, देवी, उपासमारी घेऊन जात. पण इंग्रजांच्या राज्यापासून ही स्थिती पार बदलली. सबंध देशभर शंभर वर्षांवर शांतता नांदली; पेंढारी वगैरे लुटारूंचा नायनाट झाला. अंतर्गत युद्धे मुळीच नव्हती व बाहेरचे वैरीही नव्हते. अशी राजकीय परिस्थिती संबंध मानवेतिहासात पूर्वी कधी कोणत्याही राष्ट्राला मिळाली नाही. पाश्चिमात्यांच्या वैद्यकीय ज्ञानात जी भर पडली तिचा फायदा आपोआपच भारताला मिळाला. सबंध गावेच्या गावे निर्मनुष्य करणाऱ्या पटकी, देवी वगैरे रोगांवर ताबडतोब इलाज होऊ लागला. पोस्टाच्या सोयीने एका प्रांतात जे काय चालले असेल त्याची बातमी थोडक्या वेळात दुसऱ्या प्रांताना मिळू लागली. आगगाड्यांमुळे इकडचे धान्य तिकडे हालवता येऊ लागले. हिंदुस्थानात दरवर्षी कोठे ना कोठे तरी अतिवृष्टीमुळे वा अनावृष्टीमुळे दुष्काळ हा असतोच; पण इंग्रजांच्या वेळेपासून एका प्रांतातले धान्य दुसरीकडे जाऊ लागले व दुष्काळामुळे होणारे मृत्यू बरेचसे टळले. बालमृत्यूंचे प्रमाण मोठे असले तरी पूर्वी तरुण पुरुष लढाईत, साथीत किंवा दुष्काळात जे बरेचसे मरत ते मरेनासे झाले. शांततेमुळे स्त्रियांना व कुटुंबांना स्वास्थ्य लाभले व प्रजोत्पादनाच्या मार्गातील सर्व आडकाठी दूर होऊन मृत्यूचे मार्ग मात्र बरेचसे बंद झाले. भारताच्या बहुतेक विभागांचे हवापाणी असे आहे की, वस्त्रप्रावरण फारसे नसले तरी चालते. घरेही अगदी तुटपुंजी असली तरी तेवढा निवारा पुरतो व अशा भूमीवर प्रजोत्पादनाची प्रयोगशाळाच जणू स्थापन झाली.

इंग्रजांच्या राज्यस्थापनेपासून आतापर्यंत भारताची भूमी तितकीच राहिली... नव्हे, फाळणीमुळे संकोचच पावली आणि प्रजा मात्र दुप्पट झाली. कोणालाही ती फार झाली असे वाटत नाही, वाटत असले तरी कोणी तसे बोलत नाही. कारखानदारांना वाटते, जेवढी जास्त लोकसंख्या तेवढी मजुरांची

संख्या जास्त व पगार कमी. हिंदूंना वाटते, मुसलमान वाढत आहेत, आम्ही का नको? रोमन कॅथॉलिकांनी तर जास्तीत जास्त प्रजोत्पत्ती करून जगच व्यापण्याचा चंग बांधला आहे. त्यांच्या सर्व भाषांतील वर्तमानपत्रांतून व मासिकांतून मोठ्या कुटुंबाचे फायदे वर्णन करणारे लेख येत असतात. मजूर पुढाऱ्यांना वाटते, जितकी खायला तोंडे जास्त तितकी उपासमार जास्त, जितकी उपासमार जास्त तितकी अशांतता व क्रांतीची बीजे पेरण्यास योग्य भूमी; म्हणून तेही लोकसंख्येबद्दल बोलत नाहीत. शिवाय, लोकशाहीच्या काळात एका माणसाला एक मत असते व ते आंधळ्या, लुळ्या, रोगी, मरणप्राय माणसाचे असले तरी त्यांची किंमत एकाच मताची. म्हणून निरनिराळ्या पक्षांना व धर्मांना आपल्या पक्षाची, धर्माची वा जातीची लोकसंख्या जास्तीत जास्त हवी असते. चालत्या प्रेतांनी मते दिली तरी त्यांना चालेल, पण ती मिळावीत ही त्यांची धडपड. कोणी अधिक धान्य पिकवा सांगते, कोणी धान्याची भीक मागत जगभर हात पसरते, कोणी सभासभांतून ब्रह्मचर्याची तोड सुचवतात आणि इकडे जीवोत्पादन झपाट्याने होतच आहे.

अन्नरसाचा क्षीरसागर आटत चालला आहे. अर्धपोटी जिवांचे त्राण नाहीसे होत चालले आहे. भारताच्या असंख्य तोंडात घास भरवील असे कोणाही राष्ट्राचे आज सामर्थ्य नाही. क्षीरसमुद्र आटला की बहुतेक जीव तडफडून मरतील. असंख्य मढ्यांनी खतावलेल्या भूमीवर परत जोरात अन्नोत्पादन होईल. अल्प स्वल्प राहिलेल्या जीवांना परत जगण्या-वाढण्याला योग्य परिस्थिती मिळेल व परत नव्याने प्रजोत्पादनाचा प्रयोग सुरू होईल.

✿

१६

# सुप्त इच्छा

ती नि मी ओळीतच बसत असू. मी नवीनच काम करू लागले होते, ती माझ्याआधी वर्षभर तेथे होती. आमच्यापुढे दर आठवड्याला निरनिराळे खटले यावयाचे व आम्ही दोघींनी मॅजिस्ट्रेटच्या साहाय्याने ते चालवायचे असे चालले होते. ती होती एक इंग्रज मिशनरी बाई. हिंदुस्थानात तिचे पंचवीस वर्षे आयुष्य गेले होते. मूळच्या गोऱ्या रंगाला पिवळसर चामड्याची झाक आली होती. आपण जवळजवळ हिंदीच आहोत हे दाखविण्यासाठी ती आपल्या पांढऱ्या केसांच्या सुपारीएवढ्या अंबाड्यावर मोठी कडक निशिगंधाची वेणी घालायची, कधी कुंकू लावायची, कधी लुगडेसुद्धा नेसून यायची. ती कुमारी होती हे सांगायला पाहिजे. पहिल्या-पहिल्याने सगळे सुरळीत चालले होते- सुरळीत म्हणजे मी तिच्या भानगडीत न पडता माझ्यापुढे आलेल्या गोष्टींचा निकाल लावीत असे; पण पुढे पुढे ते होईना. ती ख्रिस्ती- सर्व कोकरांवर करडी नजर असलेल्या धर्माची प्रसारक- आणि ज्या धर्माला सर्वसाधारण प्रमाण लावणे अशक्य आहे अशी हिंदू मी होते. संन्यासधर्माचा निदान तोंडाने उदोउदो करणाऱ्या धर्माची ती, तर गृहस्थाश्रमाचे

चीज करणाऱ्या धर्माची मी. ख्रिस्त हा एकच प्रेषित व त्याचा धर्म सर्वांनी स्वीकारावा असा तिचा अट्टाहास तर कोणी कोणत्या का धर्माचा असेना, मला काय त्याचे, अशी माझी वृत्ती. खरे पाहिले तर तिचा धर्म तिच्याजवळ व माझा धर्म वा मते माझ्याजवळ. दोघींना एकत्र काम करण्यास काहीच हरकत नव्हती. पण हळूहळू आमचे जमेनासे झाले एवढे मात्र खरे.

त्यांच्या चर्चची एक कार्यकारी बाई होती. तिचे कार्य म्हणजे तिला नेमून दिलेल्या वस्तीतील घरांवर नजर ठेवायची, त्यांच्या घरी वेळीअवेळी जाऊन कुटुंबातील माणसे काय करतात ते पाहून ती बातमी पाद्र्याला कळवायची. लहान मुलांचे कोर्ट म्हणजे ख्रिस्ती चर्चचा एक विभाग अशी तिची समजूत होतीसे दिसले. दर आठवड्याला ती निरनिराळी मुले कोर्टात आणायची- कोणाचा बाप दारू पितो म्हणून, कोणाची आई भटकते म्हणून, कोणाचे आईबाप भांडतात म्हणून. ह्या हेरगिरीबद्दल दरवेळी तिला माझ्या सहकारिणीकडून शाबासकी मिळे. मी मात्र दरवेळी ह्या खटल्याबद्दल भांडत असे. "अहो, पुण्यात अशा तऱ्हेने घरोघर हिंडले तर इतकी मुले कोर्टात खेचावी लागतील की, १०० मॅजिस्ट्रेट व ५० कोर्टे मिळूनही काम संपणार नाही. का अशा भानगडी तुम्ही आणता?" तिला ते कधी पटायचे नाही. एक दिवस एक जोडपे व एक मुलगी ह्या कार्यकारी बाईने आणली. मी विचारले, "भानगड काय? मुलीला मारझोड होते, का अन्न मिळत नाही, का तिने गुन्हा केला?" "ह्यापैकी काहीच नाही," कार्यकारी बाई म्हणाली, "पण त्यापेक्षाही भयंकर प्रकार आहे. ह्या गृहस्थाचे नाव जोसेफ, ही बाई सेरा, ही दोघेजण अमक्या घरात राहतात व त्यांना हे सात वर्षांचे लेकरू आहे." नंतर ती माझ्यापुढे वाकली व पुटपुटली, "अहो, त्या दोघांचे लग्न झाले नाही!" तिचे सर्वांग शहारले. मी माझ्या सहकारिणीकडे पाहिले, तिचेही तोंड अगदी गंभीर दिसत होते. खटल्यातील इसमाला पुढे बोलावून मी विचारले, "काय हो, किती वर्षे तुम्ही सध्याच्या घरी राहता?" "पाच वर्षे?" "मुलगी कितवीत आहे?" "तिसरीत." "पगार पोटापुरता मिळतो ना?" "हो." "काही कर्जबिर्ज?" "मुळीच नाही." बाईला विचारले. तिने सांगितले की, "आमचा भांडणतंटा काही नाही." "मग ह्या पोरीला आणले तरी कशाला इकडे?" मी त्रासून सहकारी मॅजिस्ट्रेटला विचारले, तर ती मला म्हणते, "म्हणजे? ह्या कोवळ्या निष्पाप अर्भकाला अशा पातकाच्या खाईत राहू द्यावयाचे की काय! बिनलग्नाच्या अपवित्र

संबंधापासून पापात जन्मलेले हे पोर आता अशा घरात राहणे योग्य नाही. छे! छे:! तिला सरकारने ताब्यात घेऊन आमच्या मिशनच्या बोर्डिंगात ठेवावे. तो माणूस आमच्या मिशनच्या पंथाचाच ख्रिस्ती आहे. पाच वर्षे तो मिशनशेजारीच राहतो व आमच्या चर्चमध्ये येतो आहे; काय लबाड आहे तो! आज त्याच्या गावची बाई आली होती; तिने सांगितले की, त्याचे लग्न झाले नाही म्हणून.'' आता मी पण हट्टाला पेटले. ''मी हा खटला हातात घेणार नाही. ज्या घरी मूल आहे तेथे त्याचे पालनपोषण नीट होत आहे. आईबाप निर्व्यसनी व सुस्वभावी आहेत. केवळ त्यांचे लग्न झाले नाही ह्या भानगडीशी मला कर्तव्य नाही. तुमच्या चर्चतर्फे त्याच्याविरुद्ध काय इलाज करायचा तो करा, पण हिंदी सरकारने लोकांच्या घरी जाऊन त्यांच्या संसारात लुडबूड करायला मुलांचे कोर्ट नेमले नाही.'' मी निक्षून सांगितले. ''दुसरे, तुमची कार्यकारिणी काही कोर्टाची ऑफिसर नव्हे; तिने परत येथे येता कामा नये.'' शेवटी दोन-तीन तासांच्या हुज्जतीनंतर ती केस काढून टाकली, पण आमची मने एकमेकांविषयी कलुषित झाली ती कायमची. तिला वाटे, मला नैतिक दृष्टिकोन व धार्मिक भावनाच नाहीत. मला वाटे ते थोडक्यात सांगण्यासारखे नाही, पण ती व तिची कार्यकारिणी अशा दोघीजणी जेव्हा निरनिराळ्या कुटुंबातील भानगडींबद्दल बोलायच्या तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरची हावरी उत्सुकता पाहून मला शिसारी येई एवढे मात्र खरे.

एकदा आमच्यापुढे एक जरा गुंतागुंतीचा खटला होता. एका अल्पवयीन मुलीला फूस लावून नेल्याबद्दल एका तरुण वेश्येवर खटला होता. त्या वेश्येने आपल्या वतीने बॅरिस्टर दिला होता. तिच्यावर गुन्हा शाबीत होणे कठीणच होते. कारण तिच्याविरुद्ध साक्ष द्यायला कोणी तयार नव्हते. ज्या पोरीला सोडवून आणली होती ती इतकी भेदरलेली होती की, ती कोर्टापुढे आली की, त्या वेश्येला व तिच्या साथीदारांना पाहून थरथरा कापायची. पोलिसांना ती बाई जामिनावर सोडायची नव्हती. दुसऱ्या दिवशीच्या साक्षी होईपर्यंत ताब्यात ठेवायची होती. बाईला चोवीस तासांपुरते जामिनावर सोडावे म्हणून बॅरिस्टर कोर्टाची विनवणी करीत होते. ती आपली विडा चघळीत मजेत उभी होती. क्षणाक्षणाला क्लार्क, प्रोबेशन ऑफिसर व मॅजिस्ट्रेट ह्यांच्याकडे बघून मंद हास्य चालले होते तिचे. बॅरिस्टरचे म्हणणे होते की, पोलीस बाईला वाईट वागवतील, बाईमाणूस

त्यांच्या ताब्यात जाणे बरे नव्हे, वगैरे. इतक्यात खोलीच्या एका कोपऱ्यात कोणी तरुण पोलीस, ''गावभवानी तर आहे...'' असे काहीसे पुटपुटला. क्षणार्धात कोर्टात भडका उडाला. इतका वेळ आळसट दृष्टीने पाहणारी ती बाई खाडदिशी जागी झाली. ती ताडताड त्या पोलिसाकडे गेली व त्याच्याकडे हात नाचवून तिने त्याच्यावर शिव्यांचा असा भडिमार केला की, बोलून सोय नाही. ती जे बोलली ते ऐकून बिचारा आमचा प्रोबेशन ऑफिसर शरमेने लाल झाला. आमच्या कानावरच्या शिरा सणसणायला लागल्या. शेवटी मॅजिस्ट्रेटने हुकूम केल्यावर, बॅरिस्टरने मध्यस्थी केल्यावर, ती बाई शांत झाली व जणू काय काही झालेच नाही अशा आविर्भावाने परत विडा चघळीत उभी राहिली. मिनिट दोन मिनिटात हा प्रकार झाला. माझ्या मिशनरी सहचारिणीला काय झाले ते कळले, पण ती बाई काय बोलली ते कळणे शक्यच नव्हते. तिने मला विचारले, ''काय हो, काय बोलत होती ती?'' ''छे! छे! ते भाषांतर करण्यासारखे नाही- आणि मला तरी कुठे सगळे कळले आहे ती काय म्हणाली ते!'' मी उडवून लावले. त्या बाईला ठेवायचे कुठे असा प्रश्न पडला- तो काय आश्चर्य! माझी सहकारिणी म्हणाली, ''हे पाहा, दोन पोलीस पहाऱ्याला देत असाल तर बाई माझ्या बंगल्यात राहू दे.'' आम्ही सगळी चकित झालो. पण तिचे मनापासून आभार मानून बाई तिच्या स्वाधीन केली.

दुसऱ्या दिवशी मी आले तो तीही येऊन पोहोचली होती. पुरुष मॅजिस्ट्रेटना यायला अवकाश होता म्हणून आम्ही बोलत बसलो. आज माझ्या सहकारिणीची वृत्ती का कोण जाणे उत्तेजित दिसत होती. डोळ्यांत चमक होती, तोंडावर किंचित हसू, किंचित धास्ती, किंचित समाधान असा काही चमत्कारिक मिश्र भाव दिसत होता. तिने आपली खुर्ची माझ्याजवळ ओढली व मला म्हटले, ''काय विलक्षण अनुभव! कालची रात्री मी कधी विसरणार नाही!'' ''म्हणजे? काय झाले?'' मी चकित होऊन उदगारले. ''अहो, मी रात्रभर त्या वेश्येला माझ्याच खोलीत ठेवली होती...'' माझ्या चेहऱ्यावरचे आश्चर्य पाहून ती घाईघाईने पुढे म्हणाली, ''मीच पोलिसांकडून दुसरी खाट आणवली व ही व्यवस्था केली, म्हणजे तिने पोलिसांशी संगनमत करून पळून जायला नको म्हणून.'' ''मग तिने तुम्हाला शिव्याबिव्या देऊन मारण्याचा प्रयत्न केला की काय?'' मी काळजीच्या स्वरात विचारले. ''छे! ती जेवून डाराडूर निजली ती सकाळी आठ वाजेपर्यंत. हालवून हालवून जागे

त्यांच्या ताब्यात जाणे बरे नव्हे, वगैरे. इतक्यात खोलीच्या एका कोपऱ्यात कोणी तरुण पोलीस, ''गावभवानी तर आहे...'' असे काहीसे पुटपुटला. क्षणार्धात कोर्टात भडका उडाला. इतका वेळ आळसट दृष्टीने पाहणारी ती बाई खाडदिशी जागी झाली. ती ताडताड त्या पोलिसाकडे गेली व त्याच्याकडे हात नाचवून तिने त्याच्यावर शिव्यांचा असा भडिमार केला की, बोलून सोय नाही. ती जे बोलली ते ऐकून बिचारा आमचा प्रोबेशन ऑफिसर शरमेने लाल झाला. आमच्या कानावरच्या शिरा सणसणायला लागल्या. शेवटी मॅजिस्ट्रेटने हुकूम केल्यावर, बॅरिस्टरने मध्यस्थी केल्यावर, ती बाई शांत झाली व जणू काय काही झालेच नाही अशा आविर्भावाने परत विडा चघळीत उभी राहिली. मिनिट दोन मिनिटात हा प्रकार झाला. माझ्या मिशनरी सहचारिणीला काय झाले ते कळले, पण ती बाई काय बोलली ते कळणे शक्यच नव्हते. तिने मला विचारले, ''काय हो, काय बोलत होती ती?'' ''छे! छे! ते भाषांतर करण्यासारखे नाही- आणि मला तरी कुठे सगळे कळले आहे ती काय म्हणाली ते!'' मी उडवून लावले. त्या बाईला ठेवायचे कुठे असा प्रश्न पडला- तो काय आश्चर्य! माझी सहकारिणी म्हणाली, ''हे पाहा, दोन पोलीस पहाऱ्याला देत असाल तर बाई माझ्या बंगल्यात राहू दे.'' आम्ही सगळी चकित झालो. पण तिचे मनापासून आभार मानून बाई तिच्या स्वाधीन केली.

दुसऱ्या दिवशी मी आले तो तीही येऊन पोहोचली होती. पुरुष मॅजिस्ट्रेटना यायला अवकाश होता म्हणून आम्ही बोलत बसलो. आज माझ्या सहकारिणीची वृत्ती का कोण जाणे उत्तेजित दिसत होती. डोळ्यांत चमक होती, तोंडावर किंचित हसू, किंचित धास्ती, किंचित समाधान असा काही चमत्कारिक मिश्र भाव दिसत होता. तिने आपली खुर्ची माझ्याजवळ ओढली व मला म्हटले, ''काय विलक्षण अनुभव! कालची रात्री मी कधी विसरणार नाही!'' ''म्हणजे? काय झाले?'' मी चकित होऊन उद्गारले. ''अहो, मी रात्रभर त्या वेश्येला माझ्याच खोलीत ठेवली होती...'' माझ्या चेहऱ्यावरचे आश्चर्य पाहून ती घाईघाईने पुढे म्हणाली, ''मीच पोलिसांकडून दुसरी खाट आणवली व ही व्यवस्था केली, म्हणजे तिने पोलिसांशी संगनमत करून पळून जायला नको म्हणून.'' ''मग तिने तुम्हाला शिव्याबिव्या देऊन मारण्याचा प्रयत्न केला की काय?'' मी काळजीच्या स्वरात विचारले. ''छे! ती जेवून डाराडूर निजली ती सकाळी आठ वाजेपर्यंत. हालवून हालवून जागे

करावे लागले तिला.'' ती थांबली- मी काहीच बोलले नाही, पण माझ्या प्रश्नार्थक मुद्रेला तिने उत्तर दिले, ''एक सबंध रात्र अशा बाईच्या सहवासात काढणे, म्हणजे विचित्र नाही का? रात्रभर मला झोप आली नाही. कोर्टापुढे तिच्याबद्दल आलेल्या माहितीचा मी विचार करीत होते-'' तिने एक दीर्घ श्वास घेतला व मला विचारले, ''ह्या खटल्यासाठी आपल्याला तिच्या घरी जाऊन जागा पाहावी लागेल का?'' ''काही कारण दिसत नाही.'' मी शक्य तितक्या निर्विकारपणे उत्तर दिले. माझ्या उत्तराने तिच्या चेहऱ्यावर निराशेची एक सूक्ष्म छटा चमकून गेली. सुदैवाने ती बोलली नाही. ती स्वतःच्याच विचारात गुरफटून गेल्यासारखी दिसली. नेहमी तिच्या चेहऱ्यावर स्वतःबद्दल एक प्रकारचा आत्मविश्वास दिसे. चुकलेल्या जगाला सन्मार्ग दाखविण्यासाठी आपला जन्म आहे अशी तिची ठाम समजूत होती. तिने आपले आयुष्य ख्रिस्ताला वाहिले होते व सेंट पीटरच्या वहीत पुण्याच्या सदरात आपल्या नावाने सारख्या रकमा जमा होत आहेत त्याबद्दल तिला शंका नव्हती. तिला संसार नव्हता. मग संसारातली सुख-दुःखे ती काय अनुभवणार? पण त्यांच्यात तिला अवीट गोडी वाटत होती. ती इतरांच्या संसारांच्या बारीक-सारीक बाबी अगदी अधाशीपणे ऐकायची.... अर्थात, ते केवळ त्यांना सन्मार्ग दाखविण्यासाठीच असे. ती मला दरवेळी बजावायची. आज मात्र तिच्या चेहऱ्यावर केवळ आत्मतुष्टी नव्हती. अमके पुस्तक वाचू नकोस असे सांगितले असताना ते पुस्तक अचानक हाती पडावे, घाईघाईने ते वाचावे, कधी कल्पना नव्हती असे त्यातले काही तरी अर्धवट आपल्याला कळावे- म्हणजे आपली जी मनोवृत्ती होते तशी तिची झाली होती. थोडी शरम, थोडी भिती, अज्ञात प्रदेशात पाऊल घातल्याचा अभिमान असे तर तिला वाटत नसावे? काल रात्री तिला तिच्या उपाशी कौमारहृदयाने त्या वेश्येच्या संगतीत कसली बरे चित्रे रंगविली असतील? माझ्या शब्दांत सांगण्यापेक्षा एक जुनी गोष्टच सांगितलेली बरी.

ही गोष्ट द्रौपदीच्या जन्माबद्दलची आहे. ती मध्ययुगीन जैन वाङ्मयात आढळते, विलायती फ्रॉईडच्या पूर्वजन्मींच्या भारतीय अवताराने सांगितलेली ती कथा अशीः एका नगरात एका श्रीमान सावकाराला पूईगंधा (कोणी तिचे नाव सुकुमालिया असेही सांगतात.) नावाची अतिरूपवती मुलगी होती. तिच्या रूपाला भाळून पुष्कळांनी तिला मागणी घातली. योग्य वेळी त्या सावकाराने मोठ्या थाटाने व पुष्कळ पैसा खर्चून मुलीचे लग्न त्याच

गावच्या दुसऱ्या एका सावकाराच्या मुलाशी केले. तो श्रेष्ठिपुत्र रात्री शय्यागारातून धावत बाहेर आला व त्याने आपल्या बापाला सांगितले की, ''बाबा, ह्या मुलीबरोबर मी राहणे शक्य नाही. हिला हाकलून द्या.'' ती अभागिनी बिचारी रडत-रडत लग्नाच्या रात्रीच बापाच्या घरी परत आली. बापाने काही दिवसांनी परगावी जाऊन तेथे तिचे लग्न करून दिले, पण परत तोच प्रकार झाला. असे दोन-चारदा झाल्यावर बापही तिच्यावर रागावला व त्याने तिला घराबाहेर काढून लावले. तिच्या रूपाला भाळून पुष्कळ तरुणांनी तिला आसरा दिला. पण पूर्ववत तिला बाहेर पडावे लागले. शेवटी तिने एका जैन साधूचा उपदेश घेतला व ती श्राविका होऊन गावोगाव भिक्षा मागत व जिनाचे चिंतन करीत हिंडू लागली. सरतेशेवटी ती एका गावी आली. तेथे तिने आपल्या कष्टप्रद निष्फळ जीवनाचा त्याग करण्याचा निश्चय केला व जैन संप्रदायाप्रमाणे उपास करण्यास सुरुवात केली. ती अत्यंत क्षीण झाली. त्या गावच्या उद्यानात एका मोठ्या झाडाखाली बसून ती आयुष्याचे क्षण मोजीत होती. इतक्यात शेजारीच तिला मोठ्याने हसणे व बोलणे ऐकू आले. तिच्या क्षीण डोळ्यांना दिसले की, त्या गावची सुप्रसिद्ध रूपवती वेश्या उद्यानात विहार करीत आहे व त्या गावाचे पाच सुस्वरूप तरुण तिच्या प्रसादाची याचना करीत तिच्याभोवती भुंग्यासारखे घोटाळत आहेत. अभागिनीच्या मनात आले, 'हाय दैवा! तिला एका वेळी पाच मिळावे आणि माझ्या वाट्याला जन्मात एकसुद्धा येऊ नये?' हा विचार तिच्या मनात येतो तोच तिचा प्राण गेला. मात्र मनाच्या सकाम अवस्थेत देहावसान झाल्यामुळे तिला मुक्ती न मिळता तिला पुनर्जन्म मिळाला व ती दोवई म्हणून जन्माला येऊन तिला पाच पती मिळाले.

आमच्यापुढची ती केस थोडा वेळ चालून थांबली व नव्या केसला सुरुवात झाली. ती होती एका लहान मुलीचीच. तिला बाप व एक लग्न झालेली बहीण होती. सर्व माणसे होती ख्रिस्ती. बापाने त्या लहान पोरीचे लग्न करण्याचा घाट घातला होता. पण ख्रिस्ती बहिणीने तिला पळवून नेऊन आमच्यापुढे आणले होते- बाप पोरगी परत मागत होता. मुलगी फार लहान आहे, एवढ्यात लग्न होऊ नये, असे बहिणीचे म्हणणे होते. ती लहान मुलगी आपली हकीकत सांगत होती. सांगता सांगता ती माझ्या सहकारिणीकडे वळून म्हणाली, ''हे बघा, आई, मला माझ्या बहिणीनं संगं आणलं.'' माझ्या सहकारिणीला वात्सल्याचे भरते आले. ती आपल्या मिशनरी

मराठीत म्हणाली, ''माझ्या लेकरा, सर्व खरं सांग.'' ''बरं का आई, मी तिला इचारलं कशापायी मला नेतीस?''... आमचा प्रोबेशन ऑफिसर मध्येच म्हणाला, ''अग, 'आई'- काय चालवलं आहेस? 'बाई' म्हण.'' माझी सहकारिणी गदगद स्वराने म्हणाली, ''छे:! छे:! प्रभूनंच त्या मुलीच्या जिभेला तसं बोलावयास लावलं... प्रभूनंच ही लेकरं मला दिली आहेत.'' आता वत्सलरसाच्या पाटात सगळे कोर्ट बुडून जाईल ह्या भीतीने मी त्या मुलीच्या बापाला पुढे बोलावले व त्याने सुरुवात केली- ''कसं दोन्ही कार्ट्यांनी संगनमत केलं, बाई....'' केस पुढे चालू झाली. मी माझ्या सहकारिणीला अगदी जैन धर्मीयांप्रमाणे निदान (मरणापूर्वीची तीव्र इच्छा) केले... ''बाई ग, पुढच्या जन्मी पाच पांडवांची राणी नि शंभर कौरवांची आई हो!''

✿

१७

# वाटचाल

काही लोकांनी आम्हाला आतून ढकलले व काहींनी बाहेरून खाली खेचले व आमचे पाय जेमतेम धरणीला टेकले. सामान बरोबर आहे ना हे पाहून कसेबसे आम्ही स्टेशनबाहेर पडलो तो तेथेही गर्दीच. जमिनीवर बाजार पसरला होता व मध्ये ठेवलेल्या हातभर वाटेतून माणसे सामान पाठीवर किंवा डोक्यावर घेऊन चालली होती. पंचवीस-तीस पावले चालल्यावर आम्ही एका उघड्या मैदानाशी पोहोचलो. ''तो पाहा देवाचा तंबू. दर्शनाची नुसती गर्दी उसळली आहे.'' माझ्याबरोबरच्या गृहस्थांनी दाखवले. मैदानात माणसांची दाटी झाली होती व त्यांच्या डोक्यावरून एक एकखांबी मळकट तंबू दिसत होता. त्यातच पालखी एका दिवसासाठी विसावली होती. रस्त्यावरची, मैदानातली व आगगाडीतली सर्व गर्दी ज्ञानेश्वरांच्या पादुकांवर डोके ठेवण्यासाठी उसळली होती. आम्ही तिकडे न वळता आमच्या बिऱ्हाडाकडे गेलो. एक मध्यम वयाचे गृहस्थ आम्हाला सामोरे आले. त्यांनी माझ्याबरोबरच्या गृहस्थांना बसवून घेतले व एका लहानशा भिंतीपलीकडे बायका बसल्या होत्या तिकडे मला नेले. बिऱ्हाड म्हणजे एका

नगराच्या घराची पडवी होती. पडवीपुढच्या बाजूला अंगणात सोवळ्याने स्वयंपाक चालला होता. मध्ये एक तीन फूट उंचीची भिंत होती. त्याच्यापलीकडे जरा मोठी पडवी होती. तेथे मराठे मंडळींचा स्वयंपाक त्यांच्यातल्या बायका करीत होत्या. मला दाखवल्या जागी मी गुपचूप जाऊन बसले. इतक्यात कोणीसे म्हणाले, ''वाजले किती?'' प्रश्न ऐकून मी चपापलेच. वारीला जाताना घड्याळाची उपाधी नको म्हणून ते मी घरी ठेवले होते. पण तेथील एका बाईजवळ घड्याळ होते, त्यांनी सांगितले, ''साडेअकरा.'' ''मग आटपा लवकर. पालखी निघण्याच्या आत जेवण आटोपून, भांडी घासून, मोटार पुढे गेली पाहिजे.'' सोवळ्यातून उत्तर आले, ''सर्व तयारी आहे, फक्त जेवणारांचीच खोटी आहे.'' एवढ्यात जेवणारे पुरुष- आमच्यातले तीन ब्राह्मण गृहस्थ- सोवळे नेसून जेवावयास आले व भिंतीपलीकडे मराठे मंडळीही जेवावयास बसली. आमचे दिंडीवाले जेवून गेल्यावर सोवळ्यातल्या बायकांनी वाढून घेतले व स्वयंपाक ओवळ्यात घेऊन आम्ही इतरजणी बसलो. जेवणे झाल्यावर ओढ्यावरून भांडी घासून आणली. ती पोत्यातून बांधली व पोती मोटारीत टाकली. मराठे मंडळींचेही आटपले होते. त्यांचेही सामान मोटारीत गेले होते. मोटार पुढे गेली. आम्ही विहिरीवरून पिण्याचे पाणी भरून आणले व पालखी निघण्यास वेळ होता म्हणून बायका जरा लवंडल्या. मी काही चालून थकलेली नव्हते, मी भिंतीला टेकून बसले व माझी पुढील काही दिवसांची सोबत कोण कोण आहे ते पाहू लागले.

आम्ही एकंदर नऊ-दहाजणी होतो. पैकी तीन वयस्क सोवळ्या बायका, इतर सहा-सातजणी मध्यम वयाच्या व एक- ताई... अगदीच पोर होती. पुढल्या मुक्कामाला आणखी दोन-तीनजणी येऊन मिळाल्या. भिंतीपलीकडे पुरुषांच्या बैठकीत एक गृहस्थ होते. त्यांना आम्ही काका म्हणत असू. हे भजनी दिंडीत होते. ते हिशेब बघत. काय वस्तू आहे-नाही बघत, पण वास्तविक बाजारहाट स्वयंपाकपाणी बायकाच करीत. काकांची मदत असे इतकेच. आणखी एक गृहस्थ होते. ते प्रसिद्ध प्रवचनकार असून दिंडीतील सर्व मंडळींना गुरुस्थानी होते. ते फक्त जेवणास व संध्याकाळच्या फराळापुरते यावयाचे. त्यांचे बसणे-उठणे इतर भजनी मंडळीत असे. त्यांच्याच कृपेने मी आज ह्या समुदायात आले होते. ताई माझ्याजवळ बसून मला बायांची नावे त्या कोठल्या गावच्या; वगैरे सांगत होती. पलीकडे

दिंडीचे व्यवस्थापक व भजनी मंडळी गुरुजींशी संभाषण करीत होती. त्यांचे शब्द कानांवर पडत होते. शेजारच्या थोरल्या पडवीत दिंडीच्या मालकीणबाई मराठे बाया मंडळींकडे जरा लवंडल्या होत्या. त्या व त्यांची बहीण आळंदीहून दिंडी काढीत व भजनी मंडळीच्या जेवण्या-राहण्याची सर्व व्यवस्था करीत असे कळले. आज ताईने मला त्या फक्त दाखवल्या, मग पुढे त्यांची-माझी चांगली ओळख झाली. थोड्या वेळाने दिंडीवाले उठून गेले व आता लवकरच पालखी येणार म्हणून बायकाही उठून तयारीला लागल्या. इतक्यात तुतारी ऐकू आली, पाठोपाठच भजनाचा गजरही कानी आला व आम्ही बिऱ्हाड सोडून सडकेच्या कडेला जाऊन उभ्या राहिलो. निरनिराळ्या दिंड्या भजन करीत चालल्या होत्या. आमची दिंडी आली व संतांची पायधूळ मस्तकी घेऊन इतर बायांप्रमाणेच मी पण दिंडीत शिरले, भजन चालू होते, ''ऐसी कळवळ्याची जाति करि लाभावीण प्रीती...'' सांगणे सोपे, पण होणे शक्य आहे का? का नाही? सगळ्या आयांची प्रीती अशीच नसते का? मुलांकडून काही मिळेल म्हणून असते ती? परवा जाऊबाईंच्या अंगणात मांजराने पिल्लू मारले म्हणून ती चिमणी तडफडत होती- सारखा आक्रोश करीत होती. तिची प्रीती काय लाभावर आधारलेली होती? प्रीती काय विचार करून आणता येण्यासारखी चीज आहे? ती जन्माला येते ती काय आम्हाला विचारून, परवानगी घेऊन येते? ती न विचारता हृदयाच्या धाग्या-दोऱ्यात स्वत:ला विणून घेते आणि मनुष्य आयुष्याचा मार्ग आक्रमीत असता ह्या धाग्याची ओढाताण होत असते- कित्येक अजिबात तुटून जातात व माणसे रक्तबंबाळ हृदयाने शेवटी म्हणतात, ''सोडव, देवा, आता.'' आयांचीच का? सगळीच प्रीती लाभावीण असते, म्हणूनच तर त्यातून दुःख निर्माण होते.

इतक्यात माझ्या शेजारच्या बाईने मला हालवले. ''ही पाहा बाई पंचारती घेऊन उभी आहे. जागजागी उभ्या आहेत बाया पालखीला ओवाळायला.'' माझी तंद्री भंगली. मी पाहू लागले. सबंध रस्ता माणसांनी फुलून गेला होता. दोन्ही बाजूंनी ज्ञानबा-तुकारामाच्या नावांचा घोष चालला होता. दिंडीतल्या लोकांच्या भजनाने, टाळ-मृदंगाने जग नादमय झाले होते. आम्ही गाव ओलांडून रस्त्याला लागलो. चालण्याचा वेग जरा जास्त झाला. सूर्य अभ्राच्छादित होता. वारा धों-धों वाहत होता व उडणाऱ्या धुळीमुळे वातावरण धुंद झाले होते. आळंदी, पुणे, सासवड, वगैरे डोंगराळ मुलूख

मागे टाकून पूर्व महाराष्ट्राच्या पठाराची चिन्हे दिसू लागली होती. तरी मधूनमधून टेकड्या व जरा मागे मोठाले डोंगर दिसत होते. यंदा इकडील भागात रोहिणीचा पाऊस खूप पडला होता, म्हणून मधेच किंचित ओलावा होता व वातावरण प्रसन्न होते. निरनिराळ्या अभंगांचे शब्द अधूनमधून कानांवर पडत होते. ''वेगे आणावा तो हरि...'' ''लावोनिया हात कुरवाळिला माथा...'' ''ये ग, ये ग विठाबाई...'' एवढ्यात सर्व दिंड्या थांबल्या. का बरे? शेजारची बाई म्हणाली, ''उभं रंगण आहे म्हणून.'' तिच्या शब्दाचा अर्थ मला कळला नाही. पण बाकीचे काय करतात ते आपण करावे म्हणून मी उभी राहिले. पालखीपुढे चालणारा सर्व समाज दुभागून रस्त्याने दुतर्फा उभा राहिला. मध्ये दहा फूट जागा ठेविली होती. ''जय जय विठोबा रखुमाई'' तालावर सुरू झाले. टाळ जोराने वाजू लागले. मृदंग पहिल्याने धीमे धीमे व मग भराभर नाद देऊ लागला. म्हणणारे लोक तालावर जागच्या जागी पावले टाकू लागले, म्हणण्याची लय हळूहळू वाढू लागली- दुगण झाली चौगण आता वाढणार तरी किती? नाचणाऱ्या लोकांमागे बघणारा स्त्रीसमाज होता. त्यांचीही अंगे आपसूक तालात हलू लागली. इतक्यात तांबूस रंगाच्या घोड्यावर बसलेला व रुप्याच्या काठीत बसवलेले निशाण घेतलेला एक स्वार व त्याच्यामागून मोकळा घोडा हातात धरलेला एक इसम असे दौडत पालखीपर्यंत गेले. घोड्यांनी पालखीशी डोके ठेवले, व स्वार व रिकामा घोडा आले तसे दौडत परत गेले. ''पाहिलंत? मुक्या जनावरालासुद्धा किती भक्तिभाव असतो तो?'' माझ्या शेजारच्या बाई म्हणाल्या. ''पण हे घोडे कसले पालखीबरोबर?'' मी विचारले. माझ्या अज्ञानाची कीव करीत त्यांनी सांगितले, ''तो रिकामा पांढरा घोडा आहे ना... पुढे चालतो तो? तो देवाचा. त्यावर रेशमाचं खोगीर आहे व मागून निशाण घेऊन बसलेला स्वार येतो तो देवाचा स्वार. हे दोन्ही घोडे सरदार शितोळ्यांनी देवाला (ज्ञानेश्वरांना) दिलेल्या सरंजामापैकी आहेत,'' मी ''ठीक'' म्हटले. एवढ्यात रंगण आटोपून पालखी परत मार्गी लागली.

रात्रीचा मुक्काम लवकरच आला. एका वाड्याच्या ओसरीवर व अंगणात आम्हाला जागा मिळाली होती. शेजारच्या मोठ्या वाड्याच्या सोप्यात बाकीची मंडळी होती. सकाळच्या बांधून आणलेल्या भाकऱ्या, पोळ्या व चटणीवर संध्याकाळचा फराळ आटोपला व आम्ही बिछाने पसरले. पुरुष मंडळींना काहीतरी फराळाचे केले होते. पण ती येण्याचे आतच

मला झोप लागली. फराळ केला म्हणजे मी व आमच्या दिंडीतल्या एका मुलीने. बाकीच्या बायका मागून बसणार होत्या. पंढरपूरपर्यंत हाच कार्यक्रम असे. ताईला भूक लागायची. ती संध्याकाळचे लवकर खायची, मी पण तिच्याबरोबर माझे उरकीत असे. बाकीच्या बायांचे मागून व्हायचे. काहींचा उपवासाचा फराळ, काहींचा खरकटा फराळ, काहींचे नुसते दाणे व साबुदाणे असे पाच बायका व पंचवीस प्रकार असतात. सकाळच्या जेवणाची हीच रीत. काहींचा साधा सोमवार, काहींचा आळणी सोमवार, काहींचा कडकडीत सोमवार, काही दुपारी जेवणाऱ्या तर काहींचा सोमवार संध्याकाळी सुटणारा, आणि ह्याशिवाय पुरुष असत त्यांच्यासाठी संध्याकाळी निराळे फराळाचे व्हावयाचे. ही सर्व भानगड व त्यापासून उत्पन्न होणारे चौपट काम दिवसभर चालून त्या बायका कशा करीत ते त्यांच्या त्याच जाणत. पंढरपूर जवळ येत चालले तसतसे रोजच्या उन्हाने सर्वांची तोंडे काळवंडून सुकली, रोजच्या श्रमाने ग्लानी आली. बहुतेक सर्वांचेच पाय दुखत होते; पण रोजच्या कामाची कोणी फारशी कुरकूर केली नाही. त्यातल्या त्यात म्हाताऱ्या होत्या त्यांची जपणूक विशेष करीत. कोणी आजारी पडले तर औषध देत. त्यांचे कष्ट व आनंदी स्वभाव पाहून मला भारी आश्चर्य वाटे.

पहाटे साडेचार वाजता उठलो. अंधारात कंदिलाच्या उजेडात सर्व प्रात:कृत्ये आटोपली. एकीने आडाचे पाणी काढावे, एकीने अंग धुवावे, एकीने लुगडे धुवावे असे पाळीपाळीने, घाईघाईने स्नान केले, आडाला हातरहाट होता एक व आंघोळी करणारे बायका-पुरुष होते शंभर! खूपच धांदल आणि गर्दी झाली. मी मारे कपडे धुण्याच्या व अंगाला लावायच्या साबणाच्या वड्या आणल्या होत्या! त्या परत नेऊन ठेवल्या त्या पुण्याला परत आल्यावर काढल्या. अंधारात वेणीफणी करणे व कुंकू लावणे माझ्या अगदी लहानपणापासून अंगवळणी पडले होते; त्यामुळे गैरसोय वाटली नाही. माझे सर्वांच्या आधी आटोपले व आता आज पादुकांचे दर्शन करावे म्हणून सामान मोटारीत टाकून मी निघाले. पालखी चांगली अर्धा मैल आमच्या उताराच्या पुढे होती. गावकऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी दर्शनाला चालल्या होत्या. एका मोठ्या वावरात पालखी उतरली होती. भोवती हजारो माणसांचा मुक्काम होता. बिऱ्हाड गुंडाळण्याची तयारी चालली होती. काही बैलगाड्या व लोक मार्गी लागले होते. इतर भल्या पहाटे न्याहारीचे

उरकून बांधाबांध करीत होते. ही झाली मध्यम स्थितीतल्या गृहस्थाश्रमी शेतकऱ्यांची यातायात. दिंडीबरोबर अगदी भणंग लोक पण खूप होते. मिळेल तेथे खायचे, जागा सापडेल तेथे पथारी पसरायची, व पालखी चालू लागली की चालायचे असा त्यांचा प्रघात असे. शिवाय, भिकारी नसूनही उघड्यावर मुक्काम करणारे लांब-लांबून आलेले लोक होते. पाऊस पडला तर फार हाल होतात. सर्वांच्या मलमूत्राची घाण सर्वत्र पसरते; पण यंदा पाऊस सुदैवाने फार पडला नाही. रात्रीच्या मुक्कामाला मुळीच पडला नाही, पण मळभ असल्यामुळे उन्हाचा त्रास होत नव्हता म्हणून लोक सुखात होते.

मी मराठीच्या आदिकवींच्या पादुकांवर डोके ठेवून बाहेर पडणार तो एका बाईने मला पूजा पाहण्यासाठी तंबूतच बाजूला नेऊन बसवले. दर्शनोत्सुक भक्तांना बाजूला सारून तंबूची प्रवेशद्वारे बंद केली. चांदीच्या ताटात घालून चांदीच्या पादुका पुजाऱ्यांच्या स्वाधीन करण्यात आल्या. यथासांग पण जरा घाईने प्रवासाला साजेल अशी पूजा होऊन आरती झाली व देवाभोवती मानकरी उभे राहून एक पडदा उभारला गेला. शेजारच्या बाईंना मी विचारले, "हे हो काय?" त्या म्हणाल्या, "देवाला नैवेद्य झाला. देव भोजन करीत आहेत. त्यांना दृष्ट लागू नये म्हणून भोवती पडदा धरला आहे." देवाच्या सगुणत्वाची व साकारत्वाची ही परिसीमा पाहून मी आश्चर्याने स्तंभितच झाले. "पूर्वी खरोखरीच देवाच्या ताटातील लाडू फुटत असे. हल्ली श्रद्धा नाही म्हणून असले साक्षात्कार नाहीत." त्या बाई पुढे म्हणाल्या, मीही मान डोलावून तंबूच्या बाहेर पडले. दर्शनाला येणाऱ्यांची गर्दी परत आत लोटली. "बायांनो, ओवाळणी टाका, ओवाळणी टाका." पालखीजवळचे दलाल ओरडत होते. येणाऱ्यांचे मन देवाच्या पायाशी घोटाळत होते, तर पालखीजवळच्यांचे लोकांच्या खिशावर स्थिरावले होते- ह्या कोंदट वातावरणातून मी झपाट्याने बाहेर पडले तो तुतारी वाजली. साडेसहाला देवांचा मुक्काम न चुकता हालत असे त्याचीच ही सूचना होती. मी वाटेवर चालणाऱ्या बायांत मिसळले व पुढची वाट काटू लागले.

सूर्य उगवल्यापासून मावळेपर्यंत मधले दोन-तीन तास वगळून सर्व वेळ चालण्यात जाई. सर्वांत पुढे सामानाने भरलेल्या बैलगाड्या असत. त्यांच्या नंतर शेकडो माणसे गटागटाने, गप्पा मारीत, अभंग म्हणत, भजन करीत जायची व सर्वांत मागून मुख्य मिरवणूक असायची. पहिली दिंडी अस्पृश्यांची, मग देवाचे घोडे, त्यांच्यामागून शेकडो झेंडेवाले व मागून इतर

दिंड्या आणि नंतर पालखी घातलेली गाडी व मागे मैलभर चालणारी मंडळी. बायका पुरुषांच्या बरोबरीने होत्या. त्यांची लाल, हिरवी, निळी निरनिराळ्या काठांची लुगडी, पुरुषांची मुंडाशी व पगड्या, झेंडेकऱ्यांचे उंच फडफडणारे भगवे झेंडे, दोन्ही बाजूंना मैल न मैल पसरलेली काळीभोर नांगरलेली शेते- लांब क्षितिजावरच्या टेकड्या, रस्त्यावरची हिरवळ आणि वरती पावसाळी ढगांमधून डोकावणारे निळे आकाश हा देखावा किती बघितला तरी माझ्या डोळ्यांची तृप्ती होत नसे. दुपारच्या मुक्कामात ओढ्याकाठी वावरात हजारो मंडळींचा मुक्काम होई. चालणारे रंगीत चित्र काही काळ काळ्या दगडाळ माळावर स्थिर होई. बायका-पुरुषांचा पहिला उद्योग पहाटे आंघोळ करून आणलेली ओली चिरगुटे वाळविणे हा असे. सर्व माळ रंगीबेरंगी पट्ट्यांनी भरून जाई. ठिकठिकाणी पेटलेल्या चुलीतून सदागती निळसर धूर व हलणाऱ्या ज्वाला दुपारच्या उन्हात तरळत वर जाऊन चित्रातील स्थिर पार्श्वभूमीवर उठून दिसत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत टाळ-मृदुंगांचा आवाज व तुकाराम, ज्ञानदेव, एकनाथ, नामदेव, ह्यांचे अभंग कधी गोड गळ्यांनी म्हटलेले, कधी तर ओरडून तारस्वरात म्हटलेले कानात भिनून जात. रात्रीच्या मुक्कामी बिऱ्हाडात, चार भिंतीत जे भजन होई तेथे आवाजाचा बेसूरपणा व टाळांचा कटू ठणठणाट ऐकून मन खिन्न होई; पण दिवसा मोकळ्या रस्त्यावर टाळांचा आवाज कधीच असहनीय झाला नाही. अभंगाचे शब्द ऐकून त्यांच्या अवीट गोडीत मन इतके रंगून जाई की, आवाजातील गोडीचा तेवढा आस्वाद घेऊन बेसूरपणा विसरण्याची प्रवृत्ती होई. रस्ताभर पहाटेचे काही तास वगळून वारा भिणभिण वाहत असायचा. घरून निघताना हौशीने मला सांगितलेच होते की, ''बाई, छत्री नेऊन काही फायदा नाही. वारा इतका बेफाट सुटतो की, ती उघडून धरताच येत नाही.'' त्याचे पुरे प्रत्यंतर आले. मी म्हटले, ''बरे झाले छत्री आगगाडीत विसरले!'' वाऱ्याने हालणारे बायकांचे पदर, झाडांच्या फांद्या शेतात कुठे-कुठे पेरलेला निळवा ह्यांनी त्या अखंड चाल चालणाऱ्या माणसाची गती जास्तच भासे, आणि वरती ढगही सारखे वाऱ्याने भिरभिरत असायचे. मी एका रंगमय, नादमय, वाऱ्याने भरलेल्या गतिमान अवकाशात सारखी पुढे-पुढे चालत होते. खाली पाहिले की असंख्य पाय चालताना दिसायचे, वरती पाहिले की असंख्य डोकी टाळ-मृदंगांच्या तालात वर-खाली होत पुढे जाताना दिसायची. मला वाटे, ह्या जनप्रवाहातील मी एक बिंदू आहे. मी माझ्या

पायाने चाललेली नसून भोवतालची चलसृष्टी मला लांब-लांब नेत आहे. रात्री निजले तरी मी चालतच आहे असा भास मला होई व सकाळी उठल्यावर रात्रीच्याच ठिकाणी मी कशी ह्याचे मला आश्चर्य वाटे.

आज आमच्या दिंडीतल्या मराठे मंडळींचा व ब्राह्मण मंडळींचा मुक्काम दुपारला शेजारी-शेजारीच होता. दिंडी त्यांचीच होती. सामानाची मोटार, लाकूडफाटा वगैरेंची व्यवस्था, त्याचप्रमाणे दुपारच्या मुक्कामाची व रात्रीच्या बिऱ्हाडाची जागा दिंडीचे मराठा मालकच बघून ठेवीत. रोज बरोबर चालायचे, जवळजवळ मुक्काम असायचा; पण जेवण मात्र निरनिराळे, हे मला कसेसेच वाटे; म्हणून मालकांना म्हटले, "बुवा, आज मला तुमच्याकडे जेवण घाला." बुवांनी मोठ्या अगत्याने कबूल केले. मोटार आल्यावर भराभर स्वयंपाक खाली उतरला, चूल पेटवून वरण गरम केले. पत्रावळी मांडल्या व एक पुरुषांची व एक बायकांची अशा पंक्ती मांडल्या. वाढप एक-दोन बाया व दोन-चार पुरुषांनी केले. बायांनी फक्त पहिली वाढ केली, शेवटपर्यंतचे वाढणे पुरुषांनीच केले. सर्व बायकांत हसत खेळत जेवण झाले. रात्रीचे बिऱ्हाड असेल तेथे बायकांनी पहाटे साडेतीन-चार वाजता उठावयाचे व दोन-तीन चुली पेटवून भात, भाजी, पोळ्या असा स्वयंपाक करून भांड्यांची तोंड गच्च बांधून तो स्वयंपाक मोटारीत सर्व सामानाखाली भरायचा अशी मराठे मंडळींची प्रथा होती. दुपारच्या मुक्कामाला भात चांगला गरम असे व त्यावर गरम केलेले वरण घातले म्हणजे अन्न रुचकर लागे. ह्या प्रथेचा फायदा म्हणजे दुपारच्या मुक्कामाला पोहोचताच जेवणाची पाने पडत, जेवण झाल्यावर दोन तास पालखी हालेपर्यंत विश्रांती मिळे व दुपारची चाल अगदी भरल्या पोटी होत नसे. ब्राह्मणांचा स्वयंपाक मुक्कामावर होई. चूल मांडून, पाणी भरून आणून, भाजी वगैरे चिरून, भात, पोळ्या, भाजी, आमटी एवढा स्वयंपाक होण्यास सहज दीड तास तरी लागे. त्यापुढे पुरुष सोवळ्याने बसत. त्यांचे झाले की सोवळ्यातल्या बाया दोन्ही वेळचे वाढून घेऊन बसत. नंतर स्वयंपाक ओवळ्यात घेऊन आम्ही बसत असू, तोंडात घास पडेपर्यंत सपाटून ऊन लागायचे व नंतर जेवण झाल्यावर तहान-तहान होत असे. जेवण झाल्यावर घाईघाईने ओढ्यावरून भांडी घासून आणून पोती भरून मोटारीत ठेवायची गर्दी असे, कारण मोटार रात्रीच्या मुक्कामासाठी पुढे जात असे. नंतर जेमतेम अर्धा-पाऊण तास विश्रांती मिळेतो पालखी हालली म्हणजे निघायची वेळ व्हायची. मराठी मंडळींमध्ये

स्वयंपाक बायका करीत, वाढणे, पाणी आणणे, मोठे सामान मोटारीत भरणे, वगैरे कामे पुरुष करीत. एकंदर बायका-पुरुषांचे वागणे जास्त खेळीमेळीचे होते. म्हणजे एकत्र बसणे, हासणे वगैरे नसे, पुरुषांची बैठक व बायकांची बैठक लांब लांब असे, पण वागण्या-बोलण्यात खुलेपणा असे. ब्राह्मण मंडळीत बरेचसे काम बायका करीत. पुरुष दोघेच, त्यातील एक प्रवचनकार, तेव्हा ते असले म्हणजे बायका चूपचाप असत, दुसरे थोडेबहुत काम करीत, पण एकंदर कामाचा बोजा बायकाच उचलीत. तसे मराठ्यांचे काम सुटसुटीत असे; सोवळेओवळे, निरनिराळे उपास, वगैरे नाहीत. एकदम पंक्ती बसायच्या व एकदम उठायच्या. म्हणून पन्नास-साठ मंडळी असूनही भराभर उरकत असे. एका दिंडीत असून जेवण निरनिराळे ह्याचे मला रोज वैषम्य वाटे. ती मंडळी सर्व स्वच्छ, अंग धुतल्याशिवाय न जेवणारी अशीच होती. मग हे अंतर? का एकत्र चालण्याने, देवाचे भजन करण्याने, संतांचे काव्य बरोबर म्हणण्याने काय फक्त पारलौकिक कल्याणाचा व्यापार साधायचा होता, आणि ह्या जगातील द्वैत कायम ठेवायचे? असा प्रश्न सारा वेळ माझ्यापुढे असे. बरोबरच्या ब्राह्मण मंडळींनी प्रेमाने मला आपलेसे केले होते. तसेच मराठे बायांनीही केले होते. दोन्हींना एके ठिकाणी आणणे शक्य नव्हते; म्हणून मी आज इकडची तर उद्या तिकडची पाहुणी म्हणून माझ्यापुरते तरी दोन्ही सांधायचा प्रयत्न करीत होते. आणि खरोखरीच एकत्र जेवणाच्या दिवसापासून त्या बाया जास्त आपुलकीने वागतात असे वाटले. रस्त्याने चालताना कित्येकदा माझ्याबरोबर चालू लागल्या, माझा हात हातात धरून माझ्याशी किती मनमोकळ्या गोष्टी बोलत. शेवटी शेवटी काहीजणींनी ''बरं का, ताई, आम्ही पुण्याला तुमच्याकडे येऊ बरं का!'' असेही सांगितले. एक मुलगी म्हणाली, ''पण ताई, तेव्हा आता वागता तशा वागाल ना?'' प्रश्न साधा, पण मला वर्मी लागला- आज हजारो वर्षे आम्ही शेजारी राहतो, पण अजून त्या आमच्या व आम्ही त्यांचे झालो नाही.

हे असे का होते? ब्राह्मण मंडळी इतकी का दुष्ट आहेत? छे! मुळीच नाहीत. त्या मराठा बायांना कोठे लागले तर पुढे होऊन औषध द्यायची. कोणाला भूक लागली तर खात्रीने पोटभर जेवू घातले असते. पण त्यांच्या हातचे खाणे व त्यांनी आणलेले पाणी पिणे हे मात्र त्यांना वर्ज्य होते. ह्यात काही वावगे करतो असे कोणाच्या मनातही येणे शक्य नव्हते. सर्वजणी एका जुन्या रूढीच्या चक्रात सापडलेल्या होत्या. काही मनापासून रूढी पाळीत

होत्या. काही लोकांत बरे दिसणार नाही म्हणून पाळीत होत्या. पण शहरात निरनिराळ्या लोकांशी नित्य संबंध येणारे ख्रिस्ती, मुसलमान वगैरे लोकांच्या समाजात वावरणारे पुरुषही त्या बायांसारखेच वागत. ह्याचे शल्य मला जास्त वाटे. वारकरी संप्रदाय, बाह्योपचार व दांभिक आचारधर्म ह्यांविरुद्ध संतांचा उठाव, अद्वैताची शिकवण व ह्या सर्वांवर कडी करणारे हल्लीचे शहरी जीवन ह्याचा सोवळ्या-ओवळ्याशी मेळ कसा घालायचा? काही प्रसंग तर मला फारच उपमर्दकारक वाटले. कोठचा मुक्काम ते काही आता आठवत नाही, पण संध्याकाळी बिऱ्हाडी पोहोचतो तो असे आढळून आले की विहीर जवळजवळ फर्लांगभर लांब आहे. विहिरीवर जाऊन, हातपाय धुऊन एक लहानशी कळशी भरून आणली. मोटारीतून वळकटी वगैरे आणली व ओसरीवर बसले होते. एवढ्यात 'सर्व व्यवस्था ठीक झाली ना?' विचारायला बुवा आले. मी म्हटले, "जागा छान आहे, पण पाणी फार दूर हो! पायाचे तर आज अगदी तुकडे पडले... आता पाणी भरायला किती लांब जायचे?" बुवांना कीव आली; त्यांनी एक घागर स्वच्छ घासवून, ताजे पाणी भरून गड्यांकडून आमचे बिऱ्हाडी आणून दिली. मी तोंडाने दुवा देत भरपूर पाणी प्याले, पण माझ्याबरोबरच्या माऊल्यांनी स्वत: आणलेले पाणी पिण्यासाठी व चहासाठी वापरले व बुवांनी आणवलेले पाणी फक्त परसाकडे जाण्यासाठी उपयोगिले! त्याच दिवशी पहाटे आम्ही अंधाराच्याच उठून ओढ्यावर स्नानास गेलो होतो. किती तरी लोक तोंड धुवीत, दात घाशीत, खाकरत-खोकरत आमच्याभोवती होते. मी कशीबशी अंघोळ केली. त्या पाण्यात मला तोंड धुऊन चूळही भरवेना! ह्या सर्व बायांनी "गंगे! भागीरथी!" म्हणून तेथे आंघोळ केली... अगदी चुळाही भरून तोंडे धुतली, तेव्हा आपल्या शेजारच्या व इतर जातीच्या माणसांच्या खाकरण्याचा ह्यांना विटाळ झाला नाही आणि आता मात्र ह्या आडाच्या स्वच्छ पाण्याचा ह्यांना विटाळ होत होता!

तीच गोष्ट बोलण्या-चालण्याची. अशाच आम्ही ओढ्यावर अंग धुवत होतो. बरोबर दोन कंदील आणले होते. मी अंग धुवून बाहेर आले तो दुसरा कंदील दिसेना म्हणून इकडेतिकडे चौकशी करू लागले. आमच्यापैकीच काहीजणी मागाहून आल्या होत्या. त्यांनी कंदील परसाकडे जाण्यासाठी नेला होता हे मला व माझ्याबरोबरच्यांना माहीत नव्हते. इतक्यात आमच्यासमोरच एक बाई कंदील हातात घेऊन ओढ्यात शिरली,

तेव्हा मी म्हटले, ''हा तर नाही ना आपला कंदील विचारू का त्यांना?'' पण माझ्याबरोबरच्या बाईने ओरडून कंदील नेणाऱ्या बाईला आधीच हटकले, ''ए बया, कोणाचा कंदील चालवला आहे?'' ती बाई झटदिशी वळून म्हणाली, ''कंदील माझा आहे. आणि 'बया, बया' कोणाला ग करतेस?'' चूक आमचीच, पण माझ्याबरोबरच्या बाईंना आश्चर्य वाटले. त्या माझ्याकडे वळून म्हणतात, ''पाहिलंत ना कसा रागाचा झटका आला तो? 'अग बया' म्हणायचीसुद्धा चोरी झाली बरं का!'' आता शब्दाने शब्द वाढू नये म्हणून मी घाईघाईने वर निघाले. पण आपल्या वागण्यातला व बोलण्यातला उद्दामपणा आपणास कसा जाणवत नाही ह्याचे आश्चर्य व उद्वेग मात्र किती वेळ वाटत होता. पांडुरंगाच्या पायावर डोई ठेवण्यासाठी दिवसेंदिवस कष्टणाऱ्या आम्ही आमच्याबरोबरच्या जिवंत देवांची अशी अवहेलना का करावी?

पण परिस्थितीचे हे माझे विश्लेषण व्यर्थ भावनेच्या आहारी तर जात नाही? ब्राह्मण आणि इतर ही एक सामाजिक परिस्थिती आहे. बहुसंख्य लोक ही परिस्थिती मान्य करतात- त्यात काही वैषम्य मानीत नाहीत- मी मात्र व्यर्थ त्याचा बाऊ करीत आहे असे तर नाही? तसे खास नाही. ब्राह्मण व इतर हा उपमर्दकारक फरक अनेक रूपकांनी, अनेक अभंगांनी वारकरी संप्रदायातील संतांनीच नाही का दाखवला? ब्राह्मणांच्या अन्यायाची दाद त्यांनी पांडुरंगाजवळ नाही का मागितली? ''चोखा जरी डोंगा भाव नव्हे डोंगा... का भुललासी वरल्या सोंगा?'' हा अभंग आमच्या दिंडीतील भजनी मंडळी कालच आळवून म्हणत होती ती काय त्याचा अर्थ न समजून? सामाजिक विषमतेविरुद्ध हे बंड फक्त अभंगात न राहता हळूहळू कृतीत उतरणार हे स्पष्ट दिसत असता आम्ही आंधळेच राहणार का? सोवळे-ओवळे, एकाचे पाणी चालते, एकाचे वर्ज्य, ही वरली सोंगे आम्ही अजून बाळगून राहणार का? आचारशुद्धतेच्या नावाखाली माणुसकी व शेजारधर्म गमावून बसणार का? ''भाव नव्हे डोंगा''... त्या भावाचा मधुर आस्वाद घेण्याची लायकी आमच्यात कधीच का नाही येणार?

पण सुदैवाने हे निष्फळ म्हणून कडू विचार डोक्यात फार वेळ राहण्याची परिस्थिती नव्हती. सगळे वातावरण आनंदमय होते- भांडण, शिव्यागाळी होत नव्हते असे नाही, पण इतर प्रसंगांच्या मानाने फारच कमी. कोणी भांडायला लागले तरी ''काय पंढरीच्या वाटेवर भांडता हो?'' असे इतरांनी म्हणावे व भांडणारांनी शरमून बाजूस व्हावे असाच प्रकार अनेकदा

मला दिसला. पालखीपुढं अर्धा मैल, मैल जाऊन एखाद्या झाडाखाली बसायचे असा बऱ्याच जणांचा प्रघात होता. झाडाखाली निरनिराळ्या ठिकाणची बायामंडळी जमत, मग एकमेकींना गाणी म्हणायचा आग्रह चाले. गाण्यांच्या कथावस्तूवरून, ते म्हणण्याच्या व बोलण्याच्या लकबीवरून, कोठची बाई कोण्या प्रदेशातील असावी ह्याचा कयास बांधण्याचा माझा प्रयत्न चाले व मागून विचारून माझा तर्क बरोबर आहे असे कळले म्हणजे मी फार खुशीत असे. एकदा अशीच बसले होते, तो ''मले, तुले'' शब्द कानावर आले म्हणून झटदिशी उठून त्या माणसांत गेले. ''तुम्ही खानदेशच्या का हो?'' ''नाही, आम्ही घाटावरल्या.'' ''असं होय?'' म्हणून मी तेथेच बैठक मारली. माझ्याबरोबर पुण्याकडच्या बाई होत्या त्या म्हणाल्या, ''ह्या तर मावळातल्यासारखं बोलत नाहीत, मग घाटावरच्या कुठल्या?'' मी म्हटले, ''घाटावरल्या म्हणजे औरंगाबादच्या बाजूच्या, नाही तर बुलढाण्याकडच्या.'' माझे बोलणे ऐकून त्या बाया खुलल्या. त्यांच्या मुलखाची मला माहिती आहे असे वाटून त्या पुढे म्हणाल्या की, ''आम्ही वेरूळच्या बाजूच्या.'' मी विचारले, ''तुम्ही कोण्या जातीच्या?'' ''आम्ही वारीक.'' मी म्हटले, ''आम्ही वारीक, वारीक, करू हजामत बारीक.'' खुदकन हसून बाईंनी मान हालवली व म्हटले, ''वा! घरची खूण समजली की!'' त्या मेळाव्यात बाया, पुरुष, लहान मुले मिळून जवळजवळ पन्नास माणूस न्हाव्याचे होते व सगळी माणसे गाडीने पुण्यास येऊन आळंदीपासून पालखीबरोबर चालत होती.

अशीच एकदा झाडाखाली बसले होते. दोघी-तिघी बाया मिळून गाणे म्हणत होत्या. ''श्रीशैल्या पर्वता जाऊ, चला गडे मळकार्जुन पाहू.'' हे गाणे पुणे-सातारच्या बाजूला फारसे ऐकायला येत नाही. ''का हो, तुम्ही कानडी मुलखातल्या का?'' ''छे! नाही! आम्ही मोगलाईतल्या, मराठी मुलखातल्या, पण कानडी मुलखाला जवळच.'' असे त्यांनी सांगितले.

काही बाया-पुरुष बीड, बिदर, परभणी, जालना-थेट नांदेडपासून आले होते. ''आम्ही गंगथडीचे'' म्हणून ते सांगत. एक दिवस सकाळी रस्त्याने जात होतो. आमच्या पुढेच एक बैलगाडी सामानाने भरली होती व सामानाच्या वरच तीन-चार चिल्यापिल्यांना बसवले होते. त्यातला एक मुलगा आकान्त करीत होता. त्याला गाडीत बसावयाचे नव्हते व त्याच्या आईने त्याला तसेच आत कोंबले होते. तो हात-पाय झाडून मोठा गळा

काढून मोकळेपणाने रडत होता व त्याची आई हातात एक जोंधळ्याचे ताट घेऊन हसत हसत त्याच्यावर उगारीत होती. एवढ्यात त्या पोराने दोन्ही हातांनी शंखध्वनी करावयास सुरुवात केली व सगळ्या बायांत एकच हशा पिकला. "पहाटंच देवाचं दर्शन केलं, म्या म्हटलं, पोर लई चाललं म्हून गाडीत बसवला तर आता बोंबा मारतंय! थांब, तुजं टाळकंच सडकते..." म्हणून ती गाडीमागे धावली. तिच्या बरोबरच्या बाया पण "व्हंजी नग, नग..." करीत तिच्यामागे लागल्या. हे लटांबर पुढे जाते तो मागून एक तरणी पोरगेलेशी बाई एका लहान पोराला बखोटीला धरून लळत लोंबत घेऊन चालली होती. मी विचारले, "का हो बाई, काय झालं पोराला रुसायला?" तशी ती म्हणाली, "अंवो, त्याला मुळीच चालायला नको- सारा वेळ म्हंतो, 'मावशे, वर उचल.' आता सकाळची वेळ, म्हटलं कोसभर चाल; मग घेते. तर रस्त्यात लोळण घेतो म्हणून असा चालवलाय." आत्याबाई म्हणाल्या, "पाहा कशी गंमत आहे; त्या पोराला चालायला हवं म्हणून, ते रडतंय अन ह्याला चालायला नको म्हणून हे रडतंय. ह्याला बसव त्या गाडीत अन त्या पोराला म्हणावं "चल बाबा पायी." एवढ्यात एका पुरुषाने येऊन पोराला पाठीशी बांधले व ती बाई आमचेबरोबर चालू लागली. ती मराठ्याची होती; आडनाव पवार; राहणारी जोगाईच्या आंब्याची. ते मूल तिच्या बहिणीचे. बहीण मेली होती आणि ही जशी पंढरपूरला निघाली तशी बहिणीच्या नवऱ्याने गावाबाहेर पोराला आणून हिच्या स्वाधीन केले. अंगावर एक कुडते- पांघरूणसुद्धा नाही आणि ती बिचारी पंधरा दिवस पोराला घेऊन यात्रा करीत होती. ती आमच्यापुढे गेली; पण अधूनमधून आम्हाला भेटायची. एक दिवस दुपारी रस्त्याच्या कडेला पोराला घेऊन दोन-तीन बाया-पुरुषांबरोबर बसली होती. आम्ही पण विश्रांतीसाठी टेकलो. ती आपले दोन्ही दंड चेपीत बसली होती. "आज फार दमला वाटतं!" मी म्हटले. "काय करू हो? सारा दीस पोराला पाठीशी घेऊन चालायचं. जीव नको झालाय." "मोठेपणी पांग फेडील हो मावशीचे." मी आश्वासन दिले. "तो कसला पांग फेडतो? काल फार त्रास दिला. म्हणून मी मुक्कामाला गेल्यावर त्याला चांगला सपाटला, तशी मला म्हंतो, "मावशे, मुझं नरडं दाबू का ग?" आमच्या हशात तीही सामील झाली, आणि ते बेरकी पोर पण तोंड फिरवून हसत होते.

अशी रोज महाराष्ट्राची नव्याने ओळख होत होती. पुण्याहून पालखी

निघाली तेव्हा पुणे, जुन्नर, मोगलाई, सातारा, वगैरेकडचे लोक होते; दर मुक्कामाला नवे नवे लोक येऊन मिळत होते. खानदेश, सोलापूर, नाशिक, वऱ्हाड- सगळीकडून प्रवाह घेऊन जसजशी पंढरी जवळ येत चालली तसतशी यात्रा वाढत चालली. सगळी माणसे मराठी होती- निरनिराळ्या जातींची होती, पण एकाच वारकरी पंथाचे अभंग म्हणत होती, एकमेकांशी बोलत होती, एकमेकांना मदत करीत होती, एकमेकींना गाणे म्हणून दाखवीत होती. फक्त मंडळी दिसत नव्हती कोकणची. मी चौकशी केली तर मला कळले, आषाढीला यात्रा देशावरची, तर कार्तिकीला पंढरीला संबंध कोकण लोटते; आता त्यांची भाताची वेळ, ते शेत सोडून कसचे येतात? देशावर शेते नांगरून पडली होती, पण पेरे होण्यास अवकाश होता. त्यांची भक्ती पूर्ण होती, आत्मघातकी खासच नव्हती. मी जवळजवळ सगळ्या महाराष्ट्रभर फिरले आहे, पण सर्व देशाचे एका वेळी, एका ठायी होणारे दर्शन मला अदभुत वाटले. ''ज्या देशातील लोक पंढरीला येतात तो महाराष्ट्र'' अशी महाराष्ट्राची एक नवी व्याख्या मला कळून आली.

त्याचप्रमाणे निरक्षर लोकांत सांस्कृतिक परंपरा कशी पसरते व दृढमूल होते ह्याचा एक धडा नऊ-दहा दिवस रोज मला मिळत होता. ज्ञानेश्वरांचा हरिपाठ, नाथांच्या ओव्या, नामदेवाचे व तुकारामाचे अभंग, जनाई-मुक्ताईचे कारुण्यपूर्ण गोड काव्य, अशी मराठ्यांची उत्तमोत्तम काव्ये म्हणत लोक आपली वाणी गोड व शुद्ध करीत होते व मने सुसंस्कृत करीत होते. ते आपला मार्ग हसत-खेळत आक्रमीत होते. लोकांनी यावे म्हणून त्यांचा आग्रह नव्हता. पालखी जाणार म्हणून जाहिराती लागल्या नव्हत्या, त्यांना बाहेरच्या जगाची पर्वा नव्हती, ते आपल्यातच धुंद होते, मस्त होते. ज्याला अंत:करण असेल, ज्याला सौंदर्यसृष्टी असेल त्याला हा आनंद लुटायची मोकळीक होती. सुसंस्कृत व साक्षरता ह्यातील फरक एके दिवशी मला विशेष जाणवला. आमच्या दुपारच्या मुक्कामी बसलो असता सहज रस्त्याकडे दृष्टी गेली तो एक पाद्र्याचे जोडपे दिसले. त्यांच्या हातात लहान लहान पुस्तके होती. प्रभू येशूच्या धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी ती आली होती. दोन-तीन दिवसांनी कंटाळून ती निघून गेली असावी, कारण ती पुढे दिसली नाहीत. मला त्यांची चीड आली होती, पण आमच्या मंडळींनी सर्व हसून घालवले. ते जोडपे साक्षर खात्रीने होते. पण संस्कृतीचा लवलेशही त्यांच्याजवळ नव्हता. निरनिराळे मानवसमाज आपल्या

अंत:करणातील काव्य, मांगल्य, सदभाव निरनिराळ्या तऱ्हेने प्रकट करतात व ह्या बहुरूपात त्याची ओळख करून घेणे- आपले तेच खरे हा आग्रह धरण्याआधी लोकांचे काय हे अगदी मनापासून समजून घेऊन त्यांच्याशी समरस होणे- हेच नव्हे का संस्कृतीचे लक्षण? ''ऐशा कळवळ्याची जाति करी लाभावीण प्रीती''- अंतिम लाभाची आशा न धरता सर्व मानवतेविषयी जिव्हाळा वाटणे हीच नव्हे का संस्कृती? पण एकेश्वरी पंथाच्या- मग तो राजकीय, सामाजिक वा नैतिक असो- अनुयायांना हे पटणार कसे? सबंध दोन-तीन शतके सर्व जगातील लहान-मोठ्या समाजावर स्वामित्व. त्यांची मूल्ये पायदळी तुडविणाऱ्या ख्रिस्त सेवकांना तर हे पटण्याचा सुतराम संभव नाही.

ह्या निरक्षर बायांना किती गाणी, अभंग, भारुडे पाठ होती त्याचा तर मला पत्ताच लागला नाही. सबंध प्रवासात तेच गाणे काही मी परत ऐकले नाही. गाणी उतरवून घेण्याचा सारखा मोह होत होता. पण कागद, पेन्सिल वा पुस्तक ह्यांना हातात धरायचे नाही असा निश्चय करून निघाले होते ना! तशी बायकी गाणी काही सोडली तर सर्व गाणी वारकरी पंथाचीच होती. त्यांचे प्रकार तरी किती? गोंधळ, खेळिये, गौळणी सगळे काही त्यात होते. एक बाई मला म्हणाल्या, ''अहो, ही युनिव्हर्सिटी आहे. तुमच्या विद्यार्थ्यांना तरी हे शिक्षण व ही शिस्त आहे का?'' त्यांचे बोलणे मला कबूल नव्हते. पण युनिव्हर्सिटी नाही तरी पारंपारिक ज्ञानाची जोपासना, संवर्धन व पुढच्या पिढीत संक्रांती ही शिक्षणाची तीन अंगे प्रकर्षाने त्यात होती, ह्यात संशयच नाही. हे शिक्षणसुद्धा अनेकविध होते. धर्म व तत्त्वज्ञान ह्याखेरीज, गायन, नर्तन व नाट्य ह्या तिन्ही कलांचा समावेश त्यात होता; शिवाय सर्व समाजाचे एकत्र जीवनही त्यात होते. गायन विशेष उच्च दर्जाचे होते असे नाही, पण पारंपरिक भजनी चालीखेरीज मृदंगाच्या तालात किती तरी निरनिराळ्या रागांत अभंग म्हणत असत. भैरवी, काफी, भूप, सारंग, जयजयवंती दुर्गा, मालकंस असे किती राग कानावरून गेले! फलटणहून निघालो. त्या दिवशी पहाटे पाऊस पडत होता. फलटणचे एक गायक आमच्या दिंडीबरोबर मैल-दोन मैल आले होते. सकाळचे अभंग विशेषच गोड असतात व त्यांनी आळवलेले व भजनी मंडळींनी त्यांच्या पाठोपाठ म्हटलेले सूर व अभंगाचे जयजयवंतीचे शब्द अजून माझ्या कानात घुमत आहेत. वरून येणारा पाऊस, खालचा चिखल, इकडे मुळी लक्षच गेले नाही.

ते गाणारे निघून गेल्यावर समजले की, इतका वेळ आपण पावसात चाललो होतो म्हणून! पालखीच्या वाटेवर पाच वेळा रंगण व बहुधा रोज भारुडे होतात. गोल रंगण पाहण्यासाठी व भारुडे ऐकण्यासाठी आजूबाजूच्या खेड्यातून विशेष गर्दी लोटते. पालखी ठरलेल्या एका मोठ्या वावराच्या मध्यभागी नेतात. पालखीभोवती रंगण पाहणारे स्त्री-पुरुष हजारोंनी बसतात. त्यांच्यावाटली १०-१५ फूट जागा मोकळी सोडतात व त्याच्याभोवती समस्त भजनी वारकरी मंडळी आपापल्या दिंडीत टाळ वाजवीत ''ज्ञानबा तुकाराम'' वा ''जय जय विठोबा रखुमाई''चा गजर करीत उभी असतात. मोकळ्या वर्तुळातून दोन्ही घोडे तीन किंवा पाच खेपा भरधाव घालून देवाच्या पालखीसमोर येऊन देवापुढे मान वाकवून निघून जातात. मग खेडेगावातील आलेले लोक ज्ञानेश्वरांच्या पादुकांचे दर्शन करतात व दिंडीतील मंडळी मनमुराद खेळ खेळतात. कुणी तालावर भजन करीत नाचतात, कोणी झिम्मा खेळतात, कोणी फुगड्या खेळतात, कोणी खो-खो, बेडूक उडी वगैरे खेळतात. बायका आपापसात फेर धरतात. क्वचित बायका-पुरुष मिळून फुगडी व झिम्मा चालू असतो. पुरुषांच्या खेळात बायकांना फारसा वाव नसतो, कारण त्यांचे खेळ खूप झपाट्याने व आडदांडपणे चाललेले असतात. खो-खोच्या खेळात व पटापट ओणव्या गड्यावरून उड्या मारीत जाताना किती पडतात, पण नांगरलेल्या वावरात विशेष लागत नाही. शेवटी सर्व दिंडीवाले नाचत, फेर धरीत, उड्या मारीत पालखीभोवती प्रदक्षिणा करतात व पालखी हलते. भारूडही मोकळ्या वावरातच होते. भारूड हा एक लोकनाट्याचाच प्रकार आहे. भारूडात वेदान्त, पण तो निरनिराळ्या भूमिकांनी सांगितलेला असतो. भारूड करणारेही बहुधा ठरलेले असतात. ''अहो, मी राजाचा जोशी'' अशी सुरुवात करून, चाळिशी घालून, दोन फूट परिघाचे पागोटे चढवून, जोशाचे सोंग संपले की तोच माणूस ''हमामा पोरा हमामा'' म्हणून पागोटे फेकून क्षणात वेश बदलून दुसऱ्या भारूडास सुरुवात करतो. प्रत्यक्ष एकनाथांच्या शब्दाखेरीज इतर शब्द व हावभाव खूपच असतात व पुष्कळदा अश्लीलतेचा कळस होतो. शब्दापेक्षाही हावभाव अतिशय अश्लील असतात. हे नाट्य अर्ध्या तासापेक्षा जास्त चालत नाही. बायका-पुरुष सर्व ऐकतात, पोटभर हसतात, रस्त्याला लागली की सर्व विसरतात. धार्मिक उत्सवात कामुक प्रतीके व लोकनाट्य अतिप्राचीन काळापासून चालत आली आहेत.

पूर्वीच्या काळी दिवस न दिवस, महिनेच्या महिने जी सत्रे चालत त्यांतही असे काही निव्वळ गमतीचे, काही शृंगारिक, वगैरे करमणुकीचे प्रकार असत. किंबहुना, सर्व नाट्याचा उगम धार्मिक उत्सवात, जादूटोण्यात आहे असाही काहींचा दावा आहे. हा करमणुकीचा प्रकार अश्लील असावा का? नसला तरी चालेल. मोठमोठे संभावीत व विद्वान कीर्तनकार, प्रवचनकार काही भारुडात काम करीत नाहीत. ते बरेचसे अर्धवट शिक्षित लोकच करतात. लोकांना हसवायला सर्वांत सोपे साधन म्हणजे निर्लज्ज हावभाव व द्वर्थी वाक्ये, ही फार सनातन कालापासून चालू आहेत. सबंध पंधरवडा होणाऱ्या अखंड भजनात थोडासा हा प्रकार झाला- व तोही खरोखरच थोडासा झाला- तर हरकत नसावी. सर्वांच्या मनात वसणाऱ्या अश्लीलतेला वा बीभत्सपणाला इतक्या थोड्या सामग्रीवर वाट करून देऊन जर ती इतर वेळी, इतर जीवनात दृढनिद्रा घेईल तर ही दिलेली किंमत थोडीच वाटते.

वैराग्यपर कवितेत बीभत्सपणाला वाव पुष्कळच असतो. वासनामय संसाराचा त्याग करायला सांगताना त्या संसाराचे जितके किळसवाणे वर्णन करता येईल तितके करायचे हा प्रघात फार जुना आहे. वारकरी सांप्रदायही त्याला अपवाद नाही. अशाच कित्येक कवनांपैकी मदालसा या नावाने ओळखले जाणारे एक बरेच लांबलचक काव्य आहे. कोणीएक मदालसा नावाची राजस्री आपल्या पुत्रांना पाळण्यातच वैराग्याचा उपदेश करते व ते पुत्र पूर्ण विरागी होतात अशी एक कथा आहे. त्यातले मदालसेने आपल्या मुलांना केलेले उपदेश ह्या काव्यात गोवलेले आहेत. ''उपदेशे मदालसा। सोऽहं जो जो रे पुत्रा।।'' हे त्याचे ध्रुपद. हे गाणे मी दोन-चारदा तरी ऐकले. वारकऱ्यांच्या मनात वैराग्यपर भावना त्यामुळे कदाचित उसळत असतील, पण माझे मन त्या काव्याला विटले हे बरीक खास. ''मनुष्याच्या सुंदर त्वचेच्या आत रक्त, मांस, वगैरे कशी द्रव्ये आहेत, मलमूत्र कसे त्याच्या शरीरात आहेत, त्याच्या नाकात शेंबूड किती आहे- त्याचप्रमाणे व्याधी व जरेने हे सुंदर शरीर कसे कुरूप होऊन जाते म्हणून, हे प्राण्या, ह्या शरीराचे व्याप सोड, ब्रह्मचर्याचा स्वीकार कर व संसारापासून निवृत्त हो.'' हा उपदेश पुरुषांना केलेला असतो, आणि ते ठीकच आहे. बाया ना रंग, ना रूप अशा मांसाच्या गोळ्याला जन्म देतात. त्या खादाड जिवाची दर तीन-चार तासांनी भूक भागवितात. दर तीन-चार तासांनी त्यांचे मुताचे कपडे बदलतात. त्याचे गुवाने भरलेले ढुंगण व अंग धुऊन काढतात व ह्या सगळ्या खस्ता

खाता खाता त्या गोळ्याला हळूहळू रंगरूप येऊ लागले व त्याने हसून पाहिले म्हणजे आपल्याला धन्य धन्य मानतात. अशा ह्या आयांना मानवी शरीर कसले केले आहे त्याची पूर्ण जाणीव असते. त्याचे वर्णन करून का त्यांचे मन संसारातून उडून जाणार आहे? पुरुष ब्रह्मचारी असले तरी एका स्त्रीसंगाखेरीज शरीराचे इतर सर्व व्यवहार अगदी नीट आस्थेने चाललेले असतातच. खाण्यापिण्याची चोख व्यवस्था बायको नसली तरी होत असतेच. अशांची नीट व्यवस्था करण्याचा भार गृहस्थाश्रमी लोकांवरच असतो. त्यांची जेवणा-खाण्याची सोय कुणी तरी रक्ताची नाही तर धर्माची आई-बहीण करीत असते. ब्रह्मचाऱ्याची सेवा करण्यास निष्ठेने व भक्तीने स्त्रियाच पुढे सरसावतात. जिवंतपणी तर त्यांची सेवा होतेच, पण मेल्यावर ही भक्ती स्त्रिया पुढे चालवितात. ह्याचे एक मजेदार उदाहरण वाटेनेच पाहिले. पंढरपूर जसजसे जवळ-जवळ येऊ लागले तसतशा सर्व महाराष्ट्रातून पालख्या येऊन ज्ञानदेवांच्या पालखीला भेटू लागल्या. पंढरपूरच्या अलीकडील मुक्कामाला तर पालख्या व दिंड्या ह्यांचे एक नगरच वसते. तेथे सर्व महाराष्ट्राची हजेरी लागते. देहूहून तुकाराम महाराज, सासवडहून सोपानकाका, खानदेशातून मुक्ताबाई, उमरावतीहून खुद्द रखुमाई अशा कितीतरी पालख्या येतात. पैकी काही वाटेतच भेटतात. त्यांपैकी यंदा सज्जनगडाहून रामदासांची पालखी आली. तिची गाठ वाटेत पडली; पालखी वाहणारे पुरुष होते, पण जवळपास चालणाऱ्या, चवरी ढाळणाऱ्या बायाच होत्या. 'सावधान' म्हणताक्षणीच जिवंतपणी पळून जाणारे साधु रामदासबुवा मेल्यावर स्त्रियांच्या गराड्यात सापडलेले पाहून मला हसू आले. स्त्रियाच अशा साधु-पुरुषांची सेवा करण्यासाठी अहमहमिकेने पुढे येतात. ही भक्ती पुष्कळदा सर्वस्वी निष्काम अशी असते. जिला ना पोर ना बाळ, जिचा संसार लहानपणीच उधळला गेला अशी कोणी बाई, बुवांना नीट खायला मिळावे; ते अन्न सुग्रास असावे, ते खाणाऱ्याच्या ताटात ऊन-ऊन पडावे म्हणून धडपड करताना पाहिली म्हणजे बुवांच्या वत्सल हृदयाचीच किंमत मला भारी वाटायची. ऐशी कळवळ्याची जाति । करी लाभावीण प्रीती॥

मदालसा एकदा पूर्ण ऐकल्यावर माझे मन त्यात रमेनासे झाले. हिंदूंच्या समाजजीवनात गृहस्थाश्रमाचे महत्त्व कमी होऊन ब्रह्मचर्याचा व संन्यासधर्माचा बडेजाव कसकसा वाढत गेला ह्याबद्दल माझे विचार भरकटत जायचे. निर्गुण-निराकार ब्रह्माचे आकलन होणे कठीण म्हणून देवाला

सगुणत्व देणारा, इतकेच काय तर ती सगुण, गोजिरी मूर्तीच श्रेष्ठ असा अट्टाहास बाळगणारा वारकरी पंथ- अनेक स्त्रियांचा उपभोक्ता श्रीकृष्ण त्यांचा देव-- 'जर विठोबा-रखुमाई' असा दांपत्यनामाचा घोष- अर्जुनाला प्रवृत्तिपर बनविण्यास कारणीभूत झालेली गीता त्यांचा आधारभूत ग्रंथ, आणि शिकवण काय; तर ब्रह्मचर्याची- निवृत्तिमार्गाची- हा मेळ कसा घालायचा? ''प्रजाभिः प्रजायस्व'' (''प्रजेच्या रूपाने परत जन्म घे. प्रजेच्या रूपाने अमर हो.'') ही वेदाची शिकवण होती. पुत्रकामेष्टी करणारे असंख्य यजमान धुराने कुरु-पांचालांची पवित्र भूमी अंधारीत होते. औरस संतती नसली तर निरनिराळे चांगलेवाईट मार्ग पुत्रप्राप्तीसाठी मनूने सांगितले; एवढेच काय तर ''उपनयनविधीपासून बारा वर्षे ब्रह्मचर्याने राहून गुरुगृही विद्या शिकावी. एखाद्या शाखेत विशेष पारंगत व्हायचे असेल तर आणखी काही वर्षे व्रतस्थ राहून वेदाभ्यास करावा. पण ह्यापुढे ब्रह्मचर्याचा उपदेश करणारे लोक नपुंसकच असावे.'' असे अगदी स्पष्ट मत शबरस्वामींनी दिले आहे. पण गृहस्थाश्रमाची थोरवी वर्णन केली जात असता एकीकडे अरण्यवास व उपनिषदातील तत्त्वज्ञान परिणत होत होते. बुद्ध व जैन संप्रदाय ह्या तत्त्वज्ञानाच्या आधारे कर्ममार्गाचा हीनपणा दाखवून संन्यासमार्गाचा प्रसार करीत होते. पण संन्यास मार्गाची भरभराट एका सामाजिक विरोधावर अवलंबून असते. भिक्षावृत्तीने संन्यस्त अवस्थेत राहणाऱ्या सांप्रदायिक स्त्री-पुरुषांची (मग ते जोगी, संन्यासी, भिक्षू, श्रमण, कोणीही असोत) उपजीविका संपन्न राजकुळे किंवा वैशाली, श्रावस्ती व चम्पा अशा समृद्ध शहरात राहणाऱ्या श्रीमान व्यापाऱ्यांकडूनच होते! समृद्ध व सुखी गृहस्थाश्रमावरच संन्यासधर्माची उभारणी शक्य होते! हिंदूंच्या सामाजिक जीवनात ही जी मूल्यविषयक क्रांती झाली त्याचा इतिहास जितका महत्त्वाचा तितकाच मनोरंजक आहे; पण मदालसेसारखी गाणी मनोरंजकही नाहीत आणि उदात्तही नाहीत.

मदालसा संपून काही वेळ लोटला होता. एकंदर वातावरणात मला फरक वाटला. क्षणभरात ठेक्यावर नाचत, खुल्या गळ्याने म्हटलेले शब्द ऐकू आले, ''बोल रे काऊ, तुझे सोन्याने मढवीन पाऊ'' कारण काय तर ''पाहुणा पंढरीराऊ'' आणीत आहेस. ज्ञानेश्वरांची ओवी चालली होती. मदालसेचे जड वातावरण जाऊन हवा निवळली. मन परत प्रसन्न झाले. आमचे दिंडीतले मुख्य नेहमीच हा विवेक दाखवीत. एकदा मदालसेनंतर

त्यांनी मुक्ताबाईंचे ताटीचे अभंग सुरू केले- ''ताटी उघडा ज्ञानेश्वरा'' ह्या पालुपदाने अशीच मी माझ्या उदासीनतेतून जागी झाले होते. एकदा संध्याकाळचा टप्पा बराच लांब होता. सूर्य कलला तेव्हा भर उन्हात चालून चालून माणसे थकली होती. हरिपाठ होऊन इतर किरकोळ अभंग झाले होते, पण श्रमाने म्हणा, उन्हाने म्हणा नेहमीचा आनंद वाटत नव्हता, तोच बुवांनी ''आम्ही लटके ना बोलू वर्तमान खोटे'' सुरू केले. सगळ्यांची तोंडे खुलली आणि लहापणापासून ऐकलेले, असंभाव्य घटनांनी भरलेले ते पद म्हणता म्हणता, हसता हसता वाट कधी सरली ते कळले नाही.

रंगणे चालली म्हणजे सर्कशीचा भास होई. खेळ सुरू झाले म्हणजे उत्साहाने वाटचालीचे दु:ख नाहीसे होई. भारूडांचे नाट्य मधून मधून चाले व कधी वैराग्यपर कविता, तर कधी देवाचा धावा, तर कधी ''लटके ना बोलू'' सारखी नितांत असंभाव्य पदे व अखंड हरिनामाचा गजर ह्यांमुळे सारखी वाटचाल करूनही मन प्रसन्न होते.

म्हणजे काय सर्व वाटसरू आनंदात होते? मुळीच नाही. ही भागीदारी, हे सहजीवन आनंदाचेच नव्हे तर दु:खाचेही होते. किती दु:खीकष्टी माणसे पंढरीच्या वाटेवर चालत होती! ह्या वाटेवर नेहमी हृदयात बाळगलेली दु:खे ती दुसऱ्यांजवळ सांगत होती, भरलेले अंत:करण हलके करीत होती, आणि वेदना सहन करण्याचे सामर्थ्य आणीत होती. दु:ख तरी किती- प्रत्येकाचे दु:ख निराळे आणि प्रत्येकाचे दुसऱ्यासारखे.

किती सुरेख होती ती बाई! किती गोड बोलणे! एक दिवस आम्ही झाडाखाली सुख-दु:खाच्या गोष्टी बोलत बसलो होतो. बायांच्या गोष्टी काय असणार? तुमचे मालक काय करतात? तुम्हाला मुले किती? असल्याच प्रश्नांची उत्तरे दिल्यावर मी पण तेच प्रश्न विचारले. भरल्या डोळ्यांनी तिने सांगितले, ''नाही हो. माझ्या घरी मुलं नाहीत हो खेळत! एवढा मोठा वाडा.. एकीकडे मालक, एकीकडे मी. भांडण नाही, काही नाही; पण बोलणार तरी काय एकमेकांशी? जाते झालं पांडुरंगाच्या पायाशी.'' मी हळूच विचारले, ''देवाच्या पायांशी गाऱ्हाणं घालायला जाता का?'' ''छे:! छे:! त्याला काय ठाऊक नाही? त्याच्या मनात असेल ते करील. त्यानं ठेवलं तसं राह्यला पाहिजे.''

एकदा दुपारच्या जरा विसावलो होतो. शेजारीच दोन-चार बाया-पुरुष व एक तान्हे मूल अशी होती. एका बाईने मुलाला प्यायला घेतले होते आणि

सारखी रडत होती. "बाई, काय झालं? काही दुखतं का?" "मले नव्हे हो, पोराले!" ती म्हणाली. ती बाई बीडची. महिनाभर प्रवास चालला होता. दोन दिवस झाले, ते वर्षाचे मूल तापाने फणफणले होते. उन्हापावसात, वाऱ्यात चालायचे- मूल सारखे पाठीशी. त्याला बाधले तर नवल काय? "एवढ्या लहान मुलाला घेऊन कशा निघाला?" "अहो काय सांगू? शेजारच्या चार-पाच गावची माणसं निघाली. शेजारणी म्हणाल्या, 'तुझा सारा जीव संसारात. नाही तरी घरी राहून पोरं काय मरायची थांबली आहेत? चल, पांडुरंगाच्या पायाशी चल, चालवतं आहे तोवर.' म्हणून आले. पण आज दोन दिवस पोर डोळा उघडीत नाही हो!" बारीबरोबर सरकारी डॉक्टर व दवाखान्याची मोटार होती ती दाखवून तिला म्हटले, "जा तिकडे, तुला फुकट औषध मिळेल." ती रोज दूध घेऊन मुलाला द्यायची. ते उकळून घे म्हणून काय सांगणार? मी म्हटले, "मुलाला दुधाचा 'चा' ऊन ऊन दे; घाम येऊन ताप जाईल. विठ्ठल तुला नाही अंतर देणार." ती बरोबरच्या माणसांना घेऊन दवाखान्याकडे गेली. पलीकडे एक म्हातारा पागोटे उशाशी घेऊन पडला होता. तो उठून बसला व मला म्हणाला, "ही कसली वारी करते? पोराला ताप आला की, लागली रडायला. देव ठेवील तसं राह्यला पाहिजे." मला ह्या शिष्टपणाचा राग आला. मी जरा रागानेच उत्तरले, "तुम्हाला काय जातं बोलायला? ज्याचं दुःख त्याला ठाऊक." म्हातारा म्हणतो, "अहो, तो विठ्ठल मोठा कठीण देव हाये बरं! तुमचं मन दुसरीकडे गुंतलं तर तो सोडवून टाकतो. मीच पाहा ना! बायको होती, मुलं होती, घर होतं. एका साथीत चार दिवसात सगळी खलास. घर टाकलं विकून. पैसे टाकले संपवून. आता म्हणतो, देवा तुझ्याशिवाय कोणी नाही!" त्याच्या हातावर चहासाठी पैसे टाकून दिंडी जवळ आली म्हणून मी उठले. "देवा, तुझ्या मनात मला 'चा' द्यावा असं आलं रे! पांडुरंगा नारायणा!" हे शब्द ऐकू आले.

अशीच एक म्हातारी आजीबाई अधूनमधून दिसायची. एकदा तिला कोणी विचारले, "आजीबाई, तुमची मुलं, नातवंडं काय करतात, कुठं असतात?" म्हातारीने प्रश्न ऐकला मात्र, तिचे डोळे मिटले. तोंड भेसूर दिसू लागले व ती आपादमस्तक थरथर कापू लागली. तिचे डोके लटलट हालू लागले व ती शरीर घुसळू लागली. आम्ही घाबरलो व झटदिशी तिच्याजवळ जाऊन तिला बिलगून तिच्या अंगाभोवती हात टाकले. "आजीबाई, सावध

व्हा, पाणी देऊ का?'' अशी विचारणा झाली. माझ्या बाहूंत म्हातारीचा देह थरथरत होता. मला आठवण झाली. माझी एक कुत्री होती, तिचे पिल्लू जनावर चावून मेले. तेव्हा ती थरथरत उभी होती. अशीच तिला जवळ घेतली होती व असाच तिच्या शरीराचा कंप मला जाणवत होता. मनात आले, ''आपण माणसं जनावरांच्या किती जवळ!'' म्हातारी थोड्या वेळाने कापायची थांबली, वेदनेची जाणीव व आविष्कार पाशवी पायरीवर आला. तिच्या मिटल्या डोळ्यांतून धारा वाहू लागल्या. मुक्या दुःखाला वाचा फुटली. तिने आपली हकीकत सांगितली. दुःख काय? जे इतरांचे तेच तिचे. तिचा एकुलता एक मुलगा भर पंचविशीत गेला होता. ही दुःखे सामाजिक विषमतेमुळे उत्पन्न झाली नव्हती; राजकीय दंगली व युद्ध त्यांच्या बुडाशी नव्हती. ती मानवाबरोबर आलेली व मानवाबरोबर नष्ट होणारी अशी होती, ती रावाला होती, रंकाला होती. तरण्याला होती, वृद्धाला होती. सर्व मनुष्यसमाजाला व्यापून राहिलेली होती. म्हातारी आपली हकीकत सांगून क्षणभर थांबली व एक खोल सुस्कारा टाकून म्हणाली, ''पांडुरंगा, तू ठेवशील तसं राह्यचं...'' दात-ओठ खाऊन मी पण मनात म्हटले, ''तेन त्यक्तेन भुञ्जीथाः।'' ह्या लोभी सर्वग्राही मालकाच्या हातून जे सुटेल ते आमचे... ''पांडुरंग मोठा कठीण देव आहे बरं! तुमचं मन कुठं गुंतलं तर तो सोडवून टाकतो.'' पण देवा, ते मन ठायी-ठायी गुंतवतोस का? ते पुरं गुरफटून टाकतोस आणि मग क्रूरपणे ओरबाडून त्याच्या चिंध्या-चिंध्या करतोस ह्यात काय मोठेपणा? ह्या असल्या श्रमलेल्या, फाटलेल्या, रक्ताश्रू गाळणाऱ्या हृदयाला फरफटत तुझ्या पायांशी आणण्यात तुला काय धन्यता वाटते? त्यापेक्षा आयुष्याच्या प्रभातकाळी सुखाच्या कोवळ्या उन्हात फुललेले आमचे जीवनपुष्प तुझ्या पूजेसाठी का खुडून नेत नाहीस?

आता मात्र मला पुरे वेड लागले! त्या म्हातारीच्या तळतळाटाने क्षणभर मला वस्तुस्थितीचा विसर पडला. कोण कोणाला ओढून पायाशी आणणार? सगळा मनुष्याच्या मनाचा खेळ आहे झाले! निराकार, निर्गुण व सर्वस्वी उदासीन तत्त्वातून सगुण परमेश्वर निर्माण करावयाचा, सर्व कर्तृत्व त्याच्या माथी मारायचे, त्याला जगाचा मालक बनवायचे आणि मग म्हणायचे, ''तेन त्यक्तेन भुञ्जीथः''

आम्ही सर्व आपापल्या दुःखदायक विचारात गुरफटलो होतो, इतक्यात एकीने अभंग म्हणावयास सुरुवात केली, ''देह जावो अथवा राहो,

पांडुरंगी माझ्या भावो.'' तिच्या भजनात सगळ्यांनी आपला सूर मिसळला. म्हातारीही बघताबघता आमच्यात सामील झाली. तिच्या कापऱ्या आवाजाने साथ दिली, ''आण तुझी पंढरीरावो.'' थोड्या वेळाने दुःखाच्या सावल्या जाऊन परत प्रसन्नता आली. अशी सर्वांना दुःखे होती, पण सारीजणे एकमेकांच्या साहाय्याने आनंदमय वातावरण कसे निर्माण करीत कोण जाणे!

धर्म ही एक अफू आहे! मानवी संस्कृतीने अशी कित्येक तऱ्हेची अफू व दारू निर्माण केली आहे. अफू खाऊन मनुष्य गुंगून पडतो- दारू पिऊन मस्त होतो. वास्तवता विसरण्याचाच सर्व प्रयत्न. कोणी देव निर्माण करते, कोणी शास्त्र निर्माण करते, तर कोणी राजकीय पंथ निर्माण करतात. शास्त्राच्या अभ्यासात सर्वस्व विसरणारे सहस्रावधी शास्त्रज्ञ अफू प्यायलेलेच नाहीत का? अर्वाचीन शास्त्रामुळे मानवांचे आयुष्य आनंदमय झाले ही घोषणा करणारे ज्ञानमदिरेने धुंद झालेलेच ना? समाजाची पुनर्रचना करून समाजाची दुःखे नाहीशी करणारे महान तत्त्ववेत्ते बुद्धापासून मार्क्सपर्यंत होऊन गेले, पण जुनी दुःखे तर नाहीशी होत नाहीतच, नव्यांची मात्र भर पडत जाते व मनुष्य अफूने का दारूने ती विसरून म्हणतो, ''आमची प्रगती झाली. आनंदमय संसाराची पहाट उगवली....''

तो वाटचालीचा शेवटचा दिवस. संध्याकाळी इतक्या दिवसांची सोबत सुटणार- जे ते गावात आपापल्या मुक्कामाला जाणार. मला हुरहूर लागली होती.... माझे डोळे परत परत भरून येत होते. हौशी मला म्हणाली होती, ''बाई, शेवटच्या माळाला 'रडवा माळ' म्हणतात.'' ''का ग?'' त्यावर चालायला लागलं की आपलं रडूच येतं बघा.'' सगळीकडे निरोप घेणे चालले होते. माझ्या तोंडाने शब्द फुटत नव्हता. मी मानेनेच दिंडीतल्या मंडळींचा निरोप घेऊन पुढे निघाले. गावाची शीव आली. मला चुकल्याचुकल्यासारखे वाटत होते. इतके दिवस दिंडीत कधी पुढे, कधी मागे, तर कधी झाडाखाली, तर कधी ओढ्यावर सर्वांबरोबर असणारा तो जवळ दिसेना. मी वळून पाहिले तो तो पाठ फिरवून मागे निघाला होता, मी म्हटले, ''काळ्या, बाबा, तू पण सोडून चाललास का रे? पंढरपुरात नाही का येणार?'' त्याने हसून मान हलवली. ''मग चाललास कुठे?'' काही न बोलता त्याने सभोवार हात फिरवला व तो झपाट्याने चालू लागला! खालची नांगरलेली शेते, वर ढगांनी भरलेले आकाश. खांद्यावर घोंगडी

घेतलेली ती गोजिरी, सावळी मूर्ती त्यात कधीच दिसेनाशी झाली. मी श्रमल्या पायांनी, भरल्या अंत:करणाने व वाहत्या डोळ्यांनी पंढरपूरच्या वेशीत पाय टाकला.

✿

१८

# परिपूर्ती

“आपल्या आजच्या व्याख्यात्या श्री.... ह्यांच्या कन्या आहेत...”

माझी ओळख करून देणाऱ्या बाईंच्या बोलण्याला सुरुवात झाली. त्यांचे बोलणे मी अर्धवट ऐकत होते; पण मन मात्र बाईंच्या बोलण्याने जाग्या झालेल्या स्मृती आणि कल्पना ह्यांत गुंतले होते. “एकदा लग्न उरकून टाकले म्हणजे जबाबदारी सुटली” असे बाबांचे बोलणे मॅट्रिकच्या वर्गात असल्यापासून ऐकले होते. माझा पुढे शिकण्याचा हट्ट, बाबांचा त्रागा, शेवटी “कर, काय वाटेल ते कर” ह्या शब्दांनी मोठ्या कष्टाने दिलेली परवानगी हे आठवले; व तीच भाषा, तेच भांडण आणि तोच शेवट दरवर्षी परीक्षेच्या शेवटी कसा व्हायचा... हे आठवून क्षणभर हसू आले. ते रागात आले म्हणजे अस्सल प्राकृतात पाच-पन्नास शिव्या हासडून बोलत. आम्ही जरा मोठी झाल्यावर तर रोज ह्या नाही त्या गोष्टीवरून वादविवाद व शेवटी भांडण ठरलेलेच होते. ते जितके तापट तितकी आई शांत. त्यांनी म्हणावे, “ह्या पोरांच्या तोंडास तोंड देण्यानं टेकीस आलो.” तिने म्हणावे, “सगळी तुमच्या वळणावर गेली आहेत,” की त्यांनी चूप बसावे.

त्यांचे प्रेमातले भाषण म्हणजे असेच. मुलींना ते 'म्हैस' म्हणत व मुलांना 'बैलोबा'. आम्हाला मुले झाल्यावर ही प्रेमाची बिरुदे ते नातवंडांना लावू लागले.

"ह्यांनी आपलं सर्व आयुष्य स्त्रियांच्या उन्नतीकरिता वेचलं..." बाई बोलत होत्या तिकडे माझे लक्ष गेले. हे उदगार बाबांबद्दल खास नव्हते. "ह्यांनी काढलेल्या स्त्री-शिक्षण संस्था सुपरिचित आहेत." अस्से, अस्से. आता मामंजींबद्दल बोलत आहेत वाटते. ठीक, चालू द्या. आहे अजून बराच अवकाश. मी जरा पाय लांबवले, कोचावर अंग जरा जास्त रेलले व डोळे फार वेळ न मिटण्याचा निश्चय केला. "सर्व स्त्रियांना त्यांनी आपल्या ऋणात बांधलं आहे." माझी ओळख करून देणे चालूच होते- खरंच, मामंजींनी मला कोणत्या ऋणात बांधले आहे? त्यांच्या मुलाची बायको म्हणून मी त्यांची ह्यापलीकडे त्यांच्या-माझ्यात काही बंधन होते का? लग्न होऊन मी घरी आले तेव्हा निदान सासरचे वडील माणूस म्हणून फक्त कर्तव्यभावना तरी होती. त्यांचीही माझ्याबद्दलची भावना अशीच असावी. मुलाला आवडली ना, मग माझे म्हणणे नाही. एका माणसासाठी सर्वस्वी अनोळखी माणसांत मी जाऊन पडले होते. ती माझ्याबद्दल साशंक होती, मी त्यांच्याबद्दल होते. लौकिकात मी त्यांना व त्यांनी मला आपले म्हटले होते. पण मने मिळायची होती. त्याच्यासाठी किती तरी काळ लोटायचा होता. मला त्यांचे करायचे होते, त्यांनी माझ्या उपयोगी पडायचे होते. किती भांडणे व्हायची होती, कितीदा समजुती काढायच्या होत्या! प्रत्येक सासुरवाशीण ह्याच चक्रातून जात असणार, सासरची माणसे हीन असली तर ज्या माणसाच्या प्रेमामुळे मुलगी घरात आली त्याचेसुद्धा प्रेम नाहीसे करून तिला निराधार करून टाकतील. पण माझ्या सासरची माणसे सुवृत्त, चारित्र्यसंपन्न अशी होती. दर भांडणातून, आयुष्यातील दर प्रसंगातून, प्रेमाची नवी-नवी बंधने निर्माण होत होती, व आज माझी मुले केवळ आईबापांच्या नाही, तर काका-काकूंच्या, मामा-मामींच्या व दोन्ही आजोबा-आजींच्या प्रेमाच्या उबेत वाढत होती, मामंजी तर माझ्या घरात चालताबोलता आशीर्वाद नाहीत का?

"कॉलेजात ते शास्त्र शिकवितात," बाईचे शब्द परत ऐकू आले, "त्यांनीही वडिलांप्रमाणे आपल्याला शिक्षणकार्याला वाहून घेतलं आहे." मामंजी संपून आता ह्या बाई माझ्या नवऱ्याकडे वळलेल्या दिसतात. काय वरवरचे बोलत असतात माणसे! ह्यांना माहीत तरी आहे का तो कसा आहे

ते? विषयसुद्धा कोठचा शिकवतो ते धड माहीत नाही, मग बाकीचे काय सांगणार कपाळ! माझे मन परत घरगुती स्मृतींच्या जाळ्यात गुरफटले. थोरली मुले आजोबांना भिऊन असत; पण धाकटीला मात्र आजोबा म्हणजे तिची मालमत्ता वाटते जणू. आणि आजोबांनासुद्धा कितीही कामात असले तरी तिच्या आग्रही अप्पलपोट्या प्रेमापुढे हार खावी लागते. आजोबाच काय घरातील प्रत्येक माणूस सर्वस्वी तिचे पाहिजे. संध्याकाळी आम्ही जरा एकमेकांजवळ बसून बोलत असलो की, हिला ते मुळीच खपत नाही... ताबडतोब मध्ये घुसते, त्याचे तोंड आपल्या हातात धरते व सांगू लागते, ''बरं का दिनू, आज कनी मला मास्तर म्हणाले...'' ती मामाकडे गेली म्हणजे घरात निवांत बोलत बसता येते. पण आता अगदी दोघांच्याच अशा गोष्टी बोलाव्यात तरी कुठे लागतात? एकमेकांची मन:स्थिती कळायला बोलायची गरज आहेच कुठे? पाठमोरा असला तरी नाही का मला समजत की, आज काही तरी बिघडले आहे म्हणून? मला लांबूनच पाहून तो नाही का विचारीत, ''आज काय ग झालं आहे?'' ठण...घड्याळात अर्ध्या तासाचा ठोका वाजला. ओळख करून देणाऱ्या बाईंची गडबड उडाली. ''तेव्हा ह्या...ची कन्या आहेत. सुप्रसिद्ध महर्षी ह्यांच्या सूनबाई, सुप्रसिद्ध प्राध्यापक ह्यांच्या पत्नी आहेत, व स्वत:सुद्धा शिकलेल्या आहेत. मी त्यांना आता भगिनींना चार शब्द सांगण्याची विनंती करते.'' असे म्हणून त्या झटकन खाली बसल्या. मला थोडे हसू आले. माझ्या भटक्या मनाला आवरून माझे भाषण केले व समारंभ आटोपला.

पण बाईंनी करून दिलेली ओळख अपूर्ण आहे व तीत काहीतरी राहिले ही हुरहूर मनाला लागली ती काही जाईना. दोन दिवसांनी मी घाईघाईने रस्त्यातून जात होते. संध्याकाळ संपत आली होती, पण रात्र अजून पडली नव्हती. रस्त्याच्या कडेने मुलांचे घोळके घराच्या दारापुढून उभे होते. चार भिंतीच्या कोंडवाड्यात जाण्याचा क्षण ती जरा पुढे ढकलीत होती. त्यांच्या गप्पांतील शब्द अधूनमधून माझ्या कानांवर येत होते. इतक्यात जवळच्याच एका घोळक्यातून शब्द ऐकू आले, ''अरे, शूः, शूः, पाहिलीस का? ती बाई जाते आहे ना, आपल्या वर्गातल्या कव्र्याची आई बरं का...''

...मी थांबले. पण चुटकी वाजवली. त्या दिवशी बाईंनी सांगितलेली ओळख आज पुरी झाली. बाई हे सांगायच्या विसरल्या होत्या, नव्हे का?

✿

महाराष्ट्रात फिरता फिरता अशा किती गौराया मी पाहिल्या आहेत! किती कष्ट करतात! किती अधिकार गाजवतात! गौरीचा लाडिकपणा, गौरीचा भोळेपणा, गौरीचा प्रेमळपणा, सगळे त्यांच्यात दिसून येते. ती हिमालयाची मुलगी, तर ह्या सह्याद्रीच्या माहेरवाशिणी. वन्य, राकट, पण प्रेमळ. आपल्या तापट, रानटी भावांना संभाळणाऱ्या, आपल्या रागीट नवऱ्यांना ताळ्यावर आणणाऱ्या, भोळ्या सदाशिवांच्या डोक्यावर बसलेल्या अशा पार्वत्या सर्व जातींत सर्व महाराष्ट्रभर दिसतात. त्यांना उत्तरेकडील सुसंस्कृत रुबाबी-नबाबी बोलणे चालणे माहीत नसेल, त्यांच्या हास्यात नाजुकपणा नसेल, त्यांच्या जिभेच्या रासवटपणात प्रेमाचा ओलावा कोणाला दिसत नसेल तर ते पाहणाऱ्यांचे दुर्दैव.

देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स) प्रा. लि.